म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १६८७
ठाज १९६६

# पनिषदांचें अंतरंग

स्वामी शिवतत्त्वानंद

REFBK-0014813
REFBK-0014813

श्रीरामकृष्ण आश्रम, नागपूर

# कठ उपनिषदाचें अंतरंग

…ाठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........................ वि: ....................
क्रमांक ........................ नों दि: ....................

स्वामी शिवतत्त्वानंद

REFBK-0014813
REFBK-0014813

श्रीरामकृष्ण आश्रम
नागपूर

प्रकाशक :—
**स्वामी भास्करेश्वरानंद**
अध्यक्ष, श्रीरामकृष्ण आश्रम
धंतोली, नागपूर–१

श्रीरामकृष्ण–शिवानंद–स्मृतिग्रंथमाला

पुष्प ६५ वें

(श्रीरामकृष्ण आश्रम, नागपूर द्वारा सर्व अधिकार सुरक्षित)

मूल्य रु. २.२०

मुद्रक–
**श्री. दि. भि. धाक्रस**
नाग मुद्रणालय
रुईकर मार्ग, नागपूर-२.

# प्रास्ताविक–

'कठ उपनिषदाचें अंतरंग' हें आमचें नवीन प्रकाशन वाचकांच्या हातीं देतांना आम्हांला आनंद होत आहे. आमच्या आश्रमांतून प्रकाशित होणाऱ्या 'जीवन-विकास' नामक मासिकाच्या सप्टेंबर १९५९ ते डिसेंबर १९५९, आणि फेब्रुवारी १९६० या अंकांत कठ उपनिषदावर संपादकीय लेखमाला प्रसिद्ध झाली होती. तीच लेखमाला प्रस्तुत पुस्तकाच्या रूपाने वाचकांना सादर करण्यांत येत आहे.

कठ उपनिषत् हें अतिशय काव्यमय आणि अत्यंत महत्त्वाचें असें एक उपनिषत् आहे. मृत्युदेवता यम आणि आत्मज्ञानाची उत्कट तळमळ असलेला आदर्श साधक नचिकेता यांच्यामधील संवादाचें वर्णन या उपनिषदांत आलें आहे. या संवादांत यम-राजांनी नचिकेत्याला श्रेय आणि प्रेय, आत्मविद्या, आत्मलाभाची साधना, मोक्ष इत्यादि महत्त्वपूर्ण विषयांचा उपदेश केला आहे. या उपदेशाच्या अनुषंगाने यमराजांनी नचिकेत्याला आध्यात्मिक जीवनाचें आणि आध्यात्मिक साधनेचें रहस्य उलगडून दाखविलें आहे. मानवजीवनाचें अंतिम लक्ष्य जें आत्मज्ञान आणि या आत्मज्ञानाने लाभणारें जें खरें सुख व जी खरी शांति ती कशी प्राप्त करून घ्यावी हें यमराजांनी नचिकेत्याला या उपनिषदांत स्पष्ट करून सांगितलें आहे. जीवनाचा सर्वांगांनी विकास घडवून आणण्यासाठी आणि आदर्श मानव होण्यासाठी या उपनिषदांत वर्णिलेल्या शाश्वत सत्यांपासून सर्वांना अमोघ असें मार्गदर्शन लाभतें. "उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य बरान्निबोधत"—"उठा, जागे व्हा आणि थोर आत्मदर्शी महापुरुषांना शरण जाऊन आत्मज्ञान प्राप्त करून घ्या" असें आवाहन करणाऱ्या या उपनिषदाच्या अध्ययनाने सर्वांना धर्ममार्गांत नवीन स्फूर्ति व प्रेरणा लाभेल असा आम्हांला विश्वास वाटतो.

५–१०–६५ —प्रकाशक

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| प्रथम अध्याय | कर्तव्य आणि अभ्युदय यांचें रहस्य | | १ |
| द्वितीय अध्याय | मृत्युजिज्ञासा | ... | २० |
| तृतीय अध्याय | श्रेय आणि प्रेय | ... | ४९ |
| चतुर्थ अध्याय | आत्मविद्या | ... | ७० |
| पंचम अध्याय | आत्मलाभाची साधना | ... | ९० |

अनुक्रम ...... वि: काव्य
क्रमांक ९६८७ नोंद दि: २८।१।५५

# कठ उपनिषदाचें अंतरंग

## प्रथम अध्याय

## कर्तव्य आणि अभ्युदय यांचें रहस्य

१

आम्हां हिंदूंचे आदि धर्मग्रंथ जीं उपनिषदें, त्यांतील एक अत्यंत महत्त्वाचें, पूज्यपाद स्वामी विवेकानंदांचें अतिशय आवडतें, नितान्त काव्यमय, प्रसन्नगंभीर असें यम-नचिकेता संवादरूप जें कठ उपनिषत्, त्यावर भाष्य करावयास प्रारंभ करण्यापूर्वी भगवत्पूज्यपाद आचार्य श्रीशंकरांनी पुढीलप्रमाणे वंदन केलें आहे--

"ॐ नमो भगवते वैवस्वताय मृत्यवे ब्रह्मविद्याचार्याय, नचिकेतसे च।"

अर्थात् -- "ब्रह्मविद्या प्रदान करणारे सूर्यपुत्र भगवान् यमधर्म आणि नचिकेता यांना वंदन असो."

२

ज्यांचीं भाष्यें यावच्चंद्रदिवाकर प्रकाशमान राहून जीवनविमूढ जीवांच्या अविद्यांधकाराचा निरास करीत ब्रह्मविद्येची परम शांतिप्रद, मंगल प्रभा चिरकाल फाकवीत राहणार आहेत त्या अद्वितीय वेदान्ताचार्य, जगद्गुरु श्रीशंकराचार्यांनी 'ब्रह्मविद्याचार्य' यमधर्मांना भाष्यारंभीं वंदन करावें हें अर्थातच अगदी साहजिक आहे. ब्रह्मविद्या प्रदान करणाऱ्या 'आचार्यां'विषयी तुम्हींआम्हीं कशी श्रद्धेची आणि नितान्त आदराची वृत्ति बाळगावयास हवी हें श्रीशंकराचार्य स्वत:च्या या नमनाने आपल्याला शिकवीत आहेत. परंतु त्या जगद्गुरु श्रीशंकराचार्यांनी ब्रह्मविद्याग्रहीता केवळ एक

'साधक' अशा नचिकेत्यालादेखील त्यावरोबरच नमस्कार करावा हें मात्र अमळ विचित्र आणि विस्मयकारक वाटल्याखेरीज राहत नाही.

परंतु यांत विस्मय वाटण्यासारखें खरोखर कांही नाही.

आपल्या ह्या आचरणाने श्रीशंकराचार्य यथार्थ आचार्या-बरोबरच 'आदर्श' वा 'यथार्थ' साधकाचाहि महिमा तुमच्या-आमच्या मनावर बिंबवीत आहेत.

'सिद्धि' ही जशी एक मनाची वा जीवनाची ज्ञानजन्य अवस्था आहे, तशीच 'साधक' ही सुद्धा मनाची वा जीवनाची एक ज्ञानप्रसूत अवस्था आहे. जें ज्ञान वा जी विद्या वा जो बोध 'सिद्धां'त पूर्णपणें प्रकट झाल्याने तो सिद्ध होत असतो तेंच ज्ञान, तीच विद्या वा तोच बोध यथार्थ वा आदर्श 'साधकां'त फक्त अपूर्णपणें प्रकट झालेला असतो, इतकाच काय तो फरक. ज्या बोधाच्या 'प्राप्ती'ने माणूस 'सिद्ध' होत असतो, त्याच बोधाच्या 'स्पर्शा'ने माणूस 'साधक' बनत असतो. हृदयांत ज्या बोधाचा संपूर्ण विकास झाल्याने माणूस 'सिद्ध' होत असतो, त्याच बोधाचा हृदयांत अपरिस्फुट उन्मेष झाल्याने माणूस यथार्थ 'साधक' बनत असतो. उमलूं घातलेली कळी आणि पूर्ण उमललेलें फूल यांचा जो संबंध आहे, तोच आदर्श साधक आणि यथार्थ सिद्ध यांचाहि म्हणतां येईल.

आणि म्हणूनच, बालतपस्वी साधक नचिकेत्याच्या हृदय-लतिकेवरील ती विकासोन्मुख विवेक-वैराग्य-ज्ञान-भक्ति-मुमुक्षेची अपार्थिवसुंदर कलिका बघून, आध्यात्मिकतेची – मग ती पूर्ण-अपूर्ण, सिद्ध-साधक कोणत्याहि अवस्थेंतील असो – कदर बाळगणाऱ्या जगद्गुरु आचार्य श्रीशंकरांनी त्या कलिकेच्या सौरभ-सौंदर्याने लोभावून जाऊन, तिच्याविषयी त्यांना वाटलेलें आकर्षण आनंदाने

मान लववून भाष्यारंभीं व्यक्त करून तुमचें-आमचें तिच्याकडे मुद्दाम लक्ष वेधलें आहे.

≑

सिद्ध होण्यासाठी, विद्यामृताच्या लाभाने चिरकृतार्थ होण्या-साठी आपल्याला आधी साधक बनलें पाहिजे.

हें साधक बनणें म्हणजे काय ?

जप-पूजा-प्रार्थना, ध्यान-धारणा, वाचन-मनन, विभिन्न धार्मिक अनुष्ठानें इत्यादि साधना जो करतो तो साधक, अशी सर्वसाधारण समजूत असते. पण ती अर्थातच केवळ 'समजूत'च होय. शास्त्र आपल्याला असंदिग्धपणें सांगतें की 'साधक' ही एक वृत्ति (attitude) आहे, ती मनाची एक भूमिका आहे, ती एक आध्यात्मिक अवस्था आहे. पूजा-जप-ध्यान-पठनादि धार्मिक अनु-ष्ठानें करणारा मनुष्य 'साधक' असेलच असें नाही. पूजा-जपादि धर्मकृत्यें हीं 'साधने'चें बहिरंग होत; जीवनविषयक एक विशिष्ट वृत्ति ही साधनेचें अंतरंग होय. प्राण आणि शरीर यांचा जो संबंध, तोच ही 'वृत्ति' आणि हीं 'धर्मकृत्यें' यांचा असतो.

म्हणूनच आपल्या सर्व आध्यात्मिक ग्रंथांच्या प्रारंभीं ह्या अध्यात्मविद्येचा 'अधिकारी' कोण ह्याची चर्चा अपरिहार्यपणें आढळत असते. ब्रह्मविद्येच्या लाभास पात्र होण्यासाठी, तिचे अधिकारी ठरण्यासाठी एक विशिष्ट वृत्ति — विवेक-वैराग्यजनित मुमुक्षा अंगीं मुरलेली असावी लागते.

ही पात्रता, हा अधिकार कमावणें म्हणजेच 'साधक' बनणें होय.

ह्या पात्रतेच्या वा अधिकाराच्या लाभासाठी, म्हणजेच 'साधक' बनण्यासाठी आवश्यक असलेल्या विवेक-वैराग्य-शम-

दमादि गुणांची चर्चा कित्येक आध्यात्मिक ग्रंथांमधे तत्त्वांच्या वा principles च्या रूपांत केलेली आढळते. आम्हांला कठ उपनिषदाचें दान देणाऱ्या ऋषिवर्यांनी आपल्या कठ उपनिषदांत अधिकाराची वा साधकत्वाची अशी तात्त्विक चर्चा न करीत बसतां, नचिकेत्याच्या रूपाने अधिकाराचा वा यथार्थ साधकाचा एक मूर्त आदर्शच तुमच्या-आमच्या समोर ठेवला आहे. म्हणतात ना की example is better than precept – उपदेशापरीस उदाहरण श्रेष्ठ.

कठ उपनिषत् आपल्याला प्रदान करणाऱ्या ऋषिश्रेष्ठांनी, स्वत:ची समाधिलब्ध ब्रह्मविद्या तुम्हांआम्हांला देतांना, ती समजण्यास, ग्रहण करण्यास सोपी जावी म्हणून यम आणि नचिकेता या दोघांच्या संवादाच्या रूपाने दिली आहे. यमधर्म हे ब्रह्मविद्येचे आदर्श आचार्य वा प्रदाते आहेत आणि नचिकेता हा त्या ब्रह्मविद्येचा ग्रहीता वा यथार्थ 'साधक' आहे.

हा नचिकेता, हा यथार्थ 'साधक' तुमच्या-आमच्या नजरेंतून सुटूं नये म्हणूनच जगद्गुरु श्रीशंकराचार्यांनी भाष्यारंभीं यमधर्मा-बरोबर त्यालाहि नमस्कार केला आहे.

त्या नचिकेत्याचा आदर्श समोर ठेवून, त्याच्या उदाहरणा-नुसार स्वत:चें जीवन-मन घडवून आपण प्रथम 'साधक' बनावयास हवें. तरच सिद्धीची वा अमृतानुभवलाभाची आपल्या जीवनांत शक्यता.

३

ब्रह्मविद्याचार्य यमधर्मांनी पुढे विद्याप्रदानाच्या ओघांत नचि-केत्याला सांगितलें आहे--

"श्रवणायाऽपि बहुभिः यो न लभ्यः
शृण्वंतोऽपि बहवो यं न विद्युः ।
आश्चर्यो वक्ता कुशलोऽस्य लब्धा
आश्चर्यो ज्ञाता कुशलानुशिष्टः ।।" (१,२,७.)

—"नचिकेत्या, ज्याला श्रेयाची, ब्रह्मविद्येची वा अमृतत्वाची खरोखर ओढ लागली आहे असे तुझ्यासारखे साधक फार विरळ असतात. जगाकडे बघितल्यास तुला आढळून येईल की या जगांत असे कितीतरी – असंख्य – लोक आहेत की ज्यांनी ह्या आत्म्या-संबंधी – जीवनांतील ह्या अंतिम सत्यासंबंधी – ऐकलें देखील नसतें. ज्यांनी ह्या आत्मतत्त्वासंबंधी ऐकलें आहे अशा लोकांमधे परत खरोखर पवित्र हृदयाचे लोक फार थोडे असल्यामुळे, ऐकूनहि कांही लाभ झाला नाही अशीच अनेकांची गत असते. ह्या आत्मतत्त्वाचा नीट बोध करून देईल असा आचार्य फारच क्वचित् आढळतो, आणि अशा गुरूकडून आत्मतत्त्व श्रवण करून त्याचा प्रत्यक्ष लाभ करून घेणारा साधकहि तद्वतच क्वचितच आढळतो. असा गुरु आणि असा साधक हे अत्यंत आश्चर्यकारक होत, अत्यंत कुशल व्यक्ति होत."

अशा आश्चर्यकारक आणि कुशल आचार्याचा आणि साधकाचा आदर्श कठ उपनिषदाच्या ऋषींनी यमधर्म आणि नचिकेता यांच्या रूपाने आपल्या समोर ठेवला आहे. ब्रह्मविद्या प्रदान करणाऱ्या आचार्याला नमन करणें परंपरेला धरूनच आहे. पण जगद्गुरु श्रीशंकराचार्यांनी ब्रह्मविद्याचार्य यमधर्माबरोबरच ब्रह्मविद्येच्या यथार्थ साधक नचिकेत्यालादेखील नमस्कार करून अत्यंत मार्मिकपणें, अत्यंत हळुवारपणें अध्यात्ममार्गावरील 'अधिकारा'चें वा 'साधक' बनण्याचें महत्त्व आणि माहात्म्य

आमच्या हृदयावर बिंबविलें आहे.

नचिकेत्याचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून आपण चालूं तरच आपलें जीवन घडणार, तरच आपण ही अध्यात्मविद्या आत्मसात् करून धन्य होऊं शकणार.

२

कठोपनिषदाच्या ऋषींनी यम आणि नचिकेता यांच्या संवादाच्या रूपाने स्वतःची समाधिपूत ब्रह्मविद्या आपल्याला दिली आहे. येथे एक गोष्ट लक्षांत ठेवावयास हवी. ती ही की, हा यम-नचिकेता संवाद ही एक 'आख्यायिका' आहे.

हें येथे आवर्जून सांगण्याचें एक मोठें कारण आहे. तें कारण असें की, या यम-नचिकेता 'संवादा'कडे आपण 'आख्यायिका' या भावनेने न बघितल्यास आपल्या मनांत संभ्रम वा घोटाळा उत्पन्न झाल्याखेरीज राहणार नाही. 'हा कोवळा पोर यमाच्या घरीं जातो, तिथे यम त्याला हें आत्मज्ञान देतो' इत्यादि कथन 'बुद्धिवादा'ने परीक्षूं गेल्यास लटकेंच ठरणार. आणि मग आपल्या मनांत साहजिकच येणार की जर ही कथाच लटकी, तर मग तिच्यांतील ज्ञानहि तसेंच नसेल कशावरून ?

एवढ्यासाठी अगदी पहिल्याच मंत्रावरील भाष्याच्या सुरवातीस आचार्य श्रीशंकर आपल्याला आवर्जून सांगावयास विसरले नाहीत की —"**तत्र आख्यायिका विद्यास्तुत्यर्था**" —"यम आणि नचिकेता यांचा संवाद ही एक आख्यायिका आहे. प्रत्यक्ष यमधर्माने — मृत्यूच्या देवतेनेच — मृत्यूचें रहस्य नचिकेत्याला सांगितलें — अशा स्वरूपाच्या ह्या आख्यायिकेने त्या रहस्यविद्येचें महत्त्व आपल्या मनावर ठसतें. एवढ्याच हेतूने ही आख्यायिका ऋषींनी उपयोजली आहे."

सारांश, उगीचच वा अगदी अनाठायीच 'बुद्धिवादा'चा —

rationalism चा — झटका येऊन त्या झटक्यांत ही गोष्ट अक्षरशः घेतल्यास तींत सांगितलेल्या महान् सत्याविषयी अकारणच किंतु निर्माण होऊन आपण त्या परम सत्याला पारखे होऊन बसूं. म्हणून आचार्य श्रीशंकर आपल्याला सांगून ठेवत आहेत की ह्या गोष्टीचा आपण भाव (spirit) घ्यावयास हवा, बाह्य आकार (form) नव्हे.

३

काय आहे ती आख्यायिका — तिचा बाह्य आकार नि तिचा भाव ?——

४

जुन्या काळची गोष्ट आहे. भारताचें गगन यज्ञीय धूमाने भरून गेलेलें असे, भारताच्या हवेंत यज्ञीय आहुतींचा पवित्र गंध सदा भरलेला असे. ऐहिक आणि पारलौकिक इच्छितांच्या लाभासाठी यज्ञ हें साधन लोक प्रामुख्याने हाताळीत असत. अशा काळांतील गोष्ट.

आज वाजश्रवस ऋषींचा आश्रम उत्साहाने, आनंदाने भारावून गेला होता. समस्त आश्रमभर उत्सवाचें मंगल वातावरण दरवळत होतें. यज्ञमंत्रांच्या गंभीर, पावन घोषाने सारा आश्रमपरिसर निनादत होता. वाजश्रवस ऋषींचे पिता अन्नदानाबद्दल प्रसिद्ध होते. वाज म्हणजे अन्न, आणि श्रव म्हणजे कीर्ति. वाजश्रवस ऋषींच्या वडिलांचें नांवच मुळी ‘वाजश्रवा’ म्हणजेच ‘अन्नदाता’ असें पडून गेलें होतें. अशा या थोर पित्याच्या कुळीं जन्मास आलेल्या वाजश्रवस ऋषींनी ‘विश्वजित्’ नांवाचा यज्ञ केला होता. आज होती त्या यज्ञाची सांगता — उद्यापन. आणि म्हणूनच आज आश्रमांत एवढा उल्हास.

होतां होतां, ज्यांनी तें यज्ञकृत्य समापन्न केलें, त्या पुरोहितांना

आणि उपस्थित ऋषींना दक्षिणा देण्याची वेळ आली. यजमानाने ज्यांत आपल्या सर्वस्वाचें दान करावयाचें असतें असा हा 'विश्वजित्' यज्ञ वाजश्रवस ऋषींनी केला खरा. पण वाजश्रवस ऋषि असावेत तितके प्रामाणिक नव्हते – ओठांत एक आणि पोटांत एक असा त्यांचा थोडासा प्रकार होता. 'विश्वजित्' यज्ञांत वस्तुतः यजमानाने आपलें सर्वकांही दान करावयाचें असतें. वाजश्रवसांनी मनाशीं 'सर्वकांही'चा, 'ज्याचा आपल्याला कांही उपयोग नाही तें सर्वकांही' असा सोईस्कर अर्थ केला ! त्या काळीं गाय हेंच लोकांचें धन होतें. दक्षिणा म्हणून गोधन वांटतांना वाजश्रवस ऋषींनी अशा कांही गाई वांटावयास काढल्या की ज्या अगदी म्हाताऱ्या जर्जर होऊन कायमच्या आटून पूर्णपणें निरुपयोगी होऊन गेल्या होत्या ! आपल्या असल्या 'सर्व' गाई वाजश्रवसांनी दक्षिणा म्हणून द्यावयास सुरुवात केली !

ह्या वाजश्रवसांचा नचिकेता नांवाचा एक मुलगा होता. प्रस्तुत घटनेच्या वेळीं नचिकेता लहानच होता – बाल्य ओलांडून त्याने तारुण्यांत पाऊलहि ठेवलें नव्हतें. पण म्हणून काय झालें ? नचिकेता असामान्य शुभ संस्कार घेऊनच जन्माला आला होता. साहजिकच बापाचा तो अत्यंत लाडका, अतिशयच आवडता होता. इतर मुलें यज्ञाच्या उत्सवांत भाग घेण्यांतच दंग होतीं, नचिकेता यज्ञाचा विधि अवलोकन करण्यांत मग्न होता. चांगल्याचांगल्या गाई तशाच बाजूस ठेऊन ह्या असल्या होत्या नव्हत्या तेवढ्या साऱ्या मरतुकड्या गाई याप्रमाणे दक्षिणा म्हणून वांटतांना आपल्या वडिलांना बघून बाल नचिकेत्याचे शुभ संस्कार जागे झाले. परमेश्वरावरील आणि धर्मज्ञपुरुषांच्या वचनावरील त्याच्या हृदयांतील सुप्त श्रद्धा एकाएकी जागृत झाली. यज्ञकर्म केल्याने सुफल लाभतें

ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम
क्रमांक ........ नोंद दि:


खरें, पण तें असें अप्रामाणिकपणें केल्यास, मनापासून न केल्यास यज्ञपुरुष रुष्ट होऊन सुफल तर लाभत नाहीच, पण उलट अखेर दु:खाची प्राप्ति होते ही धर्मज्ञांची शिकवण नचिकेत्याला आठवली. नचिकेता प्रामाणिक होता. त्याने विचार केला – 'विश्वजित् यज्ञामधे यजमानाने आपली सर्व संपत्ति दान देऊन टाकावयास हवी. मीहि तर बाबांची संपत्ति वा धनच आहें. बाबांनी खरोखर सर्वस्वाचें दान करण्याचें टाळलें आहे. त्यांचें आवडतें धन, त्यांचें सर्वस्वच असा मी, मी स्वत:चेंच दान करवून घेऊन बाबांना सर्व धनाच्या, सर्वस्वाच्या दानाचें पुण्यफल प्राप्त करून देईन. पुत्र या दृष्टीने हें माझें कर्तव्यच नाही काय ? या प्रसंगीं मीं पुत्रधर्म पाळावयास नको काय ?' आपल्याशींच असा विचार करून नचिकेता वडिलांजवळ गेला आणि त्यांना म्हणाला, "बाबा, दक्षिणा म्हणून तुम्ही मला कुणाला दान देणार आहांत ?" वाजश्रवसांनी पोरबुद्धि म्हणून प्रथम त्याच्या बोलण्याकडे लक्षच दिलें नाही. पण नचिकेता तें पोरबुद्धीने म्हणाला नव्हता. मोठ्यामोठ्यांतहि क्वचितच आढळेल इतक्या सखोल आस्तिक्यबुद्धीने, प्रगाढ भक्ति-विश्वासाने प्रेरित होऊन तो तें म्हणाला होता. वडील लक्ष देत नाहीत हें बघून त्याने तोच प्रश्न त्यांना पुन्हापुन्हा विचारावयास सुरुवात केली. फाजील धिटाई करून पोरटा उगाच लहान तोंडीं मोठा घास घेऊन आपल्या धार्मिकतेचें प्रदर्शन करीत आहे असें वाज-श्रवसांना वाटलें. नचिकेत्याचा सद्गुण त्यांना दुर्गुण वाटला. ते रागावले. आणि रागाच्या भरांत नचिकेत्याच्या अंगावर खेकसून म्हणाले – "तुला होय ? तुला मीं यमाला दान दिलें आहे."

ज्यांत यजमानाला स्वत:च्या सर्वस्वाचें दान करावें लागतें त्या विश्वजित् यज्ञाची सांगता चालू होती – दक्षिणा देणें सुरू झालें

होतें. अशा ऐन उद्यापनाच्या वेळीं पित्याने उच्चारलेले वरील शब्द ऐकून नचिकेता सचिंत झाला. आपल्यासारख्या सेवापरायण आज्ञाधारक सुपुत्राला यमास देऊन पिता काय साधणार आहे हें नचिकेत्याला कळेना. रागाच्या भरांत पित्याने हे शब्द उच्चारले असले पाहिजेत याविषयी त्याला संशय राहिला नाही. पण म्हणून काय झालें ? यज्ञ संपत आला आहे, समोर यज्ञीय अग्नि धगधगत आहे, त्या अग्निदेवतेसमोर असल्या या वेळीं उच्चारलेले शब्द खरे केलेच पाहिजेत — उच्चारलेलें दान दिलें गेलेंच पाहिजे असा बाल नचिकेत्याने मनाशीं निश्चय केला. पित्याच्या सत्यपालनासाठी स्वतःच्या समस्त सुखांना आनंदाने तिलांजलि देणारे प्रभु रामचंद्र ज्या भूमींत अवतीर्ण झाले, त्याच मातींतून नचिकेता जन्मला होता. श्रद्धा, विश्वास, आस्तिक्यबुद्धि, धर्मप्रेम इत्यादि हृदयांत वसत असल्यामुळेच निष्कपटपणें अत्यंत कठोर अशा सत्याच्या पालनास नचिकेता सिद्ध झाला. कशा प्रामाणिकपणाने कर्मानुष्ठान करावयास हवें हें नचिकेता आपल्या असीम स्वार्थत्यागाने दाखवून देत होता. चुकार, मतलबी, हिशेबी वाजश्रवसाच्या पार्श्वभूमीवर यथार्थ साधक अशा नचिकेत्याचें — प्रस्तुत कथेच्या नायकाचें चित्र किती खुलून दिसतें वरें !

पित्याचें वचन खोटें ठरून तो यज्ञफलापासून वंचित होऊं नये, पित्याचें कसल्याहि प्रकारें अकल्याण होऊं नये म्हणून नचिकेता यमसदनास जावयास निघाला. आता वाजश्रवसाच्या पश्चात्तापाला सीमा राहिली नाही. तो पुत्राचा मार्ग रोधूं लागला. पण नचिकेत्याने त्याची समजूत घातली. असत्य आचरण करून कधीच मंगल होत नसतें, म्हणून ह्या क्षणस्थायी जीवनाचा मोह सोडून माणसाने सत्याचें पालन करण्यांतच त्याचें कल्याण आहे हें त्याने आपल्या

पित्याला समजून सांगितलें. आणि पित्याचें वचन खरें करण्यासाठी, पित्याला असत्य भाषणाचें पाप लागून त्याचें अकल्याण होऊं नये म्हणून पुत्रधर्म पालन करीत, स्वकर्तव्य बजावीत नचिकेता यमगृहीं जाण्यास निघाला.

३

आपल्या अपरिसीम पातिव्रत्याच्या पुण्यबलाने, सत्यवानाचें सूक्ष्म शरीर घेऊन जाण्यास आलेले यमधर्म सावित्रीला दिसूं शकले होते आणि ती सती साध्वी त्यांच्या पाठोपाठ जाऊं शकली होती. स्वत:च्या असीम सत्यनिष्ठेच्या बळावर बाल नचिकेताहि निर्विघ्नपणें यमपुरींत जाऊन उपस्थित झाला. नचिकेता यमधर्मांच्या गृहीं जाऊन पोहोचला, पण यमराज त्या वेळीं प्रवासाला गेले होते. नचिकेता यमधर्मांच्या दर्शनासाठी, पित्याच्या वचनानुसार, पित्याचे शब्द खरे करण्यासाठी यमधर्मांच्या चरणीं आत्मबलिदान करण्याकरता तिथे आला होता. यमराज घरीं नाहीत असें पाहून नचिकेत्याने ते परत येईपर्यंत तिथेच वास करण्याचा संकल्प केला. आधी यमधर्मांचें दर्शन आणि मगच इतर कांहीहि, असा त्याचा निर्धार होता. त्याने अन्नाकडे दृष्टि टाकली नाही की पाण्याला स्पर्श केला नाही. त्या बाल अतिथीचें तेज आणि निर्धार जो पाही तो मुग्ध होऊन जाई. एक दिवस गेला, दुसरा दिवस उलटला, तिसरा दिवस लोटला–अन्नपाण्याला स्पर्शहि न करतां नचिकेता एकाच जागीं स्थित होता. यमराज कसे असतील, ते आपल्याला काय म्हणतील, आपण त्यांना काय म्हणायचें, कसें म्हणायचें, नतर पुढे काय होणार इत्यादि विचार त्याच्या मनांत घोळत होते. इकडे साऱ्या घरांत कसें एक अनुकंपेचें, सहानुभूतीचें, कळवळ्याचें, भयविस्मयाचें वातावरण निर्माण झालें होतें. पण नचिकेत्याचें

कशाकडेच लक्ष नव्हतें. त्याचें लक्ष होतें फक्त–मृत्युदेवतेच्या येण्याकडे.

अखेर चवथ्या दिवशीं यमधर्म प्रवास संपवून घरीं परत आले. येतांच त्यांना इत्थंभूत सर्व वर्तमान कळलें.

'एक वालतपस्वी अतिथि तीन दिवस माझी वाट बघत माझ्या दारीं उपाशी ?'–यमधर्म अतिशय हळहळले, अतिशय कळवळले. ते थोर होते. ते अतिथिसेवेचा धर्म जाणत होते. कुठे जीवांच्या निग्रहअनुग्रहास समर्थ अशी मृत्युदेवता आणि कुठे मर्त्यलोकींचा सामान्य रहिवासी नचिकेता. पण धर्मज्ञ यमधर्मांनी अतिथिसेवाधर्माचा आदर्श दाखविण्यासाठी स्वतः त्या बाल-अतिथीचें योग्य तें स्वागत केलें. आणि तेवढ्यानेहि संतुष्ट न होतां, त्यांनी आपण होऊन 'हे प्रियदर्शन ऋषिकुमारा, तूं तीन दिवस उपवास करून माझ्या घरीं होतास. म्हणून प्रत्येक दिवसासाठी एक, याप्रमाणे तुझ्या इच्छेस येतील ते तीन वर तूं मला माग, मी ते तुला अत्यानंदाने देईन' असें नचिकेत्याला अभिवचन दिलें.

४

यमधर्माची स्निग्ध, स्नेहल, दिव्य मूर्ति आणि सदय, वत्सल वागणूक पाहून नचिकेता मुग्ध होऊन गेला. कृतज्ञतेने त्याचें हृदय भरून आलें. निश्चित होत्साता तो त्यांना म्हणाला, "भगवन्, आपण जर मला वर देऊं इच्छीतच असाल तर पहिला वर मी असा मागतों की 'आपला मुलगा यमाच्या घरीं जाऊन काय करील' इत्यादि विचारांनी माझ्या पित्याला माझ्याबद्दल जी काळजी वाटत असेल तिच्यापासून तो मुक्त होवो. त्याचें मन प्रसन्न होवो. माझ्यावरचा त्याचा राग नाहीसा होवो. आणि ज्या वेळीं आपल्या अनुज्ञेने मी येथून स्वगृहीं परत जाईन त्या वेळीं

मला तो ओळखूं शको."

सत्याच्या पालनाचा, धर्मपालनाचा प्रश्न आला होता तेव्हा नचिकेत्याने पित्याचें सुखदु:ख, स्वत:चें सुखदु:ख, पित्याची त्याच्यावरील आसक्ति, त्याची स्वत:ची पित्यावरील आसक्ति, इत्यादि कशानेहि आपला विवेक झाकाळूं दिला नाही, कशानेहि तो स्वकर्तव्यच्युत वा स्वधर्मच्युत झाला नाही. पिता रागावला, पण नचिकेता शांत होता, त्याने आपला विवेक लोपूं दिला नाही. त्यावर कोणतीच अनिष्ट प्रतिक्रिया झाली नाही. पित्याचें हित करण्याकरता, पुत्रधर्माचें पालन करण्याकरताच त्याने यमसदनीं जाण्याचें दिव्य पत्करलें होतें – एवढा स्वार्थत्याग अंगीकारला होता – नि:शंकपणें आत्मबलिदान केलें होतें. आता यमराजांची प्रसन्नता लाभल्यावर तो हा पहिला वर मागत आहे तोहि पित्याच्या कल्याणाच्या इच्छेनेच, पुत्रधर्माच्या, पुत्रकर्तव्याच्या पालनाच्या प्रेरणेनेच. तुम्हांआम्हां सर्वसाधारण माणसांप्रमाणे क्षणभंगुर सुखदु:ख, लौकिक लाभनुकसान वा सांसारिक आसक्ति इत्यादींनी चालित न होतां, आदर्शप्रेमी, आदर्शनिष्ठ नचिकेता कदापि मार्गभ्रष्ट न होतां स्वधर्माचें स्वकर्तव्याचें सानंद पालन करीत आहे.

जगांत राहावयाचें म्हणजे आपल्याहि जीवनांत असले प्रसंग येणारच. सुखदु:ख, लाभनुकसान, रागलोभआसक्ति आणि कर्तव्य, स्वधर्म, सत्यपालन' इत्यादींमध्ये संघर्ष, झगडा, लढा उत्पन्न झाला असतां आपण कसें वागावयास हवें ह्याचें प्रात्यक्षिकच कठ उपनिषदाचे ऋषि नचिकेत्याच्या उदाहरणाद्वारा आपल्यापुढे ठेवीत आहेत. स्वधर्माचें, स्वकर्तव्याचें असें निष्ठायुक्त, प्रामाणिक अनुष्ठान करीत गेल्यानेच हळूहळू चित्त शुद्ध होत

जाऊन माणूस अखेर जीवनांतील आणि जगांतील अंतिम सत्याच्या —त्या सत्यस्वरूप भगवंताच्या चिरकृतार्थकारी लाभास पात्र होऊं शकत असतो. जोंवर त्या निरक्षेप (Absolute) सत्यस्वरूप भगवंताच्या प्राप्तीची खरीखरी, प्रबल ओढ निर्माण होऊन, त्या डोळस वैराग्याने जगाचा व स्वतःचा विसर पडून माणूस जागतिक कर्तव्यपालनाच्या 'पलीकडे' जात नाही तोंवर 'अलीकड'चें म्हणजे सापेक्ष सत्य जो स्वधर्म वा स्वकर्तव्य, त्याचें त्याने पूर्णान्तः-करणाने, निष्ठायुक्त पालन करावयासच हवें. त्यांतच माणसाचें कल्याण आहे. नचिकेत्याच्या दृष्टान्तांतून कठोपनिषदाचे ऋषि तुमच्या-आमच्या अंतःकरणावर हेंच ठसवूं-बिंबवूं इच्छीत आहेत.

असो, नचिकेत्याच्या पहिल्या वराला यमधर्मांनी 'तथास्तु' म्हणून आशीर्वाद दिला. त्यांच्या अनुज्ञेने नचिकेत्याने मग दुसरा वर मागावयास सुरुवात केली—

५

"प्रभो, विविध भोग भोगून माणसाला सुखी व्हावें असें वाटत असतें. त्यासाठी आम्ही नाना प्रयत्नहि करीत असतों. परंतु नाना रोग, म्हातारपण, तऱ्हतऱ्हेच्या अभाव-अडचणी, अकालमृत्यु इत्यादींनी मानवी सुखप्रवाह नेहमीच गढूळ, खंडित होत असतो. या सर्व अडथळ्यांवर मात करून निश्चितपणें, निर्वेध-पणें सुखभोग कसा करतां येईल हें आपल्याकडून जाणण्याची माझी इच्छा आहे. ब्रह्मलोक नांवाच्या स्वर्गांत जाऊं शकल्यास हें शक्य आहे असें म्हणतात. तरी त्या स्वर्गलोकीं जाण्याला साधन-भूत होणारी जी अग्निविद्या, ती आपण मला सांगावी हें मी दुसऱ्या वराने आपल्याला मागत आहें."

नचिकेत्याच्या इच्छेनुसार मग यमधर्मांनी त्याला ती

अग्निविद्या प्रदान केली.

ही अग्निविद्या म्हणजे आपल्या ह्या व्यक्त जगांतील प्रत्येक वस्तूच्या नि व्यक्तीच्या ठायीं वास करणाऱ्या विराट पुरुषाची वा 'सोपाधिक' ब्रह्माची उपासना होय. ह्या यज्ञांतील यज्ञीय अग्नि हा त्या विराट पुरुषाचें प्रतीक होय. त्या बोधाने त्या अग्नींत आहुति प्रदान करून हा यज्ञ—ही विराटोपासना—ही विराट पुरुषाची अर्चना करावयाची असते. कर्म आणि ज्ञान यांचा याप्रमाणे समुच्चय वा मिलाफ करून यज्ञानुष्ठान केल्याने यजमान ब्रह्मलोकीं जाऊन दीर्घकालपर्यंत श्रेष्ठ असें सुख उपभोगूं शकत असतो.

३

सुख प्रत्येकाला हवें असतें. त्यासाठी प्रत्येकजण यथाशक्ति, यथामति धडपडहि करीत असतो—नाना कर्में करीत असतो. परंतु 'केवळ' सुखोपभोगाच्या प्रेरणेनेच जर माणूस प्रेरित झाला तर त्याच्यांत आणि पशूंत फारसें अंतर उरत नाही. धर्म-अधर्म, नीति-अनीति, उच्च जीवनमूल्यें इत्यादींना तो हळूहळू पारखा होत जातो. आणि अखेर, सारे विधिनिषेध झुगारून देऊन ह्या सुखासाठी केलेल्या अनिर्बंध, बेवंद कर्मांचे घोर परिणामहि त्याला भोगावे लागतात. माणूस वा माणसांची समष्टि जो समाज वा देश हे जर निव्वळ भोगसुखाच्याच पाठीमागे लागले तर त्याच्या काय प्रतिक्रिया होतात, त्यांचा हा सुखवादच त्यांना कसा दुःखी करतो, माणूस हळूहळू माणुसकीला कसा मुकत जातो हें आधुनिक जगांतील ज्या देशांनी केवळ भोगसुखच दृष्टीपुढे ठेवून आपलीं वैयक्तिक नि राष्ट्रीय जीवनें घडविण्याचा प्रचंड खटाटोप केला आहे त्यांच्या उदाहरणांवरून स्पष्ट दिसण्यासारखें आहे.

म्हणूनच कठ उपनिषदाचे ऋषिवर्य या द्वितीय वराच्या प्रसंगाद्वारा आपल्याला सांगत आहेत की, ऐहिक सुखोपभोगाच्या तुमच्या ह्या अदम्य, कधीच नि कशानेहि कायमच्या तृप्त न होणाऱ्या स्पृहेंत जर तुम्ही अनिर्बंध वाहवलांत तर अखेर तुमचें सुखच गढूळ होईल, तेंच तुम्हांला दुःखी करील, त्यासाठी केलेल्या बेबंद कर्मांचे भयंकर दुष्परिणामहि तुम्हांला भोगावे लागतील. म्हणून, सर्वाभूतों विराजमान असणाऱ्या परमेश्वराला अर्पण करून तुम्ही सुखें भोगण्याचा यत्न करा; आपल्या जीवनांत, आपल्या कर्मांत त्या विराटपुरुषाची वा सर्वभूतमय परमेश्वराची प्रतिष्ठा करा म्हणजे तुमचें जीवन सहजगत्याच धर्ममय, नीतिमय होईल, उच्चोच्च जीवनमूल्यें तुमच्याठायीं प्रकटूं लागतील, पशुत्व तुम्हांला ग्रासूं शकणार नाही. अशाने तुमचें जीवन मानवी, नव्हे, दैवी होईल. तुम्ही त्या मानाने अधिक सुखी होऊं शकाल, तुमचें सुख वारंवार गढूळ होण्याचें थांबेल, तें तितकेंसे प्रतिक्रियोत्पादक, दुःखपर्यवसायी होणार नाही.

ह्यालाच म्हणतात 'सकाम कर्म' वा 'कर्मकांड'. ह्या अशा कर्माचरणाने जी उन्नति, समृद्धि, सुखशांति लाभते तिला आपल्या ऋषींनी म्हटले आहे 'अभ्युदय'.

'भोगवाद' निराळा आणि 'अभ्युदय' निराळा. 'भोगवादा'चा पाया असतो 'जडवाद'—materialism. 'अभ्युदया'चा आधार असतो 'सर्वभूतमय परमेश्वर वा विराटपुरुष'.

'भोगवादा'ने माणूस अधिकाधिक स्वार्थी, क्रूर बनत जातो, हळूहळू राक्षस वा असुर होऊन जातो. 'अभ्युदया'ने माणसांतील दैवी प्रवृत्ति जाग्या होऊं लागून माणूस अखेर देवता बनतो.

'भोगवादा'ची कास धरल्याने माणूस जीवनाच्या गुंतो-

ळ्यांत आणखी आणखी गुंतत जातो, बंधनांमधे अधिकाधिक गुरफटत जातो. 'अभ्युदया'च्या साधनेने माणूस हळूहळू भोगाकडून त्यागाकडे वळत जातो–हळूहळू इंद्रियभोग्य समस्त सुखांची सान्तता, सीमितता, शून्यता, त्यांची असारता, त्यांचें स्वभावगत मिथ्यात्व, त्यांचें वैयर्थ्य, त्यांचा पोकळपणा, फोलपणा आकळूं शकतो. भोगसुखांचें स्वरूप याप्रमाणे आकळतां आल्यामुळे त्याच्या हृदयांत पार्थिव-स्वर्गीय समस्त भोगांविषयी अखेर निर्मल वैराग्याचा उदय होतो. विषयसुख आणि भगवदानंद यांमधील फरक, भिन्नत्व याप्रमाणे प्राणोप्राण आकळल्यामुळे अखेर तो त्या एकमेव सत्यस्वरूप, असीम-अनंत आनंदस्वरूप भगवंतासाठी हीं सारीं मानवी वा दैवी सुखें त्यागण्यास समर्थ होतो. अंतीं त्या सच्चिदानंदांत लीन होऊन जीवनाच्या सर्व गुंतागुंतींतून, समस्त बंधनांतून सुटून कायमचा कृतकृत्य, कृतार्थ होऊं शकतो. 'भोगवादा'ने हळूहळू बंधनें बळावतात, 'क्रमबंधन' ओढवतें, 'अभ्युदया'ने बंधनें हळूहळू शिथिल, ढिलीं होऊन 'क्रममुक्ति' साधते.

६

स्वकर्तव्याच्या पालनानेच, ऐहिक वा स्वर्गीय सुखाच्या (अभ्युदयाच्या) लाभानेच माणूस खरोखर कृतार्थ होणें शक्य आहे असा जर कठोपनिषदाच्या ऋषींचा अभिप्राय असता तर त्यांनी आपली ही 'आख्यायिका' येथेच संपविली असती. पण ती तशी येथे, अभ्युदयविषयक दुसऱ्या वराच्या शेवटीं संपत नाही. या दोन वरांनंतरहि नचिकेत्याने आणखी कांही मागावयाचें राहिलेंच. या दोन वरांच्या नंतरहि–जागतिक समस्त सुखांतील सर्वोत्कृष्ट असें ब्रह्मलोकींचें सुख प्राप्त करून घेण्याचें साधन लाभूनहि–नचिकेता अतृप्त, अकृतार्थच राहिला, त्याला आणखी एका

'वरा'ची गरज उरलीच.

साक्षात् स्वर्गसुखापेक्षाहि श्रेष्ठ असें कांही तरी नचिकेत्याला आता मागावयाचें होतें.

—इंद्रियजन्य, इंद्रियगम्य, इंद्रियभोग्य अशा पार्थिव वा स्वर्गीय कोणत्याहि सुखापेक्षा श्रेष्ठ, संपूर्ण, भिन्न, संपूर्ण पृथक्, अतींद्रिय, अवाङ्मनसगोचर, ज्यांत 'आणखी'ची तहान नाही असा चिरतृप्तिकारी आनंद लाभल्यानेच माणूस खरोखर, कायमचा कृतार्थ होऊं शकतो. हा आनंद त्याला कुठे 'जाऊन'—या वा त्या लोकीं जाऊन—'मिळवायचा' नसतो. तो आनंद त्याचें खरें स्वरूपच होय. त्या अनादि, अनंत, स्व-स्वरूपभूत आनंदाच्या शोधांतच माणूस कस्तुरीमृगाप्रमाणे जगांतील नाना वस्तूंमागे धावत असतो, या वा त्या लोकांत तो धुंडाळत असतो. या साऱ्या वेड्या शोधाशोधींत अंतीं त्याला उमजतें की तो आनंद, तो भूमानंद कुठे बाहेर नाही, तो त्याच्या आंतच, त्याच्या अंतरात्म्यांतच आहे.

तो आत्मानंद, तो स्वरूपानंद जिने प्राप्त होतो ती 'आत्मविद्या' नचिकेता आता तिसऱ्या वराने यमधर्मांना मागतो, आणि नचिकेता त्या परम पावन, अति गूढ आत्मविद्येच्या लाभास पात्र आहे किंवा नाही हें नीट पारखून ब्रह्मविद्याचार्य यमधर्म त्याला ती 'राजविद्या,' तें 'राजगुह्य' प्रदान करून धन्य करतात. असा या कठोपनिषदाच्या ऋषिश्रेष्ठांनी त्यांची समाधिलब्ध आत्मविद्या तुम्हां-आम्हांला सुकरतेने ग्रहण करतां यावी म्हणून रचलेल्या या यम-नचिकेता संवादरूपी आख्यायिकेचा यापुढील अतिशय हृद्य, अतिशय स्फूर्तिदायक, अतिशय आल्हाददायक भाग आहे.

३

काय आहे नचिकेत्याने यमधर्मांना मागितलेला तो

'तिसरा वर' ?—

——या, बंधूंनो आणि भगिनींनो, आपण त्या यथार्थ आचार्याच्या आणि आदर्श साधकाच्या त्या परमानंददायी, रोमांचकारी, परममंगल संवादाचा पुढील भाग सश्रद्ध, सोत्कंठ, नि शुचिर्भूत अंत:करणाने ऐकावयास सिद्ध होऊं या. . . .

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्र. ४००५८
क्रमां. १५५७ दि: ...
नों दि: २८/५/५५

# द्वितीय अध्याय

# मृत्यु-जिज्ञासा

**विषयप्रवेश**

राग-लोभ, लाभ-नुकसान, आसक्ति-मोह वगैरेंनी विचलित न होतां निरंतर आपलें कर्तव्य पार पाडीत जाणें, चांगल्या-वाईट, अनुकूल-प्रतिकूल कशाहि परिस्थितींत कर्तव्यनिष्ठा जागृत ठेवून स्वधर्मकर्म अविरत आचरीत जाणें खरोखर अत्यंत उदात्त, अत्यंत कल्याणकारक होय. लौकिक लाभ-नुकसान कस्पटाप्रमाणे लेखून कर्तव्याला, स्वधर्मनिष्ठेला वाहिलेलें नि:स्पृह जीवन अंत:संतोषाच्या दृष्टीने खरोखरच अत्यंत विलोभनीय असतें. जीवनाच्या ओघांत उद्भवणारा प्रत्येक प्रश्न अशी व्यक्ति आपल्या कर्तव्यनिष्ठेच्या मदतीने सोडविण्याचा प्रयत्न करीत असते.

जीवनाचा हा एक आविष्कार झाला. 'अभ्युदया'च्या प्रेरणेने प्रेरित झालेलें जीवन हा जीवनाचा आणखी एक आविष्कार होय – तऱ्हतऱ्हेचीं सुखें, ऐश्वर्य, विलास, सत्ता, सुबत्ता, प्राचुर्य इत्यादींनी रसरसलेलें समृद्ध जीवन ! आस्तिकतेला, नीतीला, माणुसकीला पारखें न होतां सतत सुखाची शिकार चालली आहे, जीवनांत निर्माण होणाऱ्या प्रश्नांना बेडरपणें तोंड देणें चाललें आहे – किती आकर्षक, किती मोहक जीवन हें ?

पण !

हे जीवनाचे 'आविष्कार' आहेत, संपूर्ण जीवन नव्हत. ज्याचे

हे दोन आविष्कार आहेत तें संपूर्ण 'जीवन' विचारांत घ्यावयाचें म्हणजे त्याच्या भल्याबुऱ्या इतरहि सगळ्या आविष्कारांबरोबरच विचारांत घ्यावी लागते जीवनाची परिणति–मृत्यु !

तुमचें जीवन कितीहि कर्तव्यनिष्ठ असो, केवढेंहि अभ्युदय-प्रतिष्ठ असो, की कसेंहि असो, ही त्याची अंतिम परिणति, हा मृत्यु काळ्याकभिन्न सावलीप्रमाणे त्याच्या मागोमाग घोटाळत असतो.

कर्तव्यनिष्ठेचा अंतःसंतोष, अभ्युदयाची समृद्धि मृत्यूच्या लोखंडी टाचांखाली बेदरद चुरडली जाते. या लोकांतल्या म्हणा की स्वर्गातल्या म्हणा, सर्व संतोषसुखांची हीच गत–"**आब्रह्मभुवनाल्लोकाः पुनरावर्तिनोऽर्जुन**"–"जीवन, मग तें ह्या लोकांतील असो की ब्रह्मलोकांतील असो, तें संपतेंच, त्याला शेवट आहेच." पूज्यपाद स्वामी विवेकानंदांनी म्हटलें आहे–"मरण !–जीवनाविषयीचें सर्वांत भयंकर सत्य ! अलम दुनिया मृत्यूच्या रोखाने धावत आहे. प्रत्येक गोष्ट धुळीला मिळते. आमची प्रगति, आमचा मोठेपणाचा डोलारा, आमच्या सुधारणा, आमचे विलास, आमचें ऐश्वर्य, आमचें ज्ञान, झाडून साऱ्यांची एकच गति–तें विक्राळ मृत्युमुख. जीवनांत अगदी निश्चित जर कांही असेल तर तें फक्त हेंच–मरण . . . . जीवनाची, सौंदर्याची, सुबत्तेची, इतकेंच काय पण सद्‌गुणांची देखील मृत्यु अखेर चिता पेटवून देतो."

हें झालें जीवनांतील संतोषाविषयी नि समृद्धीविषयी !

आणि जीवनांतील प्रश्नांविषयी ?

जीवनाच्या ओघांत निर्माण होणाऱ्या प्रश्नांना नि समस्यांना कर्तव्यनिष्ठेने वा अभ्युदयाकांक्षेने तोंड देण्याचा, थोपवून धरण्याचा कितीहि आटापिटा केला, आणि कांही थोड्या मर्यादेपर्यंत तो कितीहि यशस्वी होतो आहेसें वाटलें तरी, जीवनांत असे कांही

विचित्र प्रश्न, अशा कांही अद्भुत समस्या उभ्या राहतात की ज्या सारें जीवनच उलटेंपालटें करून टाकतात, जीवनच नितान्त व्यर्थ, अगदी अर्थहीन करून टाकतात. जीवनांत उद्भवणाऱ्या असल्या विचित्र प्रश्न-समस्यांपैकी सर्वांत मोठा प्रश्न, सर्वांत मोठी समस्या म्हणजे – मृत्यु ! – समग्र प्रश्न-समस्यांचा मेरुमणि ! पूज्यपाद स्वामी विवेकानंदांनीच म्हटल्याप्रमाणे – "माणूस कसा अगदी जळूप्रमाणे ह्या पंचेंद्रियग्राह्य जगताला चिकटून पडत असतो. त्यावर तो इतका आसक्त असतो की कांही केल्या तो तें सोडूं इच्छीत नाही. पण, ज्यांत तो रात्रंदिवस वावरत असतो त्या ह्या बाह्य जगताला तो कितीहि खरें व कितीहि सारगर्भ समजत असेना, प्रत्येक व्यक्तीच्या, त्याचप्रमाणे प्रत्येक जातीच्या जीवनांत असा एक समय हटकून येतो की ज्या वेळीं आपोआप, इच्छा नसतांहि त्याला विचारावेसें वाटतें – 'दिसतें तें खरें तर ?' आपल्या पंचेंद्रियांवर ज्याने पूर्ण भरवसा टाकला आहे, आपलीं इंद्रियें आपल्याला फसवत तर नसतील ना असा पुसट संशय देखील ज्याला त्यांच्यासंबंधी येत नाही, ज्याच्या जीवनाचा पळ नि पळ कोणत्या ना कोणत्या तरी विषयोपभोगांतच खर्ची पडत असतो, मृत्यु चोरपावलांनी अशाच्याहि निकट येऊन उपस्थित होतो आणि मग अशाहि माणसाला विचारणें भागच पडतें – 'हें जग खरें आहे काय ?' ह्या पृच्छेचा उदय म्हणजेच धर्माचा प्रारंभ आणि तिचें निरसन म्हणजेच धर्माची समाप्ति. . . . एका क्षणांत जग नाहीसें होऊन जातें. एखाद्या तुटलेल्या कड्याच्या काठाशीं उभें राहून, खाली आ वासून पसरलेल्या अथाक दरींत ओणावून पाहतांना कितीहि कठोर मन असलें तरी तें मागे सरेल आणि विचारील – 'हें सारें खरें आहे काय ?' एखाद्या अदम्य हृदयाची सारी शक्ति पणास लावून

आयुष्यभरांत हळूहळू उभारलेले आशेचे सगळे मनोरे क्षणार्धांत पत्त्यांच्या बंगल्यासारखे ढासळून पार जमीनदोस्त होतात. ते खरे होते काय ? ह्या प्रश्नाचें उत्तर मिळालेंच पाहिजे. काळाने ह्या प्रश्नाची धार कधीच बोथट होणार नाही, उलट ती अधिकाधिक तीव्रच होत जाईल."

### नचिकेत्याची मृत्युजिज्ञासा

हा प्रश्न सध्या विचारला जात आहे, पूर्वी विचारला गेला होता, आणि पुढेहि विचारला जाणार आहे. जोंवर मृत्यु जीवनाचा ग्रास करीत राहणार आहे तोंवर हा प्रश्न पुन्हापुन्हा विचारला जाणार आहे.

अगदी अगदी प्राचीन काळीं, सुसंगत इतिहास जिथे पांगुळतो त्या पौराणिक युगाच्याहि आधीच्या रहस्यगूढ काळांत, मानवी जीवनाच्या अंधुक उषःकाळीं सुद्धा हा प्रश्न विचारला गेला आहे ! वेदकालांतील गोष्ट ! कठ उपनिषदामधील तीच यमनचिकेता यांच्या संवादाची आख्यायिका – कर्तव्याच्या संबंधांतला पहिला आणि अभ्युदयाविषयीचा दुसरा वर देऊन झाल्यावर, ज्या वेळीं यमराजांनी नचिकेत्याला तिसरा, म्हणजेच शेवटचा वर मागावयास सांगितला त्या वेळीं नचिकेता म्हणतो ––

> "येयं प्रेते विचिकित्सा मनुष्ये
> अस्तीत्येके, नायमस्तीति चैके ।
> एतत् विद्याम् अनुशिष्टस्त्वयाऽहं
> वराणाम् एष वरस्तृतीयः ।।"

––"भगवन्, मनुष्य मेला म्हणजे त्याच्या संबंधी हा संदेह निर्माण होतो : कोणी म्हणतात की तो आहे, कोणी म्हणतात तो

नाही. आपल्याकडून मला हें निश्चितपणें जाणून घ्यावयाचें आहे. तिसऱ्या वराने मी आपल्याजवळ हेंच मागत आहें."

≡

कर्तव्य वा अभ्युदय यांचें रहस्य जाणल्यानेच माणूस खरोखर तृप्त, कृतार्थ, कृतकृत्य होऊं शकतो असें जर कठोपनिषत्-द्रष्टया ऋषिश्रेष्ठांचें मत असतें तर त्यांनी आपली ही यम-नचिकेता संवादाची आख्यायिका दुसऱ्या वराच्या शेवटींच संपविली असती. परंतु तसें न होतां, आणखी एका वराने नचिकेता हा मृत्युविषयक प्रश्न यमधर्मांना विचारीत आहे. ह्याचा अर्थ हाच की, केवळ कर्तव्याच्या पालनाने वा अभ्युदयाच्या लाभाने माणूस खरोखरी कृतार्थ होऊं शकत नाही, माणसाला चिरकृतार्थ होण्यासाठी त्या उभयांहून वेगळें, उच्च असें आणखी कांहीतरी लाभावयास हवें ही वस्तुस्थिति, हें सत्य ह्या 'तिसऱ्या' वराच्या प्रसंगाने कठोपनिषत्-प्रदाते ऋषिवर्य आमच्या मनावर ठसवीत आहेत.

'जगणाऱ्या'चें खरें स्वरूप मृत्यूमधूनच कळून येतें ! जगणाऱ्याचें खरें स्व-रूप न जाणतां जगलेलें जीवन कृतार्थ होणें कदापि शक्य नाही हें निराळें सांगावयास नकोच. स्वस्वरूपाच्या – आपण खरोखर कोण आहोंत ह्याविषयीच्या अज्ञानाच्या अंधारांत घालविलेलें जीवन म्हणजे निव्वळ अर्थहीन धडपड होय – मग ती कर्तव्यपालनार्थ असो, की अभ्युदयलाभार्थ असो, की आणखीहि कशासाठी असो, नि कितीहि चांगली, थोर, उदात्त असो. स्वतःविषयीच्या, जीवनाविषयीच्या अंधारांतल्या कोणत्याहि, केवढ्याहि मोठ्या नि चांगल्या आदर्शाच्या पाठलागाने माणसाच्या पदरीं अखेर आशाभंग आल्याखेरीज कदापि राहणार नाही. आपण – हा जगणारा – 'वस्तुतः' कोण, त्याचें खरें स्व-रूप काय हें जाणून

जगलेलें जीवनच जीवन होय – स्वस्वरूपज्ञानाच्या परम मंगल, सकलसंदेहनाशी प्रकाशाने तें उजळलेलें असतें. साफल्य, तृप्ति, कृतार्थता हे असल्या जीवनाचे गुणधर्मच होत, त्याचा स्वभावच होत. आणि म्हणूनच, कर्तव्यनिष्ठ, अभ्युदयप्रतिष्ठ प्रभृति स्वस्वरूप-विषयक अंधारांतल्या कोणत्याहि जीवनाने कदापि न लाभणारी कृतकृत्यता प्राप्त करून घेण्याकरता 'तिसऱ्या' वराद्वारा नचिकेत्याची ही मृत्युजिज्ञासा, म्हणजेच – आत्मजिज्ञासा !

### नचिकेत्याच्या मृत्युजिज्ञासेचें स्वरूप

असो. ब्रह्मविद्याचार्य यमराजांनी आत्मजिज्ञासु नचिकेत्याच्या ह्या मृत्यूसंबंधीच्या पृच्छेला काय उत्तर दिलें हें बघण्यापूर्वी, नचिकेत्याची ही पृच्छा, नचिकेत्याचा हा मृत्युविषयक प्रश्नच आपण नीट विश्लेषून समजून घेऊं या – तो आत्मसात्, हृदयसात् करण्याचा यत्न करूं या.

कारण, मृत्यूविषयी प्रश्न करणें ही कांही आगळी गोष्ट नाही. असंख्य लोकांनी मृत्यूविषयी प्रश्न विचारला आहे, असंख्य लोक तो विचारीत असतात, आणि असंख्य लोक तो पुढेहि विचारीत राहणार आहेत.

परंतु, एका बाजूला, "मेल्यानंतर काय होतें ?" – "अमुक तो मरण पावला, त्याचें काय झालें, त्याचा जन्म कुठे झाला ?" – अशा तऱ्हेचे मृत्यूविषयीचे सर्वसाधारण माणसांचे प्रश्न, वा "मृत्यू-नंतर जीव कोणत्या लोकीं आणि कसा जात असतो ?" – इत्यादि 'परलोकविद्याविशारदां'चे मृत्युविषयक प्रश्न, आणि दुसऱ्या बाजूला आत्मजिज्ञासु, मोक्षाकांक्षी नचिकेत्याचा मृत्यूसंबंधी प्रश्न, यांत बाह्यतः जरी साम्य भासत असलें तरी वस्तुतः काय, कुठे, कसा आणि किती फरक आहे हें नीट जाणून घेतल्याखेरीज,

यमराजांनी नचिकेत्याच्या प्रश्नाला जें आणि ज्या प्रणालीने वा ज्या पायऱ्यापायऱ्यांनी उत्तर दिलें त्याचें आपल्याला आकलन होणें कदापि शक्य नाही. फार काय, पण, तें नचिकेत्याच्या प्रश्नाचें उत्तर आहे हें देखील आपल्याला नीट कळूं शकणार नाही ! सर्वसाधारण माणसाला किंवा परलोकविद्याजिज्ञासूला, त्याच्या मृत्युविषयक प्रश्नाच्या उत्तरीं आत्मविद्या वा ब्रह्मविद्या सांगितली गेली तर तो गोंधळून जाईल ! आपल्या प्रश्नाचें हें उत्तर आहे हें त्याला पट-णारहि नाही ! नचिकेता तसा गोंधळला नाही. उलट, त्याच्या मृत्युविषयक प्रश्नाला, मृताचें वा जीवाचें खरें स्वरूप जो आत्मा, त्या आत्म्याचें वर्णन करून यमराजांनी उत्तर द्यावयास सुरवात करतांच, 'मला पाप-पुण्यांच्या पलीकडील, कार्य-कारणांहून वेगळ्या, त्रिकालातीत आत्म्याविषयी आपण आणखी सविस्तर, आपल्याला ज्ञात आहे तें सर्व सांगा' असें नचिकेता त्यांना म्हणाला. "तुला मी नाना तऱ्हेचे भोग, धनसंपत्ति, राज्य देतों, तूं हा मृत्यु-विषयक प्रश्न तेवढा विचारूं नकोस" असें जर साधारण माणसाला वा परलोकविद्याविशारदाला एखाद्या देवतेने म्हटलें तर 'प्रभो, मी आपल्या इच्छेबाहेर नाहीं' असें 'नम्र'पणें पुटपुटून तो मोठ्या आनंदाने आपला प्रश्न विसरून जायला तयार होईल ! नचिकेत्याचें तसें झालेलें नाही. यमराजांनी वाटेल ते लोभ दाखविले तरी त्याने "मला हाच वर हवा, इतर कांहीहि नको" असें सुचिंतित, असं-दिग्ध उत्तर दिलें. साधारण माणसाच्या वा परलोकविद्याजिज्ञासूच्या मृत्युविषयक प्रश्नाला उत्तर देण्यापूर्वी त्या उत्तर देणाऱ्याने जर श्रेय आणि प्रेय यांचें स्वरूप, कार्य, फल इत्यादींची चर्चा केली असती तर श्रोत्याला ती निष्कारण, अप्रासंगिक बडबड वाटून, 'ह्या साऱ्याचा माझ्या प्रश्नाशीं काय संबंध बुवा' असें वाटून त्याला

तिचा मनस्वी कंटाळा येऊन तो जांभया द्यायला लागला असता ! नचिकेत्याचें तसें झालेलें नाही. आपल्या मृत्युविषयक प्रश्नाचें उत्तर देण्यापूर्वी यमराज आपल्याला श्रेय-प्रेयाचें स्वरूप कां समजावून सांगत आहेत हें नचिकेत्याला कळूं शकलें, आणि म्हणून तो तें शांतपणें, उत्साहाने, कृतज्ञतेने ऐकून घेऊन परम आनंदित होऊं लागला.

ह्या साऱ्याचें कारण एवढेंच की साधारण माणसाचा वा परलोकविद्याजिज्ञासूचा मृत्युविषयक प्रश्न आणि नचिकेत्याचा मृत्युविषयक प्रश्न यांत महदंतर आहे. आणि म्हणूनच, तें अंतर आणि नचिकेत्याचा प्रश्न नीट समजून घेतल्याखेरीज, आपल्याला त्या प्रश्नास यमराजांनी दिलेलें उत्तर कळणें कदापि संभवनीय नाही. आणि तसें झाल्यास तें एवढें अमोल उत्तर आपल्या पक्षीं व्यर्थ ठरेल, त्या उत्तराने नचिकेत्याचें जीवन जसें उजळलें तसें आपलें जीवन उजळण्याचें भाग्य आपल्याला लाभणार नाही — एवढ्या ह्या महान् लाभापासून आपण वंचित होऊं.

## नचिकेत्याची मृत्युजिज्ञासा आणि इतर सर्वसाधारण लोकांची मृत्युजिज्ञासा यांतील फरक

साधारण माणूस, परलोकविद्याजिज्ञासु वगैरेंचा मृत्युविषयक प्रश्न सामान्यपणें या अशा स्वरूपाचा असतो — "अमुक एकजण मेला, त्याचें पुढे काय झालें ? तो कुठे गेला ?" असला प्रश्न विचारणारा माणूस आपल्या प्रिय व्यक्तीच्या मृत्यूने शोकाकुल होऊन हा प्रश्न विचारीत असेल किंवा केवळ मृत्यूसंबंधी वा मृतासंबंधी चौकसपणा (curiosity) म्हणून हा प्रश्न विचारीत असेल. तें कसेंहि असलें तरी तात्त्विक वा मानसशास्त्रीय दृष्ट्या ह्या सर्वांची भूमिका एकच असते, एकाच मनोभावांतून वा जाणिवेंतून हे लोक हा प्रश्न करीत असतात. ती भूमिका वा जाणीव अशी की,

'अमक्याचा पुत्र, अमक्याचा पिता, अमक्याचा अमुक, अमुक नांव असलेला, अमुक रूप असलेला, अमुक गुणदोष असलेला माणूस हेंच त्या मृत व्यक्तीचें स्वरूप होय; आणि आता तो माणूस दिसत नाही, तेव्हा आता त्याचें काय झालें, तो कुठे गेला?' सारांश, माणसाविषयीच्या वा जगाविषयीच्या लौकिक (empirical) बोधांतूनच हा प्रश्न विचारला जात असतो. आणि म्हणूनच, 'त्या मृत व्यक्तीचा अमुकअमुक ठिकाणीं जन्म झाला आहे वा ती अमुक लोकांत गेली आहे' एवढेंच आणि हेंच उत्तर हा प्रश्न विचारणाऱ्या त्या लोकांना हवें असतें.

नचिकेत्याच्या प्रश्नावर नीट चिंतन करून बघितल्यास आढळून येईल की त्याचा प्रश्न अगदीच भिन्न स्वरूपाचा आहे. नचिकेत्याचा प्रश्न आणि इतर सर्वांचा प्रश्न यांत फक्त एवढेंच साम्य मानतां येईल की दोघांचाहि प्रश्न 'मृत्यू'संबंधी आहे. परंतु नचिकेत्याच्या प्रश्नाचें स्वरूप – त्या प्रश्नाचें अंतरंग – इतरांच्या प्रश्नाहून अजीबात भिन्न आहे. "मेलेल्या माणसाचें 'पुढे' काय होतें, किंवा तो 'कुठे' जातो" हें नचिकेता मुळीच विचारीत नाही. नचिकेता विचारीत आहे – "मनुष्य मेला की आम्हांला संशय पडतो – कुणी म्हणतात की 'तो आहे', दुसरे कुणी म्हणतात की 'तो नाही.' प्रत्यक्ष पाहून किंवा अनुमानाने ह्या संदेहाचा निरास होण्यासारखा नाही हें अर्थातच अगदी उघड आहे. म्हणून या बाबतींत सत्य काय आहे तें मी, मृत्युदेवता जे आपण त्या आपल्याकडून जाणूं इच्छितों."

"मृत माणसाचें काय होतें, तो कुठे जातो" हा नचिकेत्याचा प्रश्न नाही. तो हेंच विचारतो की "कुणी म्हणतात की मेल्यानंतरहि माणूस असतो, कुणी म्हणतात की मेल्यानंतर तो नसतो, तर या

बाबतींत सत्य काय तें आपण मला सांगा.

माणूस मरतो,त्याच्या शरीराची विल्हेवाट लावली जाते आणि सारेंच संपतें, मग त्याचें कांहीहि उरत नाही -- न अयम् अस्ति -- ही इतकी स्पष्ट आणि उघड वस्तुस्थिति आहे की त्या बाबतींत संशयाला वस्तुत: कांही जागाच असायला नको. आणि तरीहि नचिकेता म्हणतो की यासंबंधी मला संशय आहे, तो आपण दूर करावा.

ह्याचा अर्थ एवढाच की नचिकेत्याचा मृताविषयीचा आणि मरणाविषयीचा दृष्टिकोन तद्विषयक ' स्पष्ट आणि उघड वस्तुस्थिती 'हून अगदी भिन्न आहे.

≑

ज्याला आपण माणूस म्हणतों त्याचें शरीर, त्याचीं इंद्रियें, त्याचें मन, त्याची बुद्धि, त्याचें मीपण इत्यादि त्याच्या साऱ्याचा मृत्यूने संपूर्ण नाश होऊन कांही उरत नसल्याचें डोळ्यांसमोर दिसतें याबद्दल शंकाच नाही. परंतु माणूस म्हणजे खरोखर फक्त एवढेंच काय ?

माणसाचें शरीर, इंद्रियें, मन, बुद्धि, मीपण इत्यादि सारेंकांही तर पंचभूतांपासून बनलेलें असतें. ह्या जडांची, ह्या अचेतनांची गोळाबेरीज म्हणजेच काय माणूस ? असेंच जर असतें तर मृत माणसाच्या देहाची विल्हेवाट लागण्यापूर्वी तो देह तर जसाच्या तसाच पडलेला असतो. मग तो मेला म्हणून शोक कां बरें करीत असतात ? ह्याचा अर्थच असा की शरीर-इंद्रियें-मन-बुद्धि-मीपण इत्यादींची गोळाबेरीज वा समष्टि म्हणजे कांही खरोखर मनुष्य नव्हे. ह्या सर्व अचेतनांना चेतन करणारा, ह्या सर्वांच्या माध्यमामधून प्रकट होणारा असा कुणी चिन्मय त्या शरीरांत होता, तो आता तिथे नाही, त्याने तें शरीर टाकून दिलें आहे, आणि यालाच

आपण 'मरण' असें म्हणत असतो. म्हणूनच गाढ झोप (सुषुप्ति) आणि मरण ह्या दोन्ही अवस्थांत माणूस बाह्यतः जवळजवळ सारखाच निश्चेष्ट दिसत असला तरी त्या दोहोंत केवढातरी फरक असतो. तो फरक हाच की, झोपेंत त्या चिन्मयाने तें शरीर सोडलेलें नसतें, तर ज्या शरीरेंद्रियादिक उपकरणांच्या साहाय्याने तो चिन्मय खेळत असतो त्या उपकरणांशीं – उपाधींशीं – असलेला त्याचा संबंध तेवढ्या वेळेपुरता स्थगित झालेला असतो.

हा 'चिन्मय'च माणसाचें 'खरें' स्वरूप होय, तोच 'खरा' माणूस होय.

आधणांत नाचणारे बटाटे बघून लहान मूल म्हणतें की "बघा, बटाटे कसे नाचत आहेत." वस्तुतः नाचण्याची शक्ति बटाट्यांत नसते. खाली असलेल्या अग्नीमुळे ते नाचत असतात. जड, अचेतन शरीरेंद्रियादिहि त्या चैतन्याग्नीमुळे 'जीवना'चा नाच नाचत असतात. लहान मूल ओरडतें की लोखंडाच्या पळीने माझा हात भाजला. हात पळीने कसा भाजेल ? तो भाजला असतो त्या पळींत सामावलेल्या अग्नीने. त्याचप्रमाणे शरीरेंद्रियादिक हे चेतनांसारखे वावरत असतात, पण तें चैतन्य त्याचें नसतें. त्या अचेतन शरीर-इंद्रिय-मन-बुद्धि-मीपण इत्यादिकांमधे सामावलेला असतो तो चिन्मय. त्याच्या चैतन्याने हे सारे चेतन बनत असतात. ह्या सर्व अचेतनांना – जड शरीरेंद्रियादिकांना चेतन करणारा जो चिन्मय, तोच माणसाचें खरें 'स्व-रूप' होय, तोच 'खरा' माणूस होय. शास्त्रांमधे, पंडितांच्या पारिभाषिक शब्दांत ह्या चिन्मयालाच म्हणतात – "आत्मा" !

≡

नचिकेत्याचा प्रश्न आहे या 'आत्म्या' विषयी! – 'माणसा'-

विषयी नव्हे, आणि वस्तुतः 'मरणा' विषयीहि नव्हे!! नचिकेत्याचा प्रश्न आहे 'माणसा'च्या 'मरणा' द्वारा त्याच्या अमर 'आत्म्या'-विषयी!!! "माणूस मरतो तेव्हा त्याचें काय 'होतें' ?"—हें नचिकेता विचारीत नाही. तो हेंच विचारीत आहे की "माणूस मरतो तेव्हा त्याचें काय 'असतें' ?" नचिकेता हेंच विचारतो आहे की, "दिसतो तो नश्वर 'मनुष्य'च मनुष्याचें स्वरूप होय की साधारणांना दिसत नाही, जाणवत नाही तो अविनश्वर 'आत्मा' माणसाचें खरें स्वरूप होय, हें आपण मला सांगा."

आणि म्हणूनच, आदर्श साधक नचिकेत्याच्या या रहस्यमय, अलोकसामान्य प्रश्नाचा खरा, गूढ अर्थ विशद करीत भगवत्पूज्यपाद आचार्य श्रीशंकर आपल्या प्रसन्नगंभीर भाषेंत म्हणतात—"**या इयं विचिकित्सा संशयः, प्रेते मृते मनुष्ये; अस्ति इति एके—अस्ति शरीरें-द्रियमनोबुद्धिव्यतिरिक्तः देहान्तरसंबंधी आत्मा इति एके मन्यन्ते, न अयम् अस्ति इति च एके—न अयम् एवंविधः अस्ति इति च एके। अतः च अस्माकं न प्रत्यक्षेण, न अपि अनुमानेन निर्णयविज्ञानम्। एतद्विज्ञानाधीनः हि परः पुरुषार्थः इति अतः एतत् विद्याम् विजानीयाम्, अहम् अनुशिष्टः ज्ञापितः त्वया। वराणाम् एष वरः तृतीयः, अवशिष्टः।**"—"भगवन्, मृत्यूविषयी आम्हां मर्त्यांच्या मनांत नेहमीच संदेह असतो. कुणी म्हणतात की 'मरण हा कांही माणसाचा संपूर्ण नाश नव्हे.' ते म्हणतात की, अमुक एकजण मेला असें जेव्हा आपण म्हणतों तेव्हा आपल्याला माहीत असावयाला हवें की अमुक हें त्या माणसाचें खरें स्वरूपच नव्हे. स्व-रूपतः तो अजर अमर आत्मा असून, तो आत्माच त्या व्यक्तीच्या रूपाने—त्या व्यक्तीच्या शरीर-इंद्रियें-मन-बुद्धि-अहंकार इत्यादींच्या रूपाने खेळत होता. त्या खेळ-णाऱ्याने, त्या लीलामयाने, त्या आत्मदेवाने तें रूप टाकून दुसरें

रूप ग्रहण केलें आहे, आणि यालाच आपण अमुक मरण पावला असें म्हणत असतों.' प्रभो, दुसरे कित्येकजण म्हणत असतात की 'असा आत्मा वस्तुत: नाही, माणूस हेंच माणसाचें खरें स्वरूप होय, आणि तो मेला की सर्वकांही संपतें.' हे मृत्युदेवते, प्रत्यक्ष वा अनुमान यांनी आमचा हा संशय दूर होऊन या बाबतींत निश्चित बोध उत्पन्न होणें संभवत नाही. परंतु मृत्यूचें कोडें सुटल्याखेरीज जीवनाचा अर्थहि समजणें शक्य नाही. जीवनाचा खरा अर्थ समजणें आणि त्यायोगें जीवन कृतार्थ होणें हें मृत्यूचें रहस्य उलगडून आत्म्याविषयी निश्चित बोध उत्पन्न होण्यावरच वस्तुत: अवलंबून आहे. आणि म्हणूनच आपल्याकडून हें मृत्यूचें गूढ उकलून घेण्याची, ह्यासंबंधीचें निश्चित सत्य जाणून घेण्याची माझी दृढ आकांक्षा आहे. माझा मृत्यूविषयीचा संदेह आपण कृपा करून दूर करावा हेंच मी आपल्याला तिसऱ्या वराने मागत आहें. आपण अभिवचन दिलेल्या वरांपैकी हा शेवटचा वर. हा मिळाल्यानंतर – आत्मबोध लाभल्यानंतर – मला आणखी कांहीहि नको."

≡

कल्पना करूं या की कांही मुलें खेळत आहेत. त्यांतील कांही मुलें अमळ मोठीं आहेत आणि कांही अगदीच लहान आहेत. त्यांतील एकाच्या वडिलांनी चिखलाचा एक ओला हत्ती त्यांना दिला होता. मुलेंच तीं, बराच वेळ आपल्या हत्तीशीं खेळून त्यांना आला कंटाळा. मग सर्वांनी ठरविलें की हा हत्ती मोडून आपण आता याचा वाघ करूं या. झालें, मोडला हत्ती ! इतक्यांत रस्त्याने कांहीतरी वाजतगाजत जाऊं लागलें. बस्, सारींच्या सारीं पळालीं तें बघण्याकरता रस्त्याकडे. मिरवणूक निघून गेली. आता फिरून हत्तीची आठवण आली ! सारीं पुन्हा परतलीं – हत्तीचा वाघ

अनु. ........ दि: ........
क्रमांक ........ नों. दि: ........


करण्यासाठी. पण हत्ती होता कुठे ? तरीपण त्यांतील जीं अमळ मोठीं होतीं तीं म्हणूं लागलीं – "आहे, हत्ती आहे" ! जीं अगदीच असमंजस होतीं तीं ओरडूं लागलीं – "हट्, कुठे आहे हत्ती. हत्ती नाही. चला आपण आता लपंडावच खेळूं या" !

जीं अगदीच लहान मुलें होतीं त्यांच्या दृष्टीने 'हत्ती' हेंच त्या हत्तीचें खरें स्वरूप होतें. जीं समंजस होतीं त्यांच्या दृष्टीने 'चिखल' हें त्या हत्तीचें खरें स्वरूप होतें. 'हत्ती' हें केवळ त्या चिखलाचें एक 'रूप' होतें.

हत्ती-चिखलाच्या बाबतींत दोन्ही पदार्थ इंद्रियगम्य, प्रत्यक्षगम्य असल्यामुळे प्रश्न फारसा बिकट नव्हता ! पण माणूस आणि त्याचें खरें स्वरूप जो आत्मा ह्यांच्या बाबतींत एक इंद्रियगोचर आणि दुसरा इंद्रियातीत असल्यामुळे प्रश्न अत्यंत बिकट झाला आहे. तथापि नचिकेता विचारीत मात्र हेंच आहे की – "वाघ करण्याकरतां हत्ती मोडला जातो तेव्हा तो असतो की नसतो ? कुणी म्हणतात तो आहे (**अस्ति इति एके**), तर कुणी म्हणतात की तो नाही (**न अस्ति इति च एके**) ! मग यांतील खरें कोणतें ?"

### इतर सर्वसाधारण लोक आणि नचिकेता यांच्या मृत्युविषयक प्रश्नांत इतका फरक पडण्याचें कारण

किती फरक आहे साधारण माणसाच्या वा परलोकविद्या-जिज्ञासूच्या मृत्युविषयक प्रश्नांत आणि नचिकेत्याच्या मृत्युविषयक प्रश्नांत ! वर आपण एकदा म्हटलें आहे की, या बाबतींत इतर सर्वांचा प्रश्न आणि नचिकेत्याचा प्रश्न यांत साम्य फक्त एवढेंच असतें की दोघांचेहि प्रश्न 'मृत्यू'संबंधी असतात. पण वास्तविक

दृष्टचा त्या दोन प्रश्नांत खरोखर एवढेंहि साम्य नसतें. त्यांत साम्य जें वाटतें तें अगदी वरवरचें (superficial) असतें, तो साम्याचा आभास असतो. इतर सर्वांचा प्रश्न असतो 'मरणा'-विषयी. नचिकेत्याचा प्रश्न आहे 'मरणाऱ्या'विषयी. इतर सर्वांचा प्रश्न असतो मेलेल्याच्या पुढील 'अवस्थे'विषयी, नचि-केत्याचा प्रश्न आहे मेलेल्याच्या खऱ्या 'स्वरूपा'विषयी.

≑

मृत्यु ही घटना एकच. मग तिच्याविषयीच्या सर्वसाधारण इतर सर्वांच्या प्रश्नांत आणि नचिकेत्याच्या तिच्याचविषयीच्या प्रश्नांत इतका फरक कां बरें पडावा ?

ह्याचें कारण मृत्यूविषयी प्रश्न विचारणाऱ्या इतर सर्वांच्या आणि नचिकेत्याच्या त्या मृतासंबंधीच्या मनोभूमिकेंतील, मनो-भावांतील वा जाणिवेंतील जमीनअस्मानच्या फरकांत आहे. घटना एकच, पण तिच्याविषयीच्या 'प्रश्नां'मधे इतका फरक पडण्याचें कारण तेवढा फरक मुळी तो 'प्रश्न विचारणाऱ्यां'-मधेच आहे !

आपण विवेचनाच्या ओघांत वर एके ठिकाणीं पाहिलेच आहे की, साधारण लोक जेव्हा "मृताचें काय झालें, तो आता कुठें आहे" इत्यादि प्रश्न विचारतात तेव्हा शरीर-इंद्रियें-मन-बुद्धि-मीपणयुक्त, विशिष्ट नांव, रूप, गुण, दोष इत्यादि असलेला अमुक अमुक हेंच मनुष्याचें खरें स्वरूप होय अशा, माणसा-विषयीच्या लौकिक (empirical) बोधांतूनच ते तो प्रश्न विचारीत असतात.

नचिकेत्याची गोष्ट सपशेल वेगळी आहे. तो प्रश्न विचारीत आहे – ह्या शरीर-इंद्रियें-मन-बुद्धि-मीपण इत्यादींनी खेळणाऱ्या,

विशिष्ट नांव, रूप, गुण, दोष इत्यादींनी आभासणाऱ्या चिन्मय आत्म्याविषयी. मनुष्य हें मनुष्याचें खरें स्वरूप नसून, तें त्याचें केवळ वरवरचें, आभासमय रूप असून आत्मा हेंच त्याचें खरें स्वरूप आहे, ह्या मनुष्याविषयींच्या अतिलौकिक (transcendental) जाणिवेंतूनच नचिकेता प्रश्न विचारीत आहे.

मनुष्याविषयींच्या लौकिक (empirical) जाणिवेंतून आणि मनुष्याविषयी अतिलौकिक ( transcendental ) जाणिवेंतून केलेल्या प्रश्नांमधे जमीनअस्मानचा फरक पडला तर आश्चर्य तें कोणतें ! कारण ह्या दोन जाणिवांमधेच अक्षरशः जमीन आणि अस्मान इतका फरक आहे !

**अमर आत्म्याची जाणीव असूनहि नचिकेता मृत्यूद्वारा यमांना आत्म्याच्या अस्तित्वाविषयी प्रश्न कां विचारीत आहे ?**

येथे साहजिकच असें मनांत येणें शक्य आहे की, जर नचिकेत्याला त्या चिन्मय, साक्षी आत्म्याची अशी जाणीव होती तर मग त्याला माणूस मरतो तेव्हा तो (आत्मा) असतो की नसतो असा संशय कां असावा आणि त्याने यमराजांना तिसऱ्या वराने हा मृत्युविषयक प्रश्न तरी कां विचारावा ?

ह्या प्रश्नाचें उत्तर अगदी सोपें आहे. तें असें की, नचिकेता हा 'आदर्श' असला तरी एक 'साधक' होता, 'सिद्ध' नव्हता. त्याला स्वतःठायी आणि सर्वांठायी शरीर-इंद्रियें-मन-बुद्धि-मीपण इत्यादींनी खेळणाऱ्या त्या चिन्मय, साक्षी आत्म्याची आदर्श 'साधका'ला असावी इतकी अस्पष्ट जाणीव होती. नाम-रूपांच्या लोपाने, शरीराच्या नाशाने तो नामी, तो रूपी, तो चिन्मय शरीरी लोप पावत नाही, नष्ट होत नाही, मृत्यु म्हणजे साक्षी

आत्माच हा देह टाकून दुसरा देह धारण करीत असतो – सारांश, 'हत्ती'चाच 'वाघ' होत असतो – हेंहि त्याला तसेंच अस्पष्ट, अंधुकपणें जाणवत होतें. पण कितीहि झालें तरी ही त्याची जाणीव अस्पष्ट, अंधुक होती. कारण नचिकेता एक 'साधक' होता. तो अज्ञानांत होता. शरीर आणि शरीरी आत्मा ह्यांची भिन्नता 'सिद्धा'प्रमाणे स्पष्ट, असंदिग्धपणें त्याच्या कशी बरें अनुभवास येऊं शकणार? आणि म्हणूनच, मृत्युसमयीं साक्षी-स्वरूप आत्मा (Abiding Being) मरत नाही ही अस्पष्ट जाणीव असूनहि, त्या वेळीं सर्वचकांही नाहीसें, शून्य होतांना धडधडीत दिसत असल्यामुळे, त्याची आत्म्याच्या अस्तित्वाची ती अंधुक जाणीव माणसाच्या संपूर्ण विनाशाच्या प्रत्यक्ष दृश्याशीं मिश्रित होत आहे. माणूस मरतो, देहाची वासलात लागते, कांही म्हणतां कांहीदेखील मागे उरत नाही हें प्रत्यक्ष 'दृश्य', आणि असें 'दिसत' असलें तरीदेखील मरणाऱ्याचें खरें स्वरूप जो आत्मा त्याचा ह्या शरीराच्या नाशाने नाश होत नाही ही अस्पष्ट 'जाणीव' – ह्या दोहोंचें नचिकेत्याच्या मनांत संमिश्रण होत असल्यामुळे त्याला त्याविषयी संशय कां पडूं नये, आणि मग त्याने 'आत्मा आहे किंवा नाही' असा प्रश्न विचारूं नये तर काय करावें?

आत्म्याची 'जाणीव' असूनहि त्याविषयी यमराजांना नचिकेत्याने प्रश्न विचारण्याचें दुसरें कारण असें की, ज्या शरीरे-द्रियादिव्यतिरिक्त, देहान्तरसंबंधी, साक्षी, चिन्मय आत्म्याची नचिकेत्याला अस्पष्ट, अंधुक, अपुरी, अधुरी, देहबोधसंमिश्र जाणीव होती त्या आत्म्याचें स्वरूप स्पष्ट, असंदिग्ध, पूर्णपणें जाणून घेण्याची त्याला इच्छा होती. कारण तो साधक होता.

त्या आत्म्याचें स्वरूप आपल्याला नीट कळावें, त्याचा आपल्याला लाभ व्हावा अशी त्याला उत्कट तळमळ लागली होती. आणि म्हणूनच त्याला अस्पष्टपणें जाणविणारा तो आत्मा स्वरूपत: कसा आहे, त्याच्या प्राप्तीचीं साधनें कोणतीं हें, म्हणजेच साधन-सहित ब्रह्मविद्या तो यथार्थ साधक नचिकेता ब्रह्मविद्याचार्य यमराजांकडून जाणून घेऊं इच्छीत आहे.

आत्म्याविषयी जाणीव असूनहि नचिकेत्याने यमांना तद्विषयक प्रश्न विचारण्याचें तिसरें कारण असें की, त्याला स्वत:ला जरी वाटत होतें की देहाच्या मरणाने न मरणारा आत्मा आहे, तरी पण तसा आत्मा नाही असें म्हणणारेहि कितीतरी लोक होते – 'न अस्ति इति च एके' – आणि साहजिक त्यांचें हें मत ह्या 'साधका'च्या मनांत संशय निर्माण करीत होतें. कित्येक मोठमोठे तत्त्वज्ञ, सुप्रसिद्ध विचारवंत, जीवनाच्या निरनिराळ्या क्षेत्रांतील अनेक यशस्वी नि नामवंत व्यक्ति 'आत्मा नाही' असें म्हणतात हें त्याला ठाऊक होतें. आणि म्हणून, स्वत:ला त्या आत्म्याचा संपूर्ण, निर्णयात्मक, निश्चित बोध नसल्यामुळे 'साधक' नचिकेत्याच्या मनांत गोंधळ वा संशय असणें आणि तो दूर करण्यासाठी त्याने 'सिद्ध' आचार्य भेटतांच त्यांना हा प्रश्न विचारणें अगदी साहजिक आणि स्वाभाविक नव्हे काय ?

## इतर सर्वसाधारणांच्या आणि नचिकेत्याच्या मृत्युविषयक प्रश्नांमागील भिन्न भिन्न मानसिक पार्श्वभूमींचें स्वरूप आणि त्या भिन्नतेचें कारण

'अमुक अमुक मरण पावला, त्याचें काय झालें, तो कुठे गेला' इत्यादि साधारण माणसाचा वा परलोकविद्याजिज्ञासूचा मृत्युविषयक प्रश्न आणि नचिकेत्याची मृत्युविषयक नि तद्द्वारा

आत्मस्वरूपविषयक पृच्छा यांत काय, किती, कसा आणि कुठे फरक आहे हें आपण पाहिलें. हा फरक, तो प्रश्न करणाऱ्या त्या त्या व्यक्तीच्या भूमिकेंत, मनोभावांत वा जाणिवेंत असतो हेंहि आपण पाहिलें साधारण माणूस वा परलोकविद्याजिज्ञासु यांचा मृत्युविषयक प्रश्न मानवाविषयीच्या लौकिक (empirical) जाणिवेंतून आलेला असतो. उलट, मृत्युविषयक प्रश्न करतांना नचिकेत्याची मानवाविषयीची भूमिका, मनोभाव वा जाणीव ही अतिलौकिक (transcendental) होती, आणि म्हणूनच मृत्यूमधून आत्म्याविषयी प्रश्न तो इतरांप्रमाणे विरहशोकाने, कुतूहलाने वा चौकसपणामुळे (curiosity मुळे) करीत नसून आत्मजिज्ञासेने, आत्मलाभाच्या प्रबल आकांक्षेने, आत्मसाक्षात्काराच्या तीव्र इच्छेने करीत आहे.

सारांश, इतर सर्वजण आणि नचिकेता यांचा प्रश्न बाह्यत: मृत्यु या एकाच घटनेविषयी वाटत असला तरी इतर सर्वांची आणि नचिकेत्याची त्या प्रश्नामागील मानसिक पार्श्वभूमि (psychological background) अगदीच भिन्न आहे.

साहजिकपणेंच विचार येतो की इतर झाडून सगळ्यांच्या आणि नचिकेत्याच्या 'मानसिक पार्श्वभूमीं'त असा फरक कां पडावा ?

हा फरक कां पडावा ह्याचें कारण, नचिकेत्याने हा प्रश्न विचारल्यानंतर त्याचें आणि यमराजांचें जें संभाषण झालें त्यावरून आपल्याला अगदी स्पष्ट, सुंदर रीतीने कळून येतें.

नचिकेत्याने हा मृत्युविषयक प्रश्न विचारतांच, त्याच्या

त्या प्रश्नाचें उत्तर देण्याऐवजी यम त्याला म्हणाले – "नचिकेत्या, मोठमोठ्या लोकांनी तूं विचारतोस तें मृत्यूचें कोडें सोडविण्याचा यत्न केला आहे, पण त्यांनादेखील या बावतींत निश्चित, असंदिग्ध असें कांहीच ज्ञान झालेलें नाही. तूं ज्या वस्तूसंबंधी – आत्म्यासंबंधी – विचारीत आहेस ती अत्यंत सूक्ष्म, संपूर्ण अतींद्रिय आहे, त्यामुळे सामान्यजनांना कितीदा आणि कसेंहि सांगूनहि तिचें स्वरूप आकळतां येत नाही. म्हणून तूं हा प्रश्न न विचारतां, तिसऱ्या, ह्या अखेरच्या वराने दुसरी कोणतीहि एखादी मूर्त, असंदिग्ध अशी वस्तु माग. मोठमोठ्यांनाहि संदेहांत टाकणाऱ्या, अमूर्त अशा ह्या आत्म्याच्या तूं कशाला पाठीमागे लागतोस ? वत्सा, उगाच मला अडवूं नकोस. दुसरा एखादा वर माग."

यम करायला गेले एक आणि झालें उलटेंच ! एका क्षणाचाहि विलंब न करतां नचिकेत्याने यावर यमधर्मांना उत्तर दिलें – "भगवन्, आपणच म्हणतां की मोठमोठ्यांनाहि ह्या बावतींत निर्णयात्मक, निश्चित ज्ञान होऊं शकलें नाही, कारण हा आत्मा जाणणें सोपें नाही. मोठमोठ्या बुद्धिवंतांची, पंडितांचीहि मति जेथे कुंठित होते त्या ह्या आत्म्याचें ज्ञान देण्याला आपल्या-सारखा आचार्य त्रिभुवन धुंडाळूनहि गवसणार नाही. माझ्या महाभाग्योदयाचा क्षण आला आहे म्हणूनच मला आपलें दर्शन झालें. आपण जर कृपा करणार नाही तर मग ही आत्मविद्या लाभण्याची माझी आशा कायमची विफलच होणार म्हणावयाची. प्रभो, हें सोडून आपण मला दुसरें कांहीतरी मागायला सांगत आहांत. देव, आणखी दुसरें काय बरें मागूं ? ह्यासारखी आणखी दुसरी वस्तु कोणती आहे ? – **नान्यो वरः तुल्य एतस्य कश्चित् ।** – ह्या जगांतील आणि जीवनांतील परम, अंतिम सत्य असा हा

आत्मा सोडून बाकी सारेंच तर अनित्य, क्षणभंगुर आहे. माणसाचें खरेंखरें कल्याण ह्या आत्मलाभानेच होत असतें. ज्ञाननिधे, दया करा आणि मला हें ज्ञान द्याच. आपण विन्मुख पाठविल्यास मी मग कुणाकडे बरें जाऊं ?"

तुम्ही-आम्ही, सर्वसाधारण माणूस, परलोकविद्याविशारद —दुसरा कुणीहि असता तरी यमराजांनी 'अमूर्त, संदिग्ध' आत्म्याच्या पाठीमागे लागण्यांत कांही स्वारस्य नाही असें म्हणतांच त्याला चटकन् 'पटलें' असतें आणि उगाच घोळ न घालीत बसतां त्याने मूर्त, असंदिग्ध अशी दुसरी एखादी 'चीज' झट्दिशी मागून यमराजांना मोकळें केलें असतें ! नचिकेत्यावर मात्र यमराजांच्या म्हणण्याचा परिणाम अगदी निराळा, उलट झाला. "मोठमोठ्यांनाहि ह्या आत्म्याविषयी संदेह असतो, त्यांनाहि तो नीट कळत नाही" असें यमांनी म्हणतांच, "म्हणूनच 'आपण' मला त्याविषयी सांगा" असें तो म्हणाला ! "दुसरें कांहीहि माग" असें म्हणतांच "आत्म्याखेरीज आणखी सत्य काय आहे की तें मी आपल्याला मागूं" असें तो ठामपणें म्हणाला !

सत्यस्वरूप चिन्मय आत्म्याखेरीज दुसरें कांही नचिकेत्याला सत्य वाटतच नव्हतें. सारांश, नचिकेत्याच्या हृदयांत वैराग्याचा अग्नि धडधडत होता, निर्मल वैराग्यशील नचिकेत्याला स्पष्ट दिसत होतें की, शरीर-इंद्रियें-मन-बुद्धि-मीपण इत्यादींची ही समष्टि — जिला आपण 'मी' वा 'भोक्ता' म्हणत असतों तो — आणि ह्या जगांतील समस्त भोग्य वस्तु ह्या क्षणभंगुर आहेत, असार आहेत, अनित्य आहेत. आंत बाहेर सर्वत्र सर्वकांही वस्तुत: शून्य आहे. ह्या अनित्य, असार, असत्य जीवनांत आणि जगांत सत्य आहे केवळ तो चिन्मय आत्माच. हृदयांत हें असलें विमल

वैराग्य असल्यामुळे त्या शुद्ध हृदयांत नचिकेत्याला त्या नित्य, एकमेव सत्य, जन्मजरामृत्युहीन आत्म्याचा अस्पष्ट बोध होत होता. आणि म्हणूनच, त्या आत्म्याचा लाभ व्हावा म्हणून इतर सर्व वस्तूंचा अव्हेर करून तो आत्मविद्येसाठी इतकी काकळूत करीत आहे.

इतर झाडून सर्वांच्या आणि नचिकेत्याच्या 'मानसिक पार्श्वभूमीं'त अक्षरशः जमीन-अस्मानचा फरक पडण्याचें कारण आहे हें – नचिकेत्याचें उज्ज्वल, जाज्वल्य, सुनिर्मल, जिवंत वैराग्य !

वैराग्य जिवंत खरेंच ! कारण, नचिकेत्याचें उत्तर ऐकून यमराजांनाहि विस्मय वाटला. हा असला वर मागणारा त्यांना हाच आढळला होता ! म्हणून, ती सकलसंशयोच्छेदी, चिरकृतार्थकारी, परममंगलमयी, सर्वविद्याप्रतिष्ठा आत्मविद्या प्रदान करण्यापूर्वी, हा खरोखरच तिला पात्र आहे किंवा नाही हें ते नीट पारखून पाहूं लागले. जसा घेणारा, तसाच देणारा. कुणीहि कच्चा नव्हता. दोघेहि 'आदर्श' होते. नचिकेत्याचें तें लोकोत्तर, अनन्यसाधारण उत्तर ऐकून यमराज त्याला म्हणाले, – "वत्सा, तूं मला शतायुषी पुत्र आणि पौत्र (नातु-पणतु) माग. हव्या तितक्या गाई माग. हत्ती माग, घोडे माग, सुवर्णाच्या राशी माग. हवी तितकी भूमि माग. आणि जें नसलें तर हें सारें ऐश्वर्य कुचकामाचें ठरतें तें निरोगी, सुदीर्घ आयुष्य माग – हवें तितकें दीर्घ आयुष्य माग. प्रियदर्शना, ह्यांतील तुला कांही रुचत नसेल तर तुझ्या आवडीचें काय असेल तें माग. पुष्कळांना हत्ती, घोडे, जमीन इत्यादि आवडत नाहीत, त्यांना स्वतःच्या इच्छेनुसार खर्चतां येईल असा प्रत्यक्ष पैसा हवा असतो. तुला तसें वाटत असल्यास पैसा माग. अरे, तुला मी थोडचाफार भूमीचा मालकच काय पण राजा करीन, सम्राट करीन. आणि विसरूं नकोस – हे केवळ

मर्त्य लोकांतीलच नव्हत तर स्वर्ग लोकांमधील दिव्य, अनुपम भोग देखील मी तुला देऊं शकतों – मी सत्यसंकल्प देवता आहें. ऋषिकुमारा, ह्या वघ या अनिद्यसुंदर अप्सरा ! ह्या लाभाव्यात असें सर्वचजण वांच्छीत असतात, पण त्या लाभणें अत्यंत कठीण होय. नचिकेत्या, आपल्या इच्छेप्रमाणे तूं ह्या अप्सरांतील कोण-त्याहि आणि कितीहि अप्सरांचा स्वीकार करूं शकतोस. ह्या दिव्य सुंदरी पुरुषांना रमविण्यांत अत्यंत निष्णात आहेत. ज्या दिव्य रथांत ह्या बसलेल्या आहेत, आणि त्यांच्या स्वर्गीय कंठांतून निघणाऱ्या संगीताला साथ देणारीं जीं दिव्य वाद्यें त्यांच्या हातीं आहेत त्या रथांसह नि वाद्यांसह तूं ह्या अपूर्वरूपवतींचा अंगीकार कर. आमच्यासारख्या देवतांच्या अनुग्रहाखेरीज हे अनुपम उपभोग मर्त्य जीवांना कदापि लाभत नसतात वत्सा हें वा असेंच आणखी कांहीहि, काय वाटेल तें माग, पण हा मृत्यू-विषयीचा प्रश्न मात्र तेवढा विचारूं नकोस. अरे, काय अर्थ आहे या निष्फळ प्रश्नांत ?"

यमराज तरी किती मिस्किल ! मनुष्यस्वभावाचें त्यांना पुरतें ज्ञान होतें ! प्रथम त्यांनी नचिकेत्याला अमूर्त आत्म्याच्या संदेहपर्यवसायी शोधापासून परावृत्त होऊन, मूर्त, प्रत्यक्ष जगाच्या असंदिग्ध भोगांकडे वळण्याचा साळसूद सल्ला दिला ! त्याने नचिकेता बधत नाहीसें पाहून त्यांनी 'मूर्त, प्रत्यक्ष जगांतील असंदिग्ध भोग' म्हणजे 'काय' हें नचिकेत्याच्या कल्पनाचक्षूंपुढे गहिऱ्या रंगांनी चितारावयास सुरुवात केली ! – शतायुषी पुत्र-पौत्र, हव्या तितक्या गाई, सुवर्ण, हत्ती-घोडे-पालख्या, विस्तीर्ण भूमि आणि दीर्घायुष्य या 'प्रत्यक्ष' भोगांची त्याला लालूच दाखविली. पुष्कळांना हत्तीघोडे, सोनें, वगैरे तितकेसें रुचत नाही. त्यांना

नगद पैसा (hard cash) हवा असतो ! कारण पैशाचा 'मनासारखा' उपयोग करतां येतो ! म्हणूनच पुष्कळांना शेतीभाती नको असते, रोकड पैसा हवा असतो ! यमराजांनी तोहि डाव टाकून पाहिला. राजा करतों म्हटलें. ह्याचाहि त्या विक्षिप्त वरयाचकावर कांहीच परिणाम होत नाहीसें बघून यमराजांनी त्याला स्वर्गातील सुखांचें आमिष दाखविण्याचा प्रयत्न केला. तेंहि निष्फळ होत आहेसें बघून मग अखेर त्यांनी अगदी अमोघ, जालीम उपाय योजून पाहिला – भोगाची काल्पनिक चित्रें नचिकेत्यापुढे चितारण्याचें थांबवून त्याला प्रत्यक्ष अप्सरा दाखवून भुलविण्याचा यत्न केला ! – अप्सरा – ज्यांनी मी मी म्हणणाऱ्यांची तप:कीर्ति पार धुळीला मिळवून दिली आहे अशा अपरूप, स्वरूपसुंदर दिव्यांगना !

पण व्यर्थ ! यमराजांचें मनुष्यस्वभावाचें ज्ञान वाया गेलें ! नचिकेत्याला ह्या कशानेहि भुरळ पडली नाही, कशाचेंहि आकर्षण वाटलें नाही. ह्या सर्व मर्त्य वा स्वर्गातील क्षणभंगुर भोग्य वस्तूंचा मोह त्याने अनायास दूर सारला. नचिकेत्याच्या ह्या वागणुकीचें आचार्य श्रीशंकर मोठें सुंदर, मार्मिक वर्णन करतात – "**मृत्युना एवं प्रलोभ्यमान: अपि नचिकेता महाह्रदवत् अक्षोभ्य:...**" – यमराजांनी इतकीं प्रलोभनें दाखविलीं, पण नचिकेता एखाद्या विशाल सरोवराप्रमाणे शांत होता, त्याच्यांत कांहीच क्षुब्धता वा चलबिचल निर्माण झाली नाही." एखाद्या मोठ्या तलावांत दहापांच हत्ती जरी उतरले तरी पाणी विशेष हालतांना दिसत नाही. पण तेंच एखाद्या डबक्यांत एखादी जरी म्हैस शिरली तर...!

=

आणि, नचिकेत्याचें हे सर्व भोग झिडकारणें, हें त्याचें वैराग्य म्हणजे नुसता भावनांचा फेसाळ आविष्कार (emo-

tionalism) नव्हता. नचिकेत्याचें हें वैराग्य 'आंधळें' नव्हतें, तें 'डोळस' होतें – 'विवेकां'तून, 'विचारां'तून जन्मलेलें होतें.

नाना भोगांचें आमिष दाखवून कुतूहलाने नचिकेत्याला पारखत त्याच्याकडे बघत असलेल्या यमराजांना तो म्हणतो – "मर्त्याधिपते, आपण मला ह्या वस्तु स्वीकारायला कसें सांगत आहांत ? ह्या साऱ्या भोग्य वस्तु – मग त्या मर्त्यलोकींच्या असोत की स्वर्गींच्या असोत – अगदी स्वप्नासारख्या ठिसूळ आहेत, – आज आहेत तर उद्या नाहीत (**'श्वोभावाः'**) अशी त्यांची स्थिति. त्या साऱ्यांच्या भोगाने मनुष्य तृप्त होणें तर दूरच राहो, त्या अशा नाहीशा होतात आणि जातांना, त्यांचा भोग घेणाऱ्याच्या धर्म, वीर्य, प्रज्ञा, तेज, यश प्रभृतींचाहि क्षय करून जातात. आणि दीर्घायुष्य आपण कशाला म्हणतां ? प्रभो, कितीहि दीर्घ म्हटलें तरी तें एक दिवस संपणारच. भोग्य वस्तुहि विरतात, भोक्ताहि मरतो आणि भोगहि सरतात. राहून जातें केवळ – अतृप्ति ! म्हणून – **तवैव वाहाः तव नृत्यगीते** – हे हत्ती-घोडे नि हें नृत्य-संगीत, हे सगळे भोग आपण आपले आपल्याजवळ असूं द्या. मला ते नकोत. भगवन्, धनाने का कधी कुणीतरी तृप्त, शांत झाला आहे ? प्रभो, आपलें दर्शन घडलें हेंच माझें सर्वांत मोठें धन होय. मला इतर नाशवंत, अशांतिदायी धन नको. **वरस्तु मे वरणीयः स एव** – मला फक्त तोच वर हवा – देव, मी आत्मज्ञानाचा याचक आहें, खऱ्या शांतीचा भिकारी आहें. देव,

**अजीर्यताम् अमृतानाम् उपेत्य**
**जीर्यन् मर्त्यः क्व तदास्थः प्रजानन् ?**
**अभिध्यायन् वर्णरतिप्रमोदान्**
**अतिदीर्घे जीविते को रमेत ?**

——अमृतमयी ब्रह्मविद्या आपल्या हृदयांत आविर्भूत झाल्यामुळे आपण अमर झालां आहांत. आपल्यासारख्या ब्रह्मविद्याप्रदात्या गुरूचें अलभ्य दर्शन होऊन आज मी धन्य झालों आहें. प्रभो, आम्ही मर्त्य. आमचें जीवन, आमचे सगळे भोग नश्वरतेच्या शापाने शापलेले आहेत. हें सर्व जाणूनहि मला त्या साऱ्यांविषयी आस्था कशी वरें वाटेल ? हें सर्व जाणूनहि त्या निःसार गोष्टी मी आपल्याजवळ कशा बरें मागेन ? भगवन्, राजाला भोपळा का मागायचा ? हे दयानिधे, हे मुक्तिदाता, आपण मज दुबळ्याची अशी कठोर परीक्षा कां बरें पाहत आहांत ? देव, ह्या अप्सरांचें रूपलावण्य, त्यांचे संमोहक हावभाव, त्यांच्या सहवासाचें सुख किती काल टिकणारें असतें ? ह्या सर्वांची अंतिम गति, प्रभो, आपण स्वतः – मृत्युच – ना ? आज ना उद्या ह्या साऱ्यांची चिता भडकणार आहे. हा नित्य-अनित्य, सार-असार, सत्य-असत्य विवेक ज्याला नाही तोच ह्या भोगांमधे रममाण होईल. प्रभो, मींहि तसेंच करावें काय ? ”

ह्या विवेकजनित वैराग्याने नचिकेत्याचें हृदय शुद्ध झालेलें होतें. आणि म्हणूनच, त्या शुद्ध हृदयामधे त्याला त्या देहान्तर-संबंधी, अतिलौकिक, व्यतिरिक्त, चिन्मय, साक्षी आत्मसत्तेचा अपरिस्फुट, अव्यक्त प्रत्यय येत होता. त्या आत्मवस्तूपुढे इतर सर्व गोष्टी नितान्त ‘अवस्तु’ आहेत हें प्राणोप्राण जाणवूनच नचिकेता अखेर म्हणतो ——

“ यस्मिन् इदं विचिकित्सन्ति मृत्यो,
यत् सांपराये महति ब्रूहि नस्तत् ।
योऽयं वरो गूढम् अनुप्रविष्टो
नान्यं तस्मात् नचिकेता वृणीते ।। ”

--"मृत्यो, ह्या तुच्छ भोगांचा मला लोभ दाखविण्याचें थांबवून आता, मरणसमयीं जो असतो किंवा नसतो अशी ज्याच्याविषयी मोठमोठ्या पंडितांनाहि शंका असते, ज्याच्या लाभाने मानव-जीवनाचें अंतिम उद्दिष्ट साधतें, त्या आत्म्याचा कृपया बोध करून आपण मला कायमचें कृतार्थ करा. त्या गूढ, गहन, तर्काला अप्राप्य अशा आत्म्याविषयीच्या वराखेरीज मला, ह्या आपल्या यःकश्चित् शिष्य नचिकेत्याला आणखी कांहीहि नको--अविवेक्यांनाच ज्याची भुरळ पडावी असें मला इतर कांहीसुद्धा नको."

### नचिकेत्याच्या मृत्युजिज्ञासेचें अंतरंग

नचिकेत्याचा आणि इतर सर्वांचा मृत्युविषयक प्रश्न भिन्न स्वरूपाचा असतो, कारण, नचिकेत्याची आणि इतर झाडून सर्वांची त्या प्रश्नामागील 'मानसिक पार्श्वभूमि' भिन्न असते. आणि त्या मानसिक पार्श्वभूमीच्या भिन्नतेचें कारण आहे--भरभक्कम विवेकाच्या पायावरील हें खंबीर वैराग्य.

आणि म्हणूनच नचिकेत्याची 'मृत्युजिज्ञासा' ही वस्तुतः, स्वरूपतः 'आत्मजिज्ञासा' आहे. ह्या विवेकवैराग्यामुळे नचिकेत्याला जाणवत होतें की भोक्ता आणि भोग्य क्षणभंगुर आहेत, आत्माच सत्य आहे, तोच खऱ्या आनंदाचें निधान आहे, चिरशांतीचा आधार आहे. ह्या सर्व नश्वर भोगांचा त्याग करून त्या आत्म्याचा लाभ करून घ्यावा ही एकच आस, हीच एकमेव इच्छा नचिकेत्याच्या वैराग्यनिर्मल हृदयांत स्फुरत होती. अनेक जन्मींच्या शुभ संस्कारांनी निर्माण होणाऱ्या या इच्छेलाच शास्त्रांत म्हटलें आहे--मुमुक्षा ! --मुक्तीची इच्छा.

नचिकेता मुमुक्षु होता. इतर सगळे प्रश्नकर्ते बुभुक्षु--**भोक्तुम् इच्छुः**--असतात !--अविवेकजन्य भोगाची अदम्य, अतृप्ति-

अशांतिपर्यवसायी इच्छा त्यांच्या चित्तभर सदा सळसळत असते.

ह्या बुभुक्षेमुळे – विवेक-वैराग्य-मुमुक्षेच्या ह्या अभावामुळेच अशुद्ध मनाच्या इतर सर्वांचा मृत्युविषयक प्रश्न हा केवळ प्रश्न असतो – ती पोकळ पृच्छा, कुतूहल वा चौकशी असते. दोन भिन्न मानसिक पार्श्वभूमींमुळेच एकाच घटनेविषयीच्या प्रश्नांत असा विलक्षण फरक पडत असतो. नचिकेत्याचा प्रश्न हा आत्मलाभासाठी तळमळणाऱ्या त्याच्या वैराग्यधौत हृदयाचा आक्रोश होता, ती त्याच्या आत्म्याची भूक होती – त्याच्या अंतरात्म्याने परमात्म्याला घातलेली साद होती. सारांश – **विवेक-वैराग्यजनित आत्मविकास, आत्मविकासजन्य आत्मनिरीक्षण, आत्मनिरीक्षणसंभूत आत्म-जागृति आणि आत्मजागृतिसमुद्भूत आत्मजिज्ञासा – हें आहे नचि-केत्याच्या मृत्युविषयक प्रश्नाचें, त्या आदर्श साधकाच्या, त्या मुमुक्षूच्या मृत्युजिज्ञासेचें अंतःस्वरूप.**

### उपसंहार

मृत्यूने शोकाभिभूत वा भयभीत न होतां मृत्यूवर जर आपण खरोखर ‘चिंतन’ केलें तर आसक्तिजनित विषादविषाने आपलें आयुष्य कडुजहर न होतां उलट मृत्यु आपल्यापक्षीं ह्या भव-सागरांतील दीपस्तंभ – वैराग्याचें प्रतीक होऊन बसेल, – आपली प्राणप्रिय मृतव्यक्तिच आपल्यापक्षीं वैराग्याचें स्फूर्तिस्थान होऊन बसेल. मृत्यूवर असें ‘ध्यान’ केल्याने आपण त्या अमृतस्वरूप आत्मदेवाच्या श्रीचरणांना स्पर्श करूं शकतों – ‘मृत्यु’ मग आप-ल्याला त्या संसारसार चरणारविंदांचें संधान साधून देऊं शकतो. भयशोकविव्हल न होतां ‘मृत्यू’चें यथार्थ चिंतन केल्यास प्रियजनाचें मरण आपल्या हृदयांत वैराग्यजनित मुमुक्षेची मंगल ज्योत पाजळून आपल्या हृदयगाभाऱ्यांत विराजणाऱ्या त्या हृदयेश्वराच्या

प्राप्तीचा मार्ग उजळून देऊं शकतें. म्हणून तर नचिकेता आपल्या 'मृत्यु'-जिज्ञासेला 'वर' म्हणूं शकला, म्हणून तर त्या 'मृत्यु'-जिज्ञासेला मृत्युदेवतेने दिलेलें उत्तर नचिकेत्याच्या पक्षीं सर्वांत श्रेष्ठ, सर्वांपरीस वांच्छनीय, अत्यंत अभिलषणीय, चिरकृतार्थकारी, महन्मंगल वरदान ठरूं शकलें.

याप्रमाणे मुमुक्षु नचिकेत्याचा 'प्रश्न' नीट आकळून घेऊं—ह्या यथार्थ साधकाच्या चरणचिन्हांचें अनुसरण करूं तरच आणि तेव्हाच आपण यमराजांनी त्याला दिलेल्या त्या उत्तराचा, त्या वरदानाचा लाभ घेऊं शकूं—यमराजांनी प्रदान केलेल्या ज्या पसायदानाने नचिकेता कृतार्थ झाला ती आत्मविद्या आकळूं शकूं, आत्मसात् करूं शकूं, आणि अखेर नचिकेत्यासारखें कृतकृत्य होऊं शकूं, एरवी नाहीं.

≡

काय उत्तर दिलें आहे बरें यमांनी नचिकेत्याच्या ह्या लोकोत्तर परिप्रश्नाला ? . . .

---

## तृतीय अध्याय

# श्रेय आणि प्रेय

१

स्वत:च्या बलिदानाने आपल्या पित्याचे शब्द खरे करण्यासाठी यमगृहीं आलेल्या नचिकेत्याला यमराजांनी तीन वर देऊं केले; कारण, प्रवासास गेलेल्या यमराजांची वाट बघत, कांहीहि न खातांपितां, बालतपस्वी ऋषिकुमार नचिकेता यमराजांच्या दारीं अहोरात्र सतत तीन दिवस पडून होता. स्वत:च्या कर्तव्याचें –स्वधर्माचें–पुत्रधर्माचें यथायोग्य पालन करण्याच्या मनीषेने नचिकेत्याने आपल्या पित्याचें कल्याण व्हावें असा पहिला वर मागितला. सर्वश्रेष्ठ भोगसुखाची – स्वर्गसुखाची – अभ्युदयाची जिने प्राप्ति होते ती अग्निविद्या त्याने दुसऱ्या वराने मागितली. परंतु, तो असाधारण शुभसंस्कारसंपन्न, वैराग्यशील, आत्मलाभेच्छु, मुमुक्षु ऋषिकुमार मनोमन, प्राणोप्राण जाणून होता की स्व-कर्तव्याच्या पालनांने वा अभ्युदयाच्या लाभाने माणूस खरोखर, कायमचा कृतार्थ कदापि होऊं शकत नसतो. आणि म्हणून, फिरून कधीहि अशी संधि मिळणार नाही हें जाणून त्याने तिसऱ्या वराने, मृत्युविषयक प्रश्नामधून अमर आत्म्याच्या स्वरूपाचें ज्ञान – ती चिरकृतार्थकारी अमृतमयी आत्मविद्या त्या मृत्युदेवतेला – ब्रह्मविद्याचार्य यमराजांना मागितली.

२

यमराजांनी प्रथम तर त्याला धुडकावूनच लावण्याचा प्रयत्न

केला. परंतु नचिकेता बधेना. त्याची ती दृढता पाहून, मनांतल्या मनांत आनंदून जाऊन, परंतु हा खरोखरच आत्मविद्येच्या ग्रहणाला पात्र आहे किंवा नाही हें पारखण्यासाठी त्यांनी त्याला मर्त्यांच्या नि स्वर्गीच्या निवडक भोगांचीं प्रलोभनें दाखवून पाहिलीं. पण, ह्या आत्म्याखेरीज बाकी सर्वचकांही क्षणभंगुर, अनित्य, असत्, मिथ्या आहे, तो आत्माच काय तो नित्य, सत्य, एकमेव वस्तु आहे अशा विवेकजनित वैराग्याने त्या समस्त क्षणस्थायी भोगांचा मोह दूर सारून यथार्थ साधक नचिकेता ब्रह्मविद्याचार्य यमराजां-जवळ आत्मविद्या प्रार्थू लागला.

≘

आत्मलाभासाठीची आपली योग्यता नचिकेत्याने सिद्ध केली.

त्याचें विवेकाधिष्ठित, डोळस वैराग्य, त्याची मुमुक्षा, त्याची आत्मप्राप्तीची व्याकुळता पाहून यमराजांना अतिशय संतोष वाटला. आत्मविद्येचा असा सुपात्र ग्रहीता गवसल्याने कुणा ब्रह्मज्ञ आचार्यवर्यांना आनंदाचें भरतें येणार नाही ? अशा प्रसंगीं यथार्थ गुरु बनतात कृपासागर, आणि यथार्थ शिष्य बनतो त्या सागराला उचंबळवून सोडणारा, गरगरून भरती आणणारा पुनवेचा चंद्र ! नचिकेत्याची आत्मलाभाची तळमळ बघून हरखून जाऊन यमराज म्हणाले—"वत्सा, सत्यलाभाची तुझी आकांक्षा खरोखर प्रशंसनीय आहे. बालतापसा, तुझ्यासारखे आत्मप्राप्तीसाठी तळमळणारे पृच्छक आम्हांला वारंवार लाभोत हीच इच्छा आहे."

२

ऐवढें झाल्यानंतर—आत्मविद्येच्या लाभासाठी नचिकेता पात्र आहे हें नीट पारखून पटल्यानंतर आता वास्तविक यम-राजांनी त्याला ती त्याची चिर-अभिलषित, चिरवांच्छित आत्मविद्या

सांगावयास सुरुवात करावयास हवी होती. कोणीहि आता असेच अपेक्षा करील. परंतु प्रत्यक्षांत यमराज मात्र तसे करीत नाहीत. शिष्याच्या वैराग्याची आणि व्याकुळतेची परीक्षा घेऊन, त्याच्या पात्रतेची पूर्ण खात्री पटल्यानंतर यमराज त्याला म्हणाले –

> “ अन्यत् श्रेय: अन्यत् उतैव प्रेय:,
> ते उभे नानार्थे, पुरुषं सिनीत:
> तयो: श्रेय आददानस्य साधु भवति,
> हीयते अर्थात् य उ प्रेयो वृणीते ॥”

—“ नचिकेत्या, लक्षांत ठेव – श्रेय (मोक्ष) निराळें, आणि प्रेय (भोग) निराळें – दोन्हीं अगदी वेगवेगळीं आहेत. स्वरूपत: वेगवेगळ्या असलेल्या ह्या दोन प्रवृत्तींचीं फलेंहि साहजिकच अजीबात भिन्न, अगदीच वेगवेगळीं आहेत. श्रेयाचें फल आहे मुक्ति, प्रेयाचें फल आहे संसारबंधन. ऋषिपुत्रा, जे लोक निव्वळच प्रवाहपतित जीवन जगत नसतात, जीवनांतील मूल्यांच्या उच्च-नीचतेचा, भलेबुरेपणाचा, ग्राह्याग्राह्यतेचा विचार करण्याची ज्यांच्यांत थोडीतरी कुवत असते, ते ह्या दोहोंतील एका प्रेरणेचा अंगीकार करून जीवन घालवीत असतात. कोण श्रेय:प्रेरणेचा स्वीकार करील आणि कोण प्रेय:प्रेरणेला बळी पडेल हें ज्याच्या-त्याच्या संस्कारांवर, जीवनोन्नतीच्या पातळीवर अवलंबून असतें. स्वत:च्या संस्कारांनुसार असा माणूस त्या दोहोंतील एकाचा आपला जीवनहेतु म्हणून, आपलें इतिकर्तव्य या भावनेने अंगीकार करीत असतो. ज्याला भोगांचें आकर्षण असतें, अभ्युदयाचीच लालसा असते असा अनुन्नत माणूस प्रेय:प्रवृत्तीची कास धरतो, आणि ज्याला मिथ्या भोगांचें वैयर्थ्य प्राणोप्राण जाणवून सत्य-स्वरूप परमात्म्याची आस लागली आहे, अमृतत्वाची वांच्छा

आहे असा समुन्नत पुरुष श्रेयःप्रवृत्तीचा आसरा घेतो. म्हणून एका अर्थानें असें म्हणतां येईल की, एकेकाच्या संस्कारांनुसार त्याचा जीवितहेतु बनून श्रेय आणि प्रेय हीं माणसांना जणु बांधीत असतात— बांधून जणु जबरदस्तीनेच ओढून नेत असतात. हे अनघ ऋषि-कुमारा, श्रेय:प्रवृत्ति ही विद्यास्वरूप आहे, आणि प्रेय:प्रवृत्ति ही अविद्यामय आहे. नचिकेत्या, विद्या आणि अविद्या ह्या केवळ वेगवेगळ्या—परस्पर भिन्नच नव्हत, तर त्या उजेड आणि काळोख यांसारख्या संपूर्णतया परस्परविरुद्ध आहेत. म्हणून ह्या श्रेय:प्रेयां-तील एकाचा त्याग केल्याखेरीज, एकच व्यक्ति एकाच वेळीं त्या दोहोंचें अनुष्ठान वा अनुगमन करूं शकणें नितान्त असंभवनीय होय. आणि म्हणूनच, जो त्यांतील अविद्यारूपी प्रेयाचा त्याग करून केवळ श्रेयाचाच स्वीकार करतो, केवळ श्रेयाचीच कास धरतो त्याचें मंगल होतें, त्याचें कल्याण होतें, त्याचें शुभ होतें. उलट जो अदूरदर्शी, विवेकहीन मनुष्य प्रेयाच्या प्रवाहांत वाहवतो, प्रेयाच्या पाठीमागे लागतो तो जीवनाच्या खऱ्या साफल्याला मुकतो, खऱ्या कृतार्थतेला आचवतो, जीवनाच्या खऱ्या अर्थापासून— परम पुरुषार्थापासून तो वंचित होतो, त्याचें जीवन खऱ्या अर्थानें तृप्त, पूर्ण होणें शक्य नाही."

≑

नचिकेता यथार्थपणें वैराग्यशील आहे, आत्मविद्येच्या ग्रहणास खरोखर पात्र आहे, मुमुक्षु आहे—आत्मविद्येची त्याला खरीखरी तळमळ आहे, आत्मलाभासाठी तो अत्यंत व्याकुळ झालेला आहे हें नीट पारखून, त्याबद्दल पूर्ण खात्री पटल्यानंतरहि ब्रह्मविद्याचार्य यमराजांनी आपल्या त्या सुयोग्य शिष्याला आत्म-विद्या द्यावयास आरंभ न करतां, त्याऐवजी प्रारंभींच ही श्रेय-

प्रेयाची चर्चा कां बरें सुरू केली असेल ? यमराज कुशल, आश्चर्यभूत असे ब्रह्मविद्याचार्य होते. ते उगाच कांहीतरी घोळ घालतील वा अप्रासंगिक, अप्रस्तुत चऱ्हाट वळून विषयान्तर करीत असतील हें तर संभवत नाही. मग हें कसें ? हें असें कां ? आता सरळ आत्मविद्या देण्याऐवजी मधेच हें श्रेय-प्रेयाचें विवेचन कां ?

३

ह्याचें कारण असें की यमराज हे खरोखरच एक निष्णात ब्रह्मविद्याचार्य होते ! आत्मविद्येच्या स्वरूपाविषयी – तिच्या साध्याविषयी, साधनांविषयी आणि साधनेविषयी ते पुरे जाणकार होते. हें सारें त्यांना 'करतलामलकवत्' स्पष्ट होतें. आणि म्हणूनच ते जाणून होते की साधकांत वैराग्य आणि व्याकुळता असली म्हणजे तेवढ्याने झालें असें नव्हे, कारण कितीहि झालें तरी 'साधक' तो 'साधक'च, तो अविद्येंत असतो; त्यामुळे मुमुक्षेबरोबरच– मोक्षाच्या इच्छेबरोबरच सुप्तभावें बुभुक्षा– भोगाची इच्छाहि त्याच्या चित्तांत असण्याची संभावना असते. हें प्रत्येक 'साधका'च्या बाबतींत खरें आहे. आता, ही भोगेच्छा कदाचित् स्थूल स्वरूपाची नसेल, साधकाला कदाचित् तिची तितकीशी जाणीवहि नसेल, परंतु ती सूक्ष्म स्वरूपाची, त्याच्या नेणिवेंत छपलेली असणें शक्य आहे. आणि जोंवर साधकाची आत्मप्राप्तीची इच्छा अशा स्थूल वा सूक्ष्म, जाणिवेंतील वा नेणिवेंतील भोगेच्छेशीं मिसळलेली असते तोंवर आत्मलाभासाठी बावनकशी तळमळ, सोळा आणे प्रामाणिक, आंतरिक ओढ, खरीखरी व्याकुळता वाटूं लागणें कदापि शक्य नाही. ज्या वेळीं अंत:करणांमधील स्थूल-सूक्ष्म, जाणिव-नेणिवेंतील भोगेच्छा मनोविज्ञानाने हतबल, हतप्रभ, अभिभूत होते, उपशम पावते त्या वेळीं मग 'हें भोगीन' 'तें

भोगीन' अशा सर्व भोगेच्छाजन्य मनाच्या वृत्ति लय पावतात. भोगवृत्ति अशा लय पावल्यामुळे मन तरंगहीन, शांत, स्थिर होऊन जातें. ह्यालाच म्हणतात शुद्ध, पारदर्शक मन. अशा शुद्ध मनाला स्वतःच्या बुडाशीं असलेल्या त्या सच्चिदानंदस्वरूप आत्मसत्तेचा प्रत्यय येऊं लागतो. पाण्यावरील तरंग थांबल्याने त्याच्या तळाशीं असलेली वस्तु बरीचशी स्पष्ट दिसूं लागण्यासारखें हें आहे. त्यामुळे, त्या साधकाच्या चित्तांत आधीपासूनच स्फुरत असलेली आत्माकांक्षा अधिक प्रबळ, प्रखर, गतिमान होऊन जाते. आणि मग साहजिकच साधक एखाद्या लक्ष्यवेधी तीरासारखा किंवा एखाद्या सागरगामी नदीसारखा थेट, सरळ त्या आत्म्याच्या पूर्ण साक्षात्काराकरता, त्यांत पूर्णपणें विलीन होण्याकरता तीव्र, अप्रतिहत वेगाने अग्रसर होऊं लागतो. शुद्ध, शांत, स्थिर मन फारच शक्तिशाली, गतिमान, वेगवान (dynamic) बनत असतें. ह्या 'तीव्र वेगा'लाच म्हणतात 'खरी' व्याकुळता, – 'निर्भेळ' मुमुक्षा!

अशी 'निर्भेळ' मुमुक्षा निर्माण होणें म्हणजेच आत्मलाभासाठी यथार्थपणें पात्र होणें होय. अशी पात्रता, अशी योग्यता आल्यानंतरच साधक मग मधेच कुठेहि न थांवतां संतत साधना करीत जाऊं शकून अखेर पूर्ण आत्मलाभ करून घेऊन चिरकृतार्थ होतो. भगवान् श्रीरामकृष्ण नेहमी म्हणत असत – "व्याकुळता आली की अरुणोदय झाला म्हणून समजा. त्यानंतर लवकरच सूर्य उगवेल."

सारांश, साधकांत नुसतें वैराग्य वा व्याकुळता असूनच भागणार नाही. तें 'निर्भेळ' व्हावयास हवें. हें वैराग्य, ही व्याकुळता 'निर्भेळ' कशी करावयाची ह्याचें मानसशास्त्रीय तंत्रच यमराज 'श्रेय-प्रेयां'च्या ज्ञानाद्वारें नचिकेत्यामार्फत तुम्हांआम्हांला – समस्त साधकांना शिकवीत आहेत! नचिकेत्याचें वैराग्य, त्याची व्याकुळता

ग्रं. श्रेय आणि प्रेय ....... वि: ...... ५५
क्रमांक ९६८८ नों. दि: २८।१।५५

पारखल्यानंतर तडक त्याला आत्मविद्या न सांगता यमराजांनी हे श्रेय-प्रेयाचें मनोविज्ञान द्यावयास कां सुरुवात केली ह्याचें कारण हें आहे ! यमराज खरेखरे, कसलेले ब्रह्मविद्याचार्य होते !

आता, भावनेच्या (emotion च्या) आवेगानेहि व्याकुळता वा वैराग्य असें 'निर्भेळ' म्हणजे 'एकाग्र' होणें शक्य आहे. परंतु अशी भावनेने आलेली एकाग्रता टिकाऊ असणें शक्य नाही. पुष्कळ साधक असें भावनेच्या भरांत तन-मनाने सर्व 'सोडून' भगवंतांत 'डुंवूं' जातात. कांही थोडा मार्ग ते क्रमतातहि. परंतु हळूहळू ही भावना ओसरते. भावनाच ती. ती ओसरणारच. मग व्याकुळता मंदावते भावनांनी दबली गेलेली मनांतील भोगेच्छा फिरून स्पंदूं लागते. एकाग्र मन अनेकाग्र होऊन जातें. साधना थांबते. इतकेंच काय पण पुष्कळदा, आधीची व्याकुळता वा वैराग्यहि लोपून साधक परत भोगांच्या चिखलांत लोळूं लागतो. ह्याला आपण साधकाचा 'अध:पात' म्हणतों. हा वास्तविक 'अध:पात' नव्हे, हें वस्तुत: त्याचें मूळ स्वरूप प्रकट होणें होय !—पाण्याने आपली पातळी गाठणें होय ! ह्याचें कारण आहे—भोगेच्छेचा निचरा करून मोक्षेच्छा निर्भेळ, एकाग्र करण्याचें मानस-'शास्त्र' डावलून साधक नुसत्या 'अंध' भावनांच्या आवेशांत अग्रसर झालेला असतो.

साधकांचें असें होऊं नये म्हणूनच ब्रह्मविद्याचार्य यमराज 'साधक' नचिकेत्याला हें भोग-मोक्षांच्या इच्छांचें मानस-'शास्त्र' शिकवीत आहेत. अशाने, भावनांनी तात्पुरती नव्हे, तर ह्या भरभक्कम मनोविज्ञानाने साधकाची मुमुक्षा यथार्थपणें निर्भेळ होईल, एकाग्र होईल, आणि प्रत्यक्ष आत्मलाभ होईपर्यंत इतर कुठेच न रमतांगमतां, कुठेहि न अडकतां-थबकतां अविरत साधना

करीत राहावयास तो समर्थ होईल.

≡

आत्मप्राप्तीच्या साधनेंत यशस्वी होण्यासाठी केवळ व्याकुळता, नुसती आत्मप्राप्तीची इच्छा असूनच भागणार नाही. ती व्याकुळता, ती इच्छा हाताळण्याचें, संचालित करण्याचें, सफल करून घेण्याचें 'शास्त्र' (science) वा कला (art) वा रीत (method) देखील जाणावयास हवी. एरवी ती व्याकुळता वाया जाऊन ती इच्छा अपूर्ण राहण्याची फार शक्यता आहे. भगवान् श्रीकृष्ण अर्जुनाला अत्यंत मार्मिक शब्दांत हेंच सुचवीत आहेत --

**"मनुष्याणां सहस्रेषु कश्चित् यतति सिद्धये ।**
**यतताम् अपि सिद्धानाम् कश्चित् मां वेत्ति तत्त्वतः ।।"**

--"अर्जुना, हजारो लोकांमधे एखादाच आत्मलाभासाठी प्रयत्न करीत असतो, आणि अशा प्रयत्न करणाऱ्या हजारोंपैकी एखादाच मज सर्वात्म्याला यथार्थभावें जाणण्यास समर्थ होत असतो." (गीता ७, ३.) श्रीकृष्ण अर्जुनाला हाच गंभीर इशारा देत आहेत की 'इच्छा असूनहि आणि प्रयत्न करूनहि न मिळणें' म्हणून कांही वस्तु धर्मजीवनांत आहे ! ती मोक्षेच्छा संचालित करण्याचें, त्या मोक्षेच्छेने प्रेरित होऊन साधना करण्याचें कांही शास्त्र आहे. तें न जाणतां, तदनुसार प्रयत्न न केल्यास प्रयत्न करूनहि ते सफल होत नाहीत ! म्हणूनच कितीतरीजण या अध्यात्ममार्गांत विफल होत असतात !

४

सारांश, अंतःकरणांतील स्थूल-सूक्ष्म भोगासक्तीचा उपशम करून वैराग्य-व्याकुळता निर्भेळ कशी करावी, मोक्षेच्छेंत स्थिरपणें प्रतिष्ठित होऊन इष्टसिद्धि होईपर्यंत साधना करण्यास समर्थ कसें

व्हावें – आत्मलाभ करून घेण्यास पूर्णतया पात्र कसें व्हावें हें सांगण्याकरताच, नचिकेत्याचें वैराग्य पारखून यमराज त्याला प्रत्यक्ष आत्मज्ञान देण्यापूर्वी हें श्रेय-प्रेय प्रवृत्तींच्या स्वरूपांचें (nature चें), कार्यांचें (functions चें) आणि फलांचें (effects चें) सखोल मनोविज्ञान ( deep psychological knowledge ) देत आहेत. हें केवळ भावनांनी जमणें शक्य नाही. त्यासाठी विज्ञानच हवें. वैराग्य-व्याकुळतेची भावनाजन्य निर्भेळता वा एकाग्रता निराळी आणि मनोविज्ञानाधिष्ठित निर्भेळता-एकाग्रता निराळी.

≑

यमराजांनी शब्द तरी किती वेचक, किती अर्थवाही, किती आशयव्यंजक, किती 'मानसशास्त्रीय' वापरले आहेत – 'श्रेय' आणि 'प्रेय'! – 'श्रेयस्कर' आणि 'प्रियकर'! भोग, भोगांचे विषय आपल्याला कसे 'प्रिय' 'प्रियकर' वाटत असतात, त्यांविषयी आम्हांला किती 'आवड' 'रुचि' वाटत असते, त्यांच्यामुळे कशी गोड, आल्हाददायक संवेदना होत असते. परंतु ह्या प्रेयाच्या – ह्या विषयासक्तीच्या – ह्या भोगलिप्सेच्या मागे लागून कुणी कधी तृप्त झालेला नाही – कुणाचेंहि कधी 'बरें' झालेलें नाही – 'कल्याण' झालें नाही. मानवाच्या अंतिम, यथार्थ 'कल्याणा'लाच यमराजांनी म्हटलें आहे – 'श्रेय.' प्रेय:प्रवृत्तीचा शेवट होतो अतृप्तीच्या अंधकारांत. प्रेय म्हणजेच अविद्या. श्रेय:प्रवृत्तीचा शेवट होतो आत्मबोधांत – आत्मज्योतीच्या लाभांत. श्रेय म्हणजेच विद्या.

≑

हा श्रेय-प्रेयविषयक यमराजांचा उपदेश ऐकून साहजिकपणेंच मनांत येणें शक्य आहे की श्रेय:प्रवृत्ति आणि प्रेय:प्रवृत्ति ह्या जर

माणसाच्या ठायी 'स्वाभाविक'पणें आहेत तर मग त्यांतील प्रेय:प्रवृत्तीचा उपशम कोणत्या उपायाने करावयाचा ?–ही 'स्वाभाविक' असणारी प्रवृत्ति कशाने जाणार ?

ह्या संदेहाचें यमराजांनी अत्यंत सुंदर निरसन केलें आहे, यमराज म्हणतात––

**"श्रेयश्च प्रेयश्च मनुष्यमेत:**
**तौ संपरीत्य विविनक्ति धीर: ।**
**श्रेयो हि धीरोऽभि प्रेयसो वृणीते**
**प्रेयो मंदो योगक्षेमात् वृणीते ।।"**

––"श्रेय आणि प्रेय या प्रवृत्ति माणुसमात्राठायीं आहेत, आणि त्यामुळे त्या दोहोंचा संघर्ष मानवाच्या जीवनांत उत्पन्न होतो खरा. पण माणसाच्या ठायी आणखी एक गोष्ट–आणखी एक शक्ति आहे. ती म्हणजे–नित्य-अनित्य विवेकाची, सत्य-असत्य विवेकाची शक्ति ! ह्या संघर्षाने न गांगरतां, जो त्या दोन्ही प्रवृत्तींचें स्वरूप, त्यांचीं कार्यें आणि त्यांचीं फलें यांचा नीट विवेक करतो तो प्रेयाचा त्याग करून श्रेयाचा मार्ग चोखाळून अखेर आत्मकल्याण साधण्यास समर्थ होतो. परंतु ज्याच्याठायीं हा विवेक नसतो असा अविवेकी माणूस सांसारिक नश्वर वस्तूंना आणि तज्जन्य क्षणिक सुखोपभोगांनाच श्रेष्ठ समजून त्यांच्याच मागे लागतो नि अखेर खऱ्या पुरुषार्थाला–मानवजीवनाच्या खऱ्या उद्दिष्टाला, खऱ्या सफलतेला मुकतो."

ह्या सत्-असत् विवेकाची कास धरून माणूस हळूहळू प्रेय:-प्रवृत्तीच्या पलीकडे जाऊन श्रेय:प्रवृत्तींत प्रतिष्ठित होऊं शकतो व आत्मलाभार्थ साधना करून अखेर कृतार्थ होऊं शकतो. ईश्वरच सत्य आहे, बाकी सर्व वस्तु, समस्त भोग हे क्षणभंगुर, अनित्य,

असत्य, मिथ्या आहेत, या बोधालाच म्हणतात विवेक वा विचार. ह्या विवेकानेच अनित्य, असत्य भोग हळूहळू अळणी वाटूं लागत जातात आणि सत्य वस्तूविषयी – आत्म्याविषयी – आकर्षण वाटूं लागतें. ह्यांनाच म्हणतात वैराग्य आणि मुमुक्षा वा व्याकुळता. यमराज आम्हांला सांगत आहेत की ह्या विवेकजनित वैराग्य-मुमुक्षेने माणूस प्रेय:प्रवृत्तीच्या – स्थूल वा सूक्ष्म भोगलालसेच्या कह्यांतून सुटून एकाग्रपणें निर्भेळ श्रेयाचा मार्ग आक्रमूं शकतो. म्हणून, आज आपल्यांत प्रेय:प्रवृत्ति वा भोगेच्छा असली तरी विवेकाची कास धरून वैराग्य-मुमुक्षा वाढीस लावत गेल्याने आपण अखेर श्रेयाच्या वा आत्मप्राप्तीच्या मार्गांत सुप्रतिष्ठित होऊन अंतीं आत्मकल्याण साधण्यास समर्थ होऊं शकतों.

आणि श्रेय:प्रवृत्ति व प्रेय:प्रवृत्ति ह्या दोन्ही माणसांत स्वाभाविक आहेत असें जें म्हटलें आहे त्याचा अर्थ असा नाही की त्या दोन्ही प्रवृत्ति एकाच अर्थाने माणसांत स्वाभाविक आहेत. यमराजांनी ही गोष्ट पुढे, आत्मस्वरूपाच्या विवेचनाच्या ओघांत नचिकेत्याला स्पष्ट करून सांगितली आहे. यमराजांनी नचिकेत्याला तिथे सुंदर रीतीने सांगितलें आहे की, माणसाचे 'दोन स्वभाव' आहेत – एक 'छाया' (अंध:कार) स्वभाव आणि दुसरा 'आतप' (प्रकाश) स्वभाव, म्हणजेच, एक आहे त्याचा अविद्या-जन्य स्वभाव आणि दुसरा आहे त्याचा खरा स्वरूपगत स्व-भाव. एक आहे त्याचा मायामय स्वभाव, दुसरा आहे त्याचा ब्रह्म-स्वरूप स्वभाव. पहिला आहे त्याचा वरवरचा, भासमान (apparent) स्वभाव, दुसरा आहे त्याचा खरोखरचा, स्वरूपसिद्ध (Real) स्वभाव. माणूस हा अविद्येमुळेच 'माणूस' (जीव) आहे, 'वस्तुत:' तो नित्य-शुद्ध-बुद्ध-मुक्तस्वभाव, सर्वातीत-

सर्वगत आत्म्याचा अंश आहे – स्वयं तो आत्माच आहे. हें स्वतःचें स्व-रूप विसरल्यामुळेच माणूस 'भोक्ता' बनतो आणि ह्या विश्व-संसारांतील नाना क्षणभंगुर भोग्यांच्या मागे धावून त्यांच्या भोगाने तृप्त होण्याची धडपड करीत असतो. स्व-रूपाच्या विस्मरणांतून जन्मलेल्या ह्या त्याच्याठायीच्या भोगस्पृहेलाच यमराजांनी म्हटलें आहे – 'प्रेयःप्रवृत्ति' ती माणसाच्या ठिकाणीं 'स्वाभाविकपणें' आहे याचा अर्थ ती त्याच्या ह्या 'छाया स्वभावा'ला स्वाभाविक आहे – तो अंधारांत वा अविद्येंत आहे म्हणूनच ती 'स्वाभाविक' वाटत आहे. परंतु, स्वतःच्या सत्-चित्-आनंद-स्वरूपाचा विसर पडला तरी तेंच त्याचें खरें स्व-रूप असल्यामुळे त्याची (स्व-स्वरूपाची) ओढ माणसाच्या ठायी अगदी 'स्वाभाविकपणें'च असणार. ह्या खऱ्या स्व-रूपाच्या ओढीलाच यमराजांनी नांव दिलें आहे – 'श्रेयःप्रवृत्ति'. ती अगदी खऱ्या अर्थाने माणसाची – माणुस-मात्राची 'स्वाभाविक' प्रवृत्ति होय. ती त्याच्या प्रकाशमय स्वरूपाला, आत्मस्वरूपाला स्वाभाविक आहे. आणि म्हणूनच विवेकाने, विवेकसंयुक्त भोगाने माणूस ह्या स्वाभाविक भासणाऱ्या प्रेयःप्रवृत्तीवर मात करून अखेर स्वतःच्या यथार्थ स्वभावसिद्ध अशा श्रेयःप्रवृत्तींत प्रतिष्ठित होऊं शकून आत्मलाभ करून घेऊं शकतो. ह्या मृगजलसमान संमोहक भोग्यांची भुरळ पडून ज्याचें त्याला विस्मरण झालें आहे त्या स्व-स्वरूपाचें स्मरण करणें म्हणजेच 'विवेक' होय. सारांश, हा विवेक म्हणजे माणसाच्या अंतर्यामांतील आत्मज्योतीचा – त्याच्या अंतरात्म्याचा प्रकाश होय. त्या प्रकाशाने माणसाच्या अंतःकरणांतील अज्ञानांधकारजन्य प्रेयः-प्रवृत्तीचा परिहार होऊं शकेल – स्थूल-सूक्ष्म, जाणिवेंतील वा नेणिवेंतील समस्त भोगवासनेचें निखंदन, समूळ उन्मूलन होऊं

शकेल यांत काय संशय ?

म्हणूनच यमराज नचिकेत्याला निमित्त करून तुम्हांआम्हांला सांगत आहेत की, माणसांत आज – अविद्यावस्थेंत – श्रेय 'आणि' प्रेय दोन्ही प्रवृत्ति असल्या तरी, त्याच्याठायीच स्वाभाविकपणें वसणाऱ्या विवेकशक्तीच्या साहाय्याने माणूस प्रेयाच्या कचाटयांतून सुटून श्रेयाचा मार्ग निर्भेळ एकाग्रतेने आक्रमूं शकतो.

३

हें सगळें ठीक आहे. पण ! . . .

जगांत इतकीं धर्मशास्त्रें उदयास आलींत, इतक्या अवतार-महापुरुषांनी त्यांतील सत्यें स्वत:च्या प्रत्यक्ष जीवनांनी प्रमाणित करून दाखविलींत, तरी सुद्धा माणसाचे 'पण' 'परंतु' 'तथापि' कांही थांबलेले नाहीत !

वरील विवेचन वाचून मनांत येतें – हें सगळें ठीक आहे. पण, माणसांत जर श्रेय आणि प्रेय ह्या दोन्ही प्रेरणा, कोणत्याहि अर्थाने आणि कशाहि का होईनात, जर 'स्वाभाविक'च असतील तर मग त्या दोन्ही एकत्र करून, दोहोंचा मेळ घालून आपण आपलें जीवन घडवावयास काय हरकत आहे ?

हा 'श्रेय आणि प्रेय' 'मोक्ष आणि भोग' एकत्र करण्याचा, 'ईश्वर आणि दुनिया' 'राम आणि काम' यांचा मेळ घालण्याचा (compromise करण्याचा) मोह माणसाला सदाच पडत आलेला आहे. माणसाला पडणाऱ्या सर्व मोहांमधे हा अत्यंत भयंकर, अत्यंत घातुक, अत्यंत दुष्ट, अत्यंत जहरी, अत्यंत फसवा मोह आहे. मानवजीवनसागरांत आजवर किती आयुर्नौका ह्या 'योग-भोगां'चा मेळ घालण्याच्या मोहरूपी फसव्या खडकावर आदळून फुटून रसातळाला गेल्या आहेत याची गणती नाही.

म्हणूनच यमराज आम्हां सर्वांना स्पष्ट, असंदिग्ध खणखणीत शब्दांत बजावतात --

**"दूरमेते विपरीते, विषूची**
**अविद्या या च विद्येति ज्ञाता।"**

--"श्रेय आणि प्रेय हीं दोन केवळ निराळीं वा वेगळीं आहेत इतकेंच नव्हे, तर त्यांचा स्वभावच परस्परांना मारक आहे. त्यांची घडणच एकमेकांना वगळणारी (mutually exclusive) आहे; एकाचा दुसऱ्यांत अंतर्भाव वा समावेश होऊंच शकत नाही. कारण ज्ञात्यांचा अनुभव आहे की श्रेय हें विद्यास्वरूप आहे तर प्रेय आहे अविद्यास्वरूप, श्रेय विवेकात्मक आहे तर प्रेय आहे अविवेकात्मक. एक प्रकाशमय आहे तर दुसरें अंधकारमय आहे. आणि म्हणूनच, अगदी स्वाभाविकपणेंच त्यांचीं फळेंहि सपशेल भिन्न, परस्परविरुद्ध आहेत. श्रेयाचें फळ आहे मुक्ति, तर प्रेयाचें फळ आहे पुन:पुन: जन्ममरणरूपी संसार. म्हणूनच जो त्यांतील श्रेयाचेंच ग्रहण करून आपलें आयुष्य घडवितो त्याचेंच कल्याण होतें. आणि जो प्रेयाच्या मृगजळामागे धावतो तो अखेरवर अकृतार्थच राहतो." आत्मा आणि त्यासाठीचें आकर्षण (श्रेय) हेंच माणसाचें खरें स्वरूप आहे. 'भोक्ता-भोग' बोध आणि तज्जन्य भोगलालसा (प्रेय) हें माणसाचें मायामय रूप आहे. मायिक प्रवृत्तीच्या मागे लागून माणूस कृतार्थ होणें कसें शक्य आहे ? कस्तुरीसाठी इतस्तत: वणवण भटकणाऱ्या कस्तुरीमृगासारखीच अखेर त्याची दशा होणार. आणि म्हणूनच त्याच्या खऱ्याखऱ्या आतप (प्रकाश) स्व-रूपाचा आणि मायिक छाया (अंध:कार) रूपाचा मेळ तरी कसा बरें घालतां येणार ?

म्हणून, आपल्याला जर खरोखर आत्मकल्याण साधावयाचें असेल, आपल्याला जर खरोखर सत्याची चाड असेल तर आपण

विवेकशक्तीच्या मदतीने स्थूलसूक्ष्म, जाणिवे-नेणिवेंतील समस्त भोगवासनांचा निचरा करून, हा अंधकारमय आयुष्याचा लोभ निर्ममपणें सोडून देऊन, त्या आत्मगामी श्रेय:प्रवृत्तींत स्थिरपणें स्थित होऊन आत्मलाभार्थ साधना करावयास हवी. प्रेयाच्या मागे वेबंद धावण्याचा अविवेकजन्य अदूरदर्शीपणा, किंवा श्रेय-प्रेयांचा मेळ घालण्याचा महाभयंकर, भ्रामक मोह आपण आपल्या जीवनांत कटाक्षाने, अत्यंत जागरूकपणें टाळावयास हवा. आता, आज आपण दुबळे असूं, नचिकेत्याप्रमाणे दृढचित्त, आदर्शनिष्ठ, आदर्शकेंद्री आपण आज कदाचित् नसूं, व म्हणून आज प्रेयाचें आकर्षण आपल्याला असेल. परंतु आपण आपल्या मनाला सांगावयास-शिकवावयास हवें की आज आपण दुबळे आहोंत म्हणून आपण नचिकेत्याप्रमाणे प्रेय वा भोग संपूर्णतया झिडकारूं शकत नाहीं, परंतु विवेकाभ्यासाने आणि विवेकसंयुक्त प्रेयोपभोगाने आपल्या जीवनांत अशी एक वेळ यावयास हवी की जेव्हा आपण आपल्या प्रेयप्रवृत्तीच्या–आपल्या दुबळेपणाच्या–आपल्या स्थूल-सूक्ष्म विषया-सक्तीच्या – आपल्या जाणिवे–नेणिवेंतील भोगलालसेच्या संपूर्ण पलीकडे जाऊन, तिचा पूर्णतया त्याग करून केवळमात्र श्रेयाचीच कास धरूं शकूं व त्या एकाग्र, एकनिष्ठ, निर्भेळ श्रेय:साधनेने अखेर स्वत:चें चरम, चिरंतन कल्याण करून घेऊं शकूं. एरवी, श्रेय-प्रेयाचा, योगभोगाचा कदापि न घातला जाऊं शकणारा मेळ घालण्याच्या, वरवर सोज्वळ दिसणाऱ्या पण अतिभयंकर, फसव्या मोहराक्षसाच्या भुलावणीस जर आपण बळी पडलों तर आशाभंग, आत्मवंचना, आणि आत्मघात याखेरीज आपल्या पदरीं आणखी कांही पडणार नाही याची आपण पक्की खूणगाठ बांधून ठेवावी. उजेड आणि काळोख यांचा मेळ न कधी कुणी घालूं शकला आहे,

न कधी कुणी घालूं शकणार आहे. म्हणूनच जीवनपारंगत, निष्णात जीवनशिल्पी ब्रह्मविद्याचार्य यमराजांनी आम्हांला प्रेमाचा, पण घनगंभीर इशारा देऊन ठेवला आहे की, ते मुळी 'स्वरूपत:'च (constitutionally च) मेळ (compromise) होऊं न शकणारे आहेत.

५

असो तर, याप्रमाणे श्रेय आणि प्रेय हीं वेगवेगळीं आहेत, मुक्ति आणि संसार हीं त्यांचीं भिन्न प्रयोजनें आहेत, म्हणून श्रेयाचा स्वीकार केल्यानेच माणसाचें कल्याण होतें, नित्यानित्य विवेकाने साधकाने प्रेय:प्रवृत्तीचा परिहार करून श्रेय:प्रवृत्तींत वा मोक्षाकांक्षेंत स्थित व्हावयास हवें; प्रेयाने वा भोगांनी माणूस कधीच कृतार्थ होणें शक्य नाही, श्रेय आणि प्रेय केवळ भिन्नच नव्हत तर उजेड-काळोखाइतकीं परस्पर संपूर्णतया विरोधी आहेत, म्हणून कल्याणकामी साधकाने त्यांचा मेळ घालण्याच्या मोहापासून कटाक्षाने अलिप्त राहिलें पाहिजे इत्यादि सांगून श्रेय-प्रेयांच्या तुलनात्मक विवेचनाने ब्रह्मविद्याचार्य यमराजांनी श्रेयोमार्गाचा महिमा नचिकेत्याला निमित्त करून तुमच्या-आमच्या हृदयावर बिंबविला. पण ही झाली एक बाजू – श्रेयोमार्गाचा महिमा. पण यम एवढ्यावरच थांबले नाहीत. साधकाने श्रेयोमार्गाने आणि श्रेयोमार्गानेच कां व कसें जावयाचें हें सांगून झाल्यावर आता त्यांनी, प्रेयोमार्गाने गेल्यास माणसाची काय दुर्दशा होते, आयुष्याची कशी माती, कशी धूळधाण होते ह्याचें जिवंत चित्र रेखाटावयास सुरुवात केली. श्रेयोमार्गाच्या माहात्म्याचें वर्णन हा झाला इति पक्ष – positive side – विधिआत्मक बाजू – काय करावयास हवें यासंबंधी उपदेश. यमराज हे निष्णात गुरु होते. म्हणून एवढ्या-

वरच न थांबतां, मोक्षाकांक्षी साधकाने सदा त्या श्रेय:प्रवृत्तींत आणि श्रेय:प्रवृत्तींतच स्थिरपणें स्थित असावें, कधीच तींतून चळूं-ढळूं नये म्हणून ते आता त्या श्रेयविरोधी प्रवृत्तीच्या – प्रेयाच्या – पाठीस लागण्याने होणाऱ्या विषारी प्रतिक्रिया वर्णीत आहेत. ह्याला म्हणतां येईल नेति पक्ष– negative side – निषेधात्मक बाजू – काय करावयास नको ह्यासंबंधी उपदेश. विधि 'आणि' निषेध हे दोन्ही जाणल्यानेच साधक प्रेयोमार्ग वा भोगलालसा मनापासून अव्हेरून, पक्का, कायमचा श्रेयोमार्गांत वा मोक्षप्रवृत्तींत स्थित होऊं शकेल, त्यापासून चळून मधेच पुन्हा प्रेयोमार्गाकडे वळणार नाही, किंवा फिरून त्याला कदापि श्रेयप्रेयांचा मेळ घालण्याची सर्वनाशी दुर्बुद्धि सुचणार नाही. आणि मग निर्भेळ, एकाग्र एकनिष्ठेने श्रेयोमार्ग आक्रमीत राहून, अंतीं त्या मार्गाचा शेवट जो आत्मलाभ, त्या लक्ष्याप्रत पोहोचून तो कृतकृत्य होऊं शकेल. यमराज खरेखरे मानवमनस्तत्त्वज्ञ होते, निष्णात साधनारहस्यज्ञ होते !

३

अस्तिपक्षीं, विधिरूप साधनेचें ज्ञान देऊन झाल्यानंतर ते म्हणाले –

"आपल्या अंत:करणांतील प्रेयाच्या – भोगाच्या – प्रवृत्तींत वाहविल्याने, माणसाच्या अंत:करणांत नित्य-अनित्य विवेकाचा, सार-असार विचाराचा जो काय अंधुक प्रकाश प्रथम तेवत असतो तोहि अनिर्बंध भोग भोगतां भोगतां हळूहळू लोपून जातो, आणि अखेर त्याच्या अंत:करणांत अविवेकाचा घनदाट काळोख माजतो. अविवेक वाढणें म्हणजेच भोगतृष्णा सारखी वृद्धिंगत होणें. विवेकहीन माणसाची भोगतृष्णा सारखी फोफावत जाते. तऱ्हतऱ्हेच्या वासनांच्या जाळ्यांमधे माणूस मग दिवसेंदिवस अधिकाधिक

गुरफटत जातो. अणि वासनामय, भोगमय, अविवेकी आयुष्यांत अपरिहार्यपणें भोगाव्या लागणाऱ्या आपत्तींनी, प्रतिक्रियांनी, आघातांनी, संकटांनी माणूस अगदी रंजीस येतो. भोगासक्त माणसांत, कसा कुणास ठाऊक, स्वत:च्या शहाणपणावर, स्वत:च्या समजशक्तीवर, स्वत:च्या बुद्धीवर भलताच भरवसा निर्माण होत असतो. तो हट्टाने सदा स्वत:च्याच बुद्धीनुसार वागत असतो. परंतु ती त्याची बुद्धि विवेकहीन असते. आणि तो स्वत: अज्ञानी असतो. म्हणून मग अंधळ्यामागे जाणाऱ्या अंधळ्यासारखी त्याची गत होते. विटंबना, अतृप्ति, ससेहोलपट इत्यादींखेरीज अशाने आणखी काय लाभणार ?

"आणि ही घसरगुंडी एवढ्यावरच थांबत नाही. भोगासक्तीने, सतत करीत गेलेल्या नाना प्रकारच्या बेबंद भोगांनी माणसाची बुद्धि झाकाळून जाते, ती कशी गढूळ, अस्वच्छ होऊन जाते. मानवीजीवनांतील उच्च आदर्श, उच्च ध्येय-हेतु-प्रेरणा वगैरे आकलण्याच्या बाबतींत ती बोथट, बथ्थड होऊन बसते. मोक्ष, आत्मा, ईश्वर इत्यादि सूक्ष्म, अतींद्रिय सत्यांची धारणा करतां येणें मग माणसाला असंभव होऊन जातें. ही दुर्गति अर्थातच एकदम, एकाएकी ओढवणार नाही, परंतु शरीरसुख, पैसा, नामयश इत्यादि भोगांचा सतत पाठपुरावा करीत गेल्याने, प्रेयाच्या प्रवृत्तींत वाहविल्याने माणसांत हळूहळू बदल होत जाऊन त्याची अशी दशा होणें अगदी अपरिहार्य आहे. भोगांचा मोह माणसाकडून नाना दुष्कृत्यें, नाना उघडीं-झाकलीं पापें करवून घेतो. त्यांचा परिणाम भोगावा लागणारच. आणि, सुरुवातीला हृदयांत जी काय श्रद्धा, आस्तिकता, धर्मबुद्धि असते तिचाहि फोफावत्या भोगासक्तीने हळूहळू लोप होत जाऊन, 'हें जें जग दिसतें आहे तेंच खरें आहे, यापलीकडे, यावेगळें

आणखी कांही नाही, ह्या जगांत खाणें-पिणें-मजा करणें हेंच मानव-जीवनाचें उद्दिष्ट आहे; परलोक, आत्मा, ईश्वर, पुनर्जन्म, कर्मफल वगैरे झूट आहेत, त्या न दिसणाऱ्या गोष्टींमागे लागणें वेडगळपणा आहे, निव्वळ खुळचटपणा (superstition) आहे असें तो मानूं-म्हणूं लागतो. याप्रमाणे बाह्य भोग्य विषयांवरील त्याची दुःख-अतृप्ति-अशांतिपर्यवसायी आसक्ति तर सारखी वाढत जातेच, पण त्याचबरोबर त्याची बुद्धिहि खोटी, विकृत होऊन जाते. बुद्धिच माणसाच्या जीवनाचें सुकाणू होय. तीच याप्रमाणे बेकाम होऊन जाते. अशा भोगासक्त, भोगकेंद्रित, बेलगाम जीवनाचा परिणाम सुखद कसा बरें होईल ?"

३

असो तर, माणसांत आत्मलाभाची, भगवद्दर्शनाची इच्छा असूनहि, त्याच्यांतील भोगेच्छा जर खेळूं लागली, माणूस जर तींत वाहवला तर हळूहळू, त्याच्या अगदी न कळत, पण अनिवार्यपणें त्याची बुद्धि, त्याची विवेकशक्ति गढूळ होऊन जाते. तसें झाल्यास त्याला भगवंताचा—जीवनांतील आणि जगांतील त्या अंतिम सत्याचा—संपूर्ण विसर पडून जातो, किंवा तो योग आणि भोग, राम आणि काम यांचा कदापि न बसणारा मेळ घालण्याचा निष्फळ आटापिटा करण्याच्या भरीस पडून अमोल मानवजीवनाचा वेडा अपव्यय करतो.

म्हणून, यमराजांनी श्रेय आणि प्रेय प्रवृत्तींचें जें विधिपर आणि निषेधात्मक मनोविज्ञान आपल्याला दिलें आहे त्याच्या साहाय्याने जर आपण आपलें जीवन घडविलें तर हळूहळू आपल्या भोगवृत्तीचा उपशम होईल, आपलें मन स्थिर, शांत, पारदर्शक होईल आणि मग त्याच्या बुडाशीं असलेल्या चित्सदानंद आत्म्याचा

आपल्याला जिवंत प्रत्यय येऊं लागेल, व त्यामुळे आपली आधीची श्रेय:प्रवृत्ति, आपली मोक्षेच्छा, आपली व्याकुळता शतसहस्रपट वाढून, निर्भेळ होऊन, प्रबळ होऊन, वेगवंत होईल नि तिने प्रेरित होऊन साधना करीत करीत आपण अखेर त्या आत्मस्वरूपांत लीन होऊन कायमचे कृतकृत्य होऊं शकूं.

६

व्याकुळता हें आत्मलाभाचें – भगवद्दर्शनाचें प्रमुख साधन आहे. भगवान श्रीरामकृष्ण म्हणत असत – "व्याकुळता आली की अरुणोदय झाला म्हणून समजा. त्यानंतर लवकरच सूर्य उगवेल." ते म्हणत असत – "पैसा मिळाला नाही, मूल होत नाही म्हणून लोक रडूनरडून आसवांचे पाट वाहवितात, पण भगवंताचा लाभ झाला नाही, भगवंताच्या चरणकमलीं भक्ति उत्पन्न झाली नाही म्हणून कुणाच्या डोळ्यांवाटें एक टिपूस तरी गळलें आहे?" श्रीरामकृष्णदेव नेहमी म्हणत असत – "तीन प्रकारच्या ओढींची शक्ति एकवटल्यास ईश्वर दर्शन देतो – विषयी माणसाची विषयांसाठीची ओढ, आईची आपल्या मुलासाठीची ओढ अन् सतीची पतीसाठीची ओढ. ह्या तीन ओढींची शक्ति कुणांत जर एकाच वेळीं ईश्वरासाठी उत्पन्न होईल तर तिच्या जोरावर ईश्वराचें दर्शन करून घेतां येणें शक्य आहे."

आपल्या अंत:करणांतील मोक्षाच्या इच्छेस, भगवत्प्राप्तीच्या इच्छेस विरोध करणाऱ्या, रोधणाऱ्या, अडथळा करणाऱ्या स्थूल-सूक्ष्म, जाणिवे-नेणिवेंतील भोगवासनेचा निरास करून आत्म-लाभासाठी 'तीन ओढींची शक्ति' म्हणजेच प्रबल, नि:सीम, निष्कपट, निर्भेळ, एकाग्र व्याकुळता हृदयांत निर्माण कशी करावी ह्याचेंच मानसशास्त्रशुद्ध अपरूप तंत्र ब्रह्मविद्याचार्य यमराजांनी यथार्थ

मुमुक्षु नचिकेत्याला, आणि त्याच्या द्वारें तुम्हांआम्हांला ह्या श्रेय-प्रेयांच्या इति-नेति उभयविध, सविस्तर विवरणाने उपदेशिलें आहे. आत्मविद्येपूर्वी, ती विद्या ग्रहण करण्यास योग्य अशी मनोभूमिका तयार करणारें हें श्रेय-प्रेय प्रवृत्तींचें मनोविज्ञान म्हणजे भगवत्-दर्शनासाठीच्या व्याकुळतेचें—मुमुक्षेचें—औपनिषदिक मानसशास्त्रच होय. तदनुसार आपली व्याकुलता संचालित केल्यास नचिकेत्या-प्रमाणे आत्मलाभास पात्र होऊन साधक अखेर नचिकेत्याप्रमाणेच आत्मलाभ होऊन कृतार्थ होतोच होतो.

# चतुर्थ अध्याय

# आत्मविद्या

१

व्यवहारांतली नेहमीची रुळलेली गोष्ट आहे. माणसाला साधारणपणें दोन नांवें असतात – एक त्याचें 'घरांतलें' नांव, आणि दुसरें त्याचें 'बाहेरचें' नांव. 'बाबू' या नांवाने जी व्यक्ति 'घरांत' संबोधिली जाते, 'ती'च व्यक्ति 'जगांत' 'रामचंद्र' या नांवाने उल्लेखिली जात असते. व्यक्ति मात्र तीच – एकच.

तद्वतच भगवंताचीं दोन नांवें आहेत – एक 'आत्मा' आणि दुसरें 'ब्रह्म'! महाभाग्यवान साधक ज्या वेळीं भगवंताला स्वतःच्या 'हृदयांत' अनुभवीत असतो त्या वेळीं तो त्याला म्हणतो 'आत्मा'; आणि ज्या वेळीं तो 'त्या'च भगवंताला समस्त 'जगांत' बघत असतो त्या वेळीं तो त्याला म्हणतो – 'ब्रह्म'! भगवान मात्र तोच – एकच. जो आंत, हृदयांत आहे, तोच बाहेर, जगांत आहे. जो हृदयनाथ आहे, तोच त्रिभुवननाथ आहे. पंडितांच्या पारिभाषिक शब्दांत त्या एकमेवाद्वितीय प्रभूच्या ह्या 'आंतील' अस्तित्वाला म्हणत असतात 'प्रत्यक्' सत्ता. आणि त्याच्याच 'बाहेरील' अस्तित्वाला म्हणत असतात 'पराक्' सत्ता. प्रत्यक् आणि पराक्, उभयत्र तो सच्चिदानंदच विलसत असतो.

२

स्वकर्तव्यसंबद्ध आणि अभ्युदयविषयक असे दोन वर देऊन झाल्यानंतर यमराजांनी नचिकेत्याला ज्या वेळीं तिसरा वर

मागावयास सांगितलें त्या वेळीं नचिकेत्याने म्हटलें – "माणूस मरतो त्या वेळीं कुणी म्हणतात की तो आहे, आणि कुणी म्हणतात की तो नाही. आमचा हा संशय प्रत्यक्ष प्रमाणाने वा अनुमानाने दूर होणें कदापि संभवनीय नाही. तरी दया करून आपण तो दूर करा. तिसऱ्या वराने मी हेंच आपल्या श्रीचरणांजवळ मागत आहें."

माणूस मरतो त्या वेळीं त्याच्या शरीर-इंद्रियें-मन-बुद्धि-अहंकार इत्यादींचा नाश होतो, त्याचें कांहीच उरत नाही हें प्रत्यक्षच दिसत असतें. तरीपण नचिकेता म्हणतो की 'तो असतो की नसतो' हें आपण मला सांगा. ह्याचा अर्थ हाच की ह्या विनाशी शरीर-इंद्रिय-मन-बुद्धि- अहंकार इत्यादींच्या नाशाने नष्ट न होणारी कांही सत्ता माणसांत असते हें नचिकेत्याला – त्या नित्य-अनित्य विवेकयुक्त, वैराग्यशील, शुद्ध हृदयाच्या साधकाला प्राणोप्राण जाणवत आहे. परंतु तो 'साधक' असल्यामुळे त्याची ही जाणीव स्पष्ट, स्फुट, असंदिग्ध नाही. आणि म्हणूनच तो यमराजांना – त्या यथार्थ ब्रह्मविद्याचार्यांना नश्वर मानवाच्या 'आंतील' – शरीर-इंद्रियें-मन-बुद्धि-अहंकार यांपलीकडील अविनश्वर सत्तेसंबंधी – 'प्रत्यक्' सत्तेसंबंधी परिप्रश्न विचारीत आहे.

म्हणजेच, नचिकेता यमराजांना मृत्युजिज्ञासेमधून 'आत्म'-विद्येचें चिरकृतार्थकारी, शालीन वरदान मागत आहे !

२

क्षणभंगुर भोगांविषयीचें नचिकेत्याचें विवेकनिष्ठ वैराग्य, आणि त्या चिरंतन आत्म्याच्या लाभासाठीची त्याची व्याकुळता बघून यमराज परम प्रसन्न झाले. ही व्याकुळता निर्भेळ, एकनिष्ठ, एकाग्र करण्यासाठी त्यांनी त्याला श्रेय-प्रेयांचें अलौकिक मनोविज्ञान दिलें. याप्रमाणे आत्मविद्येच्या ग्रहणासाठी त्याची मनोभूमिका

पूर्णपणें तयार झाल्यानंतर यमराज त्याला ती गुह्यतम, सर्वविद्या-प्रतिष्ठा आत्मविद्या देऊं लागले :

ॐ

यमराज म्हणाले –

"पुरम् एकादशद्वारम् अजस्यावक्रचेतसः
अनुष्ठाय न शोचति, विमुक्तश्च विमुच्यते ।
एतत् वै तत् ॥"

–"नचिकेत्या, हें मानवशरीर म्हणजे जणुकाय एक नगर आहे. नगराला जशा वेशी असतात तशा या शरीर-नगरालाहि दोन डोळे, दोन कान, दोन नाकपुड्या, मुख, नाभि, दोन खालचीं छिद्रें आणि टाळूमधील ब्रह्मरंध्र अशा अकरा वेशी आहेत. इंद्रियें, प्राण, त्वचा-मांस-रुधिरादि, मन-बुद्धि-अहंकार इत्यादि इत्यादि हीं त्या शरीर-नगरांतील पहारेकरी, तट, मंत्री, भाट वगैरे होत. नगराचें अस्तित्व त्या नगराच्या राजाकरता असतें, तो त्या नगराचा स्वामी वा मालक असतो; पहारेकरी, मंत्री, भाट इत्यादींचे त्या नगरांतील समस्त व्यवहार राजासाठी आणि राजाच्या आज्ञेनेच होत असतात. त्या राजाचा अंमल नगरभर सर्वत्र असतो, आणि तरीहि राजा त्या नगराहून, नगराच्या मंत्र्यादि समग्र घटकांहून, त्या नगरांत चालणाऱ्या समस्त व्यवहारांहून वेगळा, अलग, अलिप्त असतो. तद्वतच, ह्या शरीरनगरांतहि एक राजा राज्य करीत असतो – तोच त्याचा मालक होय. ह्या शरीराचें अस्तित्व त्याच्याकरताच आहे; ह्या शरीरांतील इंद्रियें, प्राण, मन-बुद्धि-अहंकार इत्यादींचें समस्त व्यवहार त्याच्यासाठी आणि त्याच्या आज्ञेनेच होत असतात. तो ह्या शरीरांत सर्वत्र व्यापून असूनहि, शरीराचे सर्व घटक आणि त्या घटकांचे समस्त व्यवहार यांपासून तो वेगळा, अलग, अलिप्त

असतो. ह्या शरीरनगरांतील त्या सर्वगत-सर्वातीत राजाचें नांव आहे – आत्मा !

"नचिकेत्या, साधारण नगराचें आणि ह्या शरीरनगराचें साम्य येथेच संपतें. कारण, साधारण नगराचा राजा हा, तें नगर आणि त्याचे सर्व घटक यांप्रमाणेच विनाशी असतो. परंतु ह्या शरीरनगराचा स्वामी असलेला हा आत्मराज स्वयंभू, सत्-स्वरूप, चित्-स्वरूप, आनंदस्वरूप, सनातन, चिरंतन, जन्ममृत्युरहित आहे ! जन्म, जरा, मृत्यु इत्यादि परिवर्तनें हीं तें शरीरनगर आणि त्या शरीरनगराचे घटक यांनाच फक्त लागू आहेत; त्या नगराच्या ह्या मालकाला तीं स्पर्शहि करूं शकत नाहीत ! त्या मालकाचें, आत्मदेवाचें स्वरूपच मुळी असें आहे – अनादि अनंत अस्तित्व, चैतन्य आणि आनंद हेंच त्याचें स्वरूप आहे. ह्या शरीरनगराच्या ऱ्हास-वृद्धीने वा जन्म-मृत्यूने त्या आत्मनाथांत कधीहि कांहीहि परिवर्तन वा बदल घडत नाही. आणि सूर्य जसा सदा प्रकाशमान आहे त्याचप्रमाणे हा नित्य आत्माहि ह्या अनित्य शरीर-इंद्रियें-मन-बुद्धि-मीपण इत्यादि रूपांनी सदा विलसत असतो. तो अपरिवर्तनीय अस्ति-भाति-प्रिय स्वरूप, नित्य सत्ता-प्रकाश-सुख स्वरूप आत्मा ह्या परिवर्तनशील, मिथ्या शरीरेंद्रियमनबुद्धिअहंकारादि नाम-रूपांनी सदा खेळत असतो – लीला करीत असतो.

"पण, नचिकेत्या, गंमत अशी की ज्यांच्याठायी हा राजा आणि राज्य, आत्मा आणि अनात्मा हा विवेक नसतो – जे ह्या शरीर-इंद्रियें-मन-बुद्धि-मीपण इत्यादींनाच सत्य समजत असतात ते अविवेकग्रस्त, मोहान्ध लोक स्वत:लाच ह्या शरीरनगराचा राजा समजतात ! – सतत मी मी, माझें माझें करून, जन्म, जरा, मृत्यु प्रभृति अपरिमित अनर्थ स्वत:वर ओढवून घेत असतात.

"परंतु, जन्मजन्मान्तरींच्या शुभसंस्कारांनी ज्यांच्याठायी हा आत्मा-अनात्मा विवेक उदय पावत असतो त्यांचा हा शरीरेंद्रिय-मनबुद्धिअहंकारादींविषयीचा सत्यत्वबोध क्षीण होत असतो, खरा राजा कोण हें त्यांना जाणवूं लागत असतें, आणि म्हणूनच 'मी-माझें' सोडून ते 'प्रभो, तूं आणि तुझेंच' ह्या परम मंगल सत्यांत प्रतिष्ठित होण्याचा प्रयत्न करीत असतात. आणि अंतीं, तो लीलामय भगवानच आपल्या शरीर-इंद्रियें-मन-बुद्धि-मीपण इत्यादींनी क्रीडत आहे, तो बिंब आहे आणि 'मी' प्रतिबिंब आहें, तो रज्जु आहे आणि 'मी' रज्जुसर्प आहें ह्याचा त्यांना प्रत्यक्ष अनुभव येऊन, त्या अनुभवाने त्या सत्-चित्-आनंदस्वरूपाशीं एक होऊन ते शोक-मोहांच्या कचाट्यांतून सुटतात, जन्म-जरा-मरणादि महान् अनर्थांच्या अविराम प्रवाहांतून सुटतात, त्यांना मग फिरून शरीर धारण करावें लागत नाही, ते कृतकृत्य होऊन जातात, जीवन्मुक्त होतात.

"नचिकेत्या, 'माणूस मेला म्हणजे तो असतो की नसतो' हा जो तूं प्रश्न विचारला होतास त्याचें हें उत्तर आहे. मृत्युविषयक प्रश्नाद्वारा तूं ह्या शरीरनगरसम्राटाचें स्वरूप विचारलें होतेंस ! नचिकेत्या, तो आत्मा हा असा आहे — **एतत् वै तत्**"

≡

याप्रमाणे नचिकेत्याच्या आत्मविषयक प्रश्नाचें नगराच्या सुदर, सुबोध दृष्टान्ताच्या साहाय्याने उत्तर देऊन ब्रह्मविद्याचार्य यमराज पुढे त्याला सांगतात —

"नचिकेत्या, हा आत्मदेव केवळ तुझ्या वा माझ्याच रूपांनी खेळत आहे असें नाही. हे सौम्यदर्शन ऋषिकुमारा, तुझ्या-माझ्या अंतर्यामीं वसणारा तो एकमेवाद्वितीय प्रभुच ह्या देदीप्यमान

सूर्याच्या रूपाने तळपत आहे. तोच वायु आहे. तो अग्नि आहे. तो सोम आहे. मनुष्यांच्या रूपांनी, देवांच्या रूपांनी तोच लेलायित आहे. जलीं, स्थलीं, पर्वतशिखरीं जें काय जन्मत असतें तीं सारीं त्याचींच निरनिराळीं रूपें होत. समस्त जगताच्या आणि त्या जगांतील समग्र वस्तूंना नियमित करणाऱ्या नियमांच्या रूपांनीहि तोच परमात्मा विराजत आहे."

सारांश, यमराज सांगत आहेत की जो आंत आहे तोच बाहेर आहे, जो 'आत्मा' आहे तोच 'ब्रह्म' आहे. एकच आत्मजलधि अनंत नाम-रूपांच्या तरंगांनी कल्लोळत आहे.

भक्तश्रेष्ठ पुष्पदंतांनी भगवंताचा महिमा वर्णितांना मोठ्या सुंदर रीतीने हें सत्य सांगितलें आहे–

**"त्वमर्कस्त्वं सोमः त्वमसि पवनस्त्वं हुतवहः**
**त्वमापस्त्वं व्योम त्वमु धरणिरात्मा त्वमिति च ।**
**परिच्छिन्नामेवं त्वयि परिणताः बिभ्रति गिरं**
**न विद्मस्तत्तत्त्वं वयमिह तु यत् त्वं न भवसि ।।"**

–"भगवन्, कित्येक पंडितंमन्य म्हणत असतात की तूंच सूर्य आहेस, तूंच चंद्र आहेस, तूंच वायु, तूंच अग्नि, तूंच जल, तूंच आकाश, तूंच पृथ्वी आहेस आणि तूंच आत्मा आहेस. हे अखिलाधार, तुझ्याविषयी असें म्हटल्याने तुझा महिमा योग्य रीतीने वर्णिला गेला असें ह्या शहाण्यांना वाटत असतें. पण प्रभो, मला वाटतें की ह्या वर्णनाने तुझी स्तुति करण्याऐवजी ते तुझी निंदाच करीत आहेत. हे निखिलस्वरूपा, तूं सूर्य, चंद्र इत्यादि आहेस ह्या म्हणण्यांत वस्तुतः काय स्वारस्य आहे ? कारण, हे भगवन्, तूं नाहीस असें कांहीतरी अस्तित्वांत आहे काय ? जें काय 'आहे' तें सारें तूंच आहेस – हे लीलामया, समस्त रूपांनी तूंच लेलायित आहेस."

३

ह्याच एकमेवाद्वितीय, सर्वमय आत्मसत्तेविषयी नचिकेत्याने यमराजांना प्रश्न विचारला होता. पण तो प्रश्न त्याने 'मृत्यू'मधून विचारला होता. त्याच्या त्या प्रश्नाला 'शरीरनगरा'च्या दृष्टान्ताने साधारण स्वरूपाचें (general) उत्तर देऊन यमराज मग त्या मृत्यू-विषयक प्रश्नाचें मृत्यूमधूनच विशेषरूपाने (particular) उत्तर देऊं लागले –

**"हंत त इदं प्रवक्ष्यामि गुह्यं ब्रह्म सनातनम् ।**
**यथा च मरणं प्राप्य आत्मा भवति गौतम ।।"**

– "नचिकेत्या, तुझ्या ह्या प्रश्नाचें उत्तर देतांना मला किती आनंद होत आहे म्हणून सांगूं! नचिकेत्या, तूं जिच्याविषयी विचारलें आहेस त्या आंत-बाहेर भरून असलेल्या चिरंतन, शाश्वत सत्तेसंबंधी मी तुला ज्ञान देतों. नचिकेत्या, ही सत्ता – हा आत्मा, हें ब्रह्म साधारण माणसांच्या जाणिवेच्या कक्षेबाहेरचें असल्यामुळे आकळ-ण्यास अतोनात कठीण आहे – ती अत्यंत गूढ आहे. नचिकेत्या, ज्यांना त्या सर्वव्यापी, सर्वगत-सर्वातीत सत्तेचा बोध झाला आहे त्यांच्या नित्य प्रत्ययास येत असतें की जन्म-जीवन-मरण ही समस्त त्या चैतन्यनाथाची लीला आहे. असे महाभाग्यवान ह्या जन्म-जरा-मरणाच्या फेऱ्यांतून कायमचे सुटतात. परंतु, नचिकेत्या, ज्यांना हा बोध नसतो, 'मी आणि माझें' ही जाणीव ज्यांच्या अंत:करणांत स्पंदत असते त्यांचें मृत्युसमयीं काय होतें हें मी तुला आता सांगतों. हे ऋषिकुमारा –

**"योनिम् अन्ये प्रपद्यन्ते शरीरत्वाय देहिनः ।**
**स्थाणुम् अन्येऽनुसंयन्ति, यथाकर्म यथाश्रुतम् ।। "**

– "असल्या विवेकरहित, अज्ञानान्ध जीवांपैकी कांहीजण फिरून

मनुष्य-पश्वादि योनींत जन्मास येतात, आणि कित्येकांना तर वृक्ष-वनस्पतींचाहि जन्म येतो. ऋषिपुत्रा, कोणाला कोणता जन्म येईल हें ज्याच्यात्याच्या कर्मांवर व त्या कर्मांमधील त्याच्या बोधावर (consciousness वर) अवलंबून असतें."

=

यमराजांनी येथे एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट सूचित केली आहे. पुनर्जन्म केवळ "यथाकर्म"–"कर्मांच्या अनुसार होतो" असें न म्हणतां त्यांनी त्याला "यथाश्रुत"–"त्या कर्मांतील बोधाच्या अनुसार होतो" अशी पुस्ती जोडली आहे. कर्में आणि कर्मांमागील बोध ह्या दोहोंनुसार जन्म लाभतो असें यमराजांना सांगावयाचें आहे. कारण उघडच आहे. कारण हेंच की, सर्वसाधारण-पणें ज्याला 'चांगलें' कर्म म्हणतात, तें करीत असतांहि, कर्त्याचा 'बोध' चांगला नसणें शक्य आहे. उदाहरणार्थ, कुणी एकजण एका तरुण, असहाय विधवेला प्रचुर अर्थसाहाय्य करीत आहे. कर्म अर्थातच 'चांगलें' आहे. परंतु तें करीत असतांना त्या माणसाचा 'बोध' जर वाईट असेल, तें अर्थसाहाय्य तो जर अनुचित हेतूच्या सिद्धीसाठी करीत असेल तर त्याला 'चांगल्या' कर्माचें चांगलें फळ कदापि मिळणार नाही. भगवान अंतर्यामीं वसत असतात. ते माणसाचें अंतर्याम–अंतरंग–जाणतात. आणि म्हणूनच ते प्रत्येकाला त्याच्या कर्मानुसार 'आणि' त्याच्या बोधानुसार फल देत असतात. हेंच सत्य यमराजांनी "यथाकर्म" शब्दाला "यथाश्रुत" अशी पुस्ती जोडून मार्मिकपणें सूचित केलें आहे. आणि म्हणूनच, आपण आपल्या कर्मांविषयी आणि त्यांमागील आपला बोध, हेतु इत्यादीं-विषयी अत्यंत सावधान, सदा जागरूक असावयास हवें. एरवी स्वत:च स्वत:च्या पायावर धोंडा पाडून घेतल्यासारखी आपली गत

होणार – जन्मोजन्म दुर्दशा, जीवनाची विटंबना, आयुष्याचा खेळ-खंडोबा होत राहणार.

असो. यमराज नचिकेत्याला पुढे म्हणतात – "परंतु, नचिकेत्या, हें केवळ अविवेकी, अविद्यान्ध जीवाच्या बाबतींतच खरें आहे. कारण वास्तविक दृष्टचा तो आत्माच जीवाच्या आणि जगताच्या रूपाने नटलेला आहे. स्वप्नामधे माणूस झोपीं गेलेला असतो, सर्व इंद्रियें झोपलेलीं असतात, आणि तरीहि स्वप्नांत 'मी' आणि 'माझें'चा प्रत्यक्ष अनुभव येत असतो. तो स्वयंज्योति आत्माच विषय आणि विषयी या रूपांनी स्वप्नदशेंत क्रीडत असतो. तद्वतच, ह्या जागृतींतील विषय-विषयी, भोक्ता-भोग्य यांच्या रूपांनीहि तोच चिन्मय प्रभु खेळत असतो. तो चित्स्वरूप आहे. तो अमृत-स्वरूप आहे. तोच अखिलाधार आहे. त्याच्याखेरीज कांहीच अस्तित्वांत असूं शकत नाही. हें समस्त विश्व त्याचीच लीला आहे. जीवन त्याचीच लीला आहे. आणि मृत्यु पण त्याचीच लीला आहे. एक देह सोडून, जीवाच्या कर्मानुसार ज्या वेळीं तो दुसरा देह धारण करतो त्या वेळीं अज्ञ, अविवेकी जन म्हणत असतात की जीव मरण पावला. परंतु वस्तुतः शरीराच्या जन्माने तो जन्मत नाही वा शरीराच्या मरणाने तो मरतहि नाही. तो अज, नित्य, शाश्वत, पुराण पुरुष शरीरांमागून शरीरें धारण करून जीवन-मृत्यूचा खेळ खेळत असतो." (२,२,८)

४

पण !

पण हें सारें कोणाच्या पक्षीं ? ज्याला डोळे आहेत – विवेक-नेत्र आहेत – प्रज्ञाचक्षु आहेत – त्याच्या पक्षीं. आकाशांत दिनमणि तळपत असतो. पण कोणाच्या पक्षीं ? ज्याला तो बघण्याचे डोळे

आहेत त्याच्याचपक्षीं. आंधळ्याला भर दुपारींहि सर्वत्र अंधकारच होय. त्याच्यापक्षीं सूर्य असून नसून सारखाच. यमराज म्हणतात––

**"एष सर्वेषु भूतेषु गूढात्मा न प्रकाशते ।**
**दृश्यते त्वग्रया बुद्ध्या सूक्ष्मया सूक्ष्मदर्शिभिः ॥"**

––"नचिकेत्या, हा चिन्मय परम पुरुष सर्वांचाच आत्मा आहे. जीवाचा खरा 'मी' वस्तुतः हा आत्माच होय. तोच जीवांच्या 'मी' 'माझें'च्या रूपांनी विलसत असतो. परंतु, जीवनांतील हें परम सत्य सर्वचजण आकळूं शकत नाहीत. जगांतील नाना वस्तु भोग्य आहेत आणि मी त्यांचा भोक्ता आहें असा भोक्ता-भोग्य बोध ज्यांच्या हृदयांत स्पंदत असतो त्यांचें उभें आयुष्य मी-मी, माझें-माझें करण्यांतच जात असतें, ते ह्या ब्रह्म-लीलेच्या चिरकृतार्थकारी अनुभवास मुकत असतात. ज्यांचें हृदय भोग्य-भोक्तृत्वभावरहित झालें आहे, शुद्ध, निर्मल झालें आहे त्यांना ह्या अखंड मधुरैकरस चिद्विलासाचा अनुभव येत असतो."

भगवान् श्रीरामकृष्ण नेहमी म्हणत असत –"ईश्वर सर्व जीवांमधे निवसत आहे, परंतु सर्व जीव मात्र ईश्वरामधे निवसत नाहीत, आणि म्हणूनच त्यांना इतकीं दुःखें भोगणें भाग पडतें."

वरील मंत्रावर भाष्य करतांना भगवत्पूज्यपाद आचार्य श्रीशंकर म्हणतात––

**"अहो अतिगम्भीरा दुरवगाह्या विचित्रा माया च इयम्, यत् अयं सर्वो जन्तुः परमार्थतः परमार्थसतत्त्वः अपि, एवं बोध्यमानः अहं परमात्मा इति न गृण्हाति; अनात्मानं देहेन्द्रियादिसंघातम्, आत्मनः दृश्यमानम् अपि घटादिवत्, आत्मत्वेन 'अहम् अमुष्य पुत्रः' इति अनुच्यमानः अपि गृण्हाति !"**

अर्थात् –"अहो काय सांगावें ! किती खोल रुजलेलें, केवढें

अनाकलनीय, कोण विचित्र अज्ञान हें ! प्रत्येक जीवाचें खरें स्व-रूप तो परमात्माच आहे, पण हें सत्य कितीदा सांगूनहि जीवाचा त्यावर विश्वास बसत नाही, त्याला त्याची जाणीव होत नाही. आणि, आश्चर्य बघा ! – देह, इंद्रियें, मन, अहंकार इत्यादि नश्वर गोष्टी वास्तविक 'दृश्य' आहेत, आणि म्हणूनच 'द्रष्टा' अथवा खरा जीव ह्या साऱ्यांपासून भिन्न आहे. पण कुणीं न सांगता-शिकवितांहि प्रत्येकजण 'मी काळा, मी गोरा, मी अमुक, तमक्याचा मुलगा' इत्यादि खरें मानून चालत असतो ! – त्या 'दृश्य' देहेन्द्रियादिकांनाच 'मी' म्हणत असतो !"

सारांश काय की, परमेश्वर आमच्यांत वसत असूनहि, आम्ही जर "मी-माझें" सोडून "तूं-तुझें"मधे – त्या आंत-बाहेर सर्वत्र सर्व रूपांनी विलसणाऱ्या भगवंतामधे वसणार नाहीं तर पुन:पुन: जन्म, पुन:पुन: मरण, अपरिमित संकटें, नाना अनर्थ हेंच आमच्या कपाळीं येणार. यमराज म्हणतात – "साधनेने मन शुद्ध करून त्या शुद्ध मनाने प्रत्यक्ष अनुभव घ्यावयास हवा की ह्या भोक्ता-भोग्यमय विश्वांतील समस्त वस्तु मिथ्या नामरूपात्मक असून, तो एकच सच्चिदानंदघन आंत-बाहेर ह्या साऱ्या नाम-रूपांनी खेळत आहे. असा साक्षात्कार जो करून घेणार नाही त्याला मृत्यूमागून मृत्यु सोसावे लागतील." (२,१,११.) त्याचें मरणहि मग मरणच आणि त्याचें जीवनहि मग मरणच. सतत अविवेकान्धकारांत चाचपडण्याला 'जीवन' कसें म्हणतां येईल ? म्हणूनच बुद्धदेवांनी म्हटलें आहे की, जोंवर अज्ञानांत आहांत तोंवर "**सर्वं क्षणिकम्, सर्वं शून्यम्, सर्वं दु:खम्.**" भगवंतांनीहि गीतेंत ह्या अज्ञानमय जीवनाला "दु:खालय" म्हटलें आहे. ग्रंथालयांत ग्रंथ असतात, औषधालयांत औषधें असतात – ह्या 'दु:खालयां'त केवळ दु:खेंच आहेत ! इथलीं

दुःखेंहि दुःखें, आणि इथलीं सुखेंहि दुःखेंच ! सर्वच "अशाश्वत." आणि भगवान् गीतेंतच म्हणतात की जे 'मी-माझें'चा महाभयंकर, महाअनर्थकर लोभ सोडून मज परमात्म्यांत विलीन होतात त्यांना फिरून ह्या दुःखालयांत खितपावें लागत नाही. काया सोडून छायेमागे लागणाऱ्याच्या कपाळीं वंचना, फसवणूक, निराशा सोडून आणखी काय बरें येणार ? अशांच्या आयुष्याचें एका सुंदर, यथार्थ दृष्टान्ताने यमराज मार्मिक, मर्मस्पर्शी वर्णन करतात – "अविद्येमुळे भासणारी ही अनेकता, मायेमुळे दिसणारा हा भोग्य-भोक्त्याचा आभास – हा सारा असार पसारा खरा मानणें हेंच सर्व दुःखकष्टांचें, समस्त यातनांचें मूळ होय. एखाद्या दुर्गम पर्वताच्या शिखरावर पडलेलें पावसाचें पाणी जसें नाना ओघळांनी इतस्ततः वाहून जातें, आणि असें वाया गेल्यामुळे तद्द्वारा कोणताच उद्देश सिद्ध होऊं शकत नाही, त्याचप्रमाणे जो ह्या केवळ नाम-रूपात्मक मिथ्या उपाधींनी दिसणाऱ्या भेदांना – नाना वस्तूंना – खरें मानून त्यांच्या मागे धावतो तो ह्या संसारांत हरवून जातो, त्याचें आयुष्य वाया जातें, मानवजीवनाचें खरेखरें उद्दिष्ट जो भगवल्लाभ वा मोक्ष, त्यापासून तो वंचित होतो." (२, १, १४.)

५

आणि जो ह्या 'मी-माझें'चा लोभ सोडून त्या आत्मनाथांत विलीन होतो, त्याचें काय होतें ? यमराज सांगतात ––

**"तम् आत्मस्थं येऽनुपश्यन्ति धीराः ।**
**तेषां सुखं शाश्वतं, नेतरेषाम् ।।**
**तेषां शान्तिः शाश्वती, नेतरेषाम् ।। "**

––"मी आणि माझें नव्हे, तर प्रभो, तूं आणि तुझेंच असा ज्यांना प्रत्यक्ष अनुभव येतो त्यांनाच शाश्वत सुख लाभतें, इतर

कुणालाहि नाही; त्यांनाच शाश्वत शांति लाभते, इतर कुणालाहि नाही." कारण, मग तो त्या सत्, चित्, आनंद स्व-रूपाशीं एक होऊन जातो. इतर सुखें आणि इतर शांति ह्यांच्या पाठोपाठ दुःखें आणि अशान्ति हीं सावलीप्रमाणे येत असतात. परंतु ह्या आत्मसुखाची, ह्या आत्मशांतीची गोष्टच वेगळी, कोटीच निराळी. जोंवर आपण पृथ्वीवर असतों तोंवरच दिवस आणि रात्र यांचा सतत खो खो आपल्या जीवनांत चालला असतो. परंतु सूर्यावर गेल्यास ? तिथे रात्रहि नाही, आणि दिवसाचा तत्सापेक्ष उजेडहि नाही. तिथे दिवस-रात्ररहित निरपेक्ष संतत प्रकाश ! त्याचप्रमाणे, हा आत्मा स्वरूपतःच सुखस्वरूप, प्रपंचोपशम शांतस्वरूप असल्यामुळे त्याचा लाभ झाल्यावर, त्याच्याशीं एकरूप झाल्यावर मग ही जागतिक, क्षणिक, सापेक्ष सुखदुःखांची पाठशिवणी कायमची संपते – 'हर्ष-शोकौ जहाति' ! मग केवळ शांतिच शांति, सुखच सुख ! – त्यावर अशांतीची वा दुःखाची अमंगळ छाया पडणें अशक्य ! सोलीव शांति, निखळ सुख ! यमराज म्हणतात ––

**"तदेतदिति मन्यन्तेऽ–**
**निर्देश्यं परमं सुखम् ।"**

––"त्या सुखाचें लौकिक भाषेंत वर्णन करणें अशक्य. त्या सुखाला उपमा त्या सुखाचीच ! तें त्या महाभाग्यवंताला अगदी प्रत्यक्षपणें अनुभवास येत असतें. 'अहाहा, हेंच तें सुख' असें आणि एवढेंच तो त्या परम सुखाचें वर्णन करूं शकतो !"

६

हें सर्व ऐकून नचिकेत्याला साहजिकच वाटूं लागलें ––

**"कथं नु तत् विजानीयाम्,**
**किमु भाति विभाति वा ?"**

—"खरें आहे. पण तें मला कधी बरें मिळेल? कसें मिळेल? तो आनंदस्वरूप आत्मा आमच्या तर प्रत्ययास येत नाही. तो आहे ना? तो खरोखरच आहे ना?—कुठे आहे, कसा आहे?"

यावर यमराज आशीर्वाणी उच्चारीत स्निग्धगंभीरपणें उद्गारतात—

**"न तत्र सूर्यो भाति**
**न चंद्रतारकम्,**
**नेमा विद्युतो भान्ति**
**कुतोऽयमग्निः।**
**तमेव भान्तम् अनुभाति सर्वं,**
**तस्य भासा सर्वमिदं विभाति॥"**

—"हा सर्वप्रकाशक सूर्य, हा शीतरश्मि चंद्र, हें लुकलुकतें तारांगण त्याला प्रकाशवूं शकत नाहीत, मग ह्या मर्त्यलोकींच्या अग्नीची काय बिशाद? त्याला कोण प्रकाशित करणार? प्रकाश्य प्रकाशक, बोध्य बोद्धा, ज्ञेय ज्ञाता, विषय विषयी हा बोध जेव्हा ज्ञानोद्भासित होऊन कायमचा लयास जातो तेव्हा मग प्रत्ययास येतें की तो आहे म्हणूनच हें सारें कांही आहे, ह्या अंतर्बाह्य विश्वाच्या रूपाने तोच प्रकाशमान आहे!" मग प्रत्ययास येतें की जग ही त्या आत्मरत्नाचीच प्रभा आहे. परंतु हा अनुभव येण्यासाठी आधी प्रकाश्य-प्रकाशक, ज्ञाता-ज्ञेय, मी-तूं हा अज्ञानजन्य, मायामय भेदबोध ज्ञानाने कायमचा निमावयास हवा.

७

तो एकदाचा निमाला की मग प्रत्ययास येऊं लागतें—

**"अग्निर्यथैको भुवनं प्रविष्टः**
**रूपं रूपं प्रतिरूपो बभूव।**

**एकस्तथा सर्वभूतान्तरात्मा**
**रूपं रूपं प्रतिरूपो बभूव ॥"**

--"अग्नि स्वतः, स्वरूपतः अरूप, निराकार आहे. परंतु तो जर लाकडी चौकोन जाळूं लागेल तर चौकोनी आकाराचा दिसूं लागतो, त्रिकोण जाळूं लागला तर त्रिकोणी आकाराचा दिसूं लागतो, आणि तरीसुद्धा त्या चौकोन-त्रिकोणादि रूपांच्या अतीत असतो. त्याचप्रमाणे तो निराकार, अरूप, एकमेवाद्वितीय सच्चिदानंदस्वरूप आत्मा नाना नाम-रूपांच्या, मिथ्या उपाधींच्या रूपांनी त्या त्या नामाचा नि रूपाचा, त्या त्या आकारा-प्रकाराचा भासूं लागतो, आणि तरीसुद्धा त्या सर्व नामरूपांच्या, उपाधींच्या अतीत असतो." सारांश, भगवान् श्रीरामकृष्ण म्हणत त्याप्रमाणे, मग त्या भाग्यवंताच्या प्रत्ययास येऊं लागतें की जो नित्य आहे तोच लीलेंत आहे--त्याचीच ही लीला आहे, त्या भाग्यवंताच्या प्रत्ययास येतें की शांत समुद्रहि समुद्रच आणि लाटांनी उचंबळलेला समुद्रहि समुद्रच ! जो समाधींत विसावला तोच व्युत्थानांत विलासला ! जो 'निर्विकल्पीं' हरपला तोच 'सविकल्पीं' गवसला !--तोच आंत, तोच बाहेर; तोच आत्मा, तोच ब्रह्म; तोच प्रत्यक्, तोच पराक्; तोच एकत्र, तोच उभयत्र, तोच सर्वत्र; तोच सर्वातीत (Transcendent), तोच सर्वगत (Immanent); तोच सर्व. "जो कुछ है सो तू ही है !"

८

हा चिद्विलास बोध, ही आत्मविद्या नचिकेत्याला प्रदान करण्यापूर्वी यमराजांनी त्याला मर्त्यलोकींच्या आणि स्वर्गींच्या नाना अलभ्य भोगांचीं प्रलोभनें दाखविलीं होतीं. ह्या आत्मज्ञानाखेरीज काय वाटेल तें द्यावयास यमराज तयार झाले होते. पण नचि-

केल्याने ते सर्व भोग झिडकारून ही आत्मविद्याच मागितली.

एकीकडे स्वर्ग-मर्त्यांचे सकल भोग आणि दुसरीकडे आत्मविद्या --देणाऱ्यालाहि दुसरीपुढे पहिलें कांहीच वाटत नव्हतें, आणि घेणाऱ्यालाहि दुसरीपुढे पहिलें केवळ तुच्छ वाटत होतें !

आत्मविद्येचा महिमाच असा आहे !

त्रिभुवनांत असें कांहीहि नाही की जें ह्या आत्मविद्येची बरोबरी करूं शकेल ! – नव्हे, तिच्या पासंगाला तरी पुरूं शकेल ! आत्मविद्या – नितान्त अमूल्य धन ! विश्वभऱ्यांतील इतर कांहीहि, कोणतेंहि धन, सुख, कर्तव्यनिष्ठा, अभ्युदयप्राप्ति – सारें सारें तिच्यापुढे क:पदार्थ होय. ह्याच विद्येने माणूस खराखरा शांत, खराखुरा सुखी, खरोखर कृतार्थ होऊं शकतो – दुसऱ्या कशानेहि नाही, कशानेहि नाही.

अर्जुनानेहि अशीच कबुली दिली आहे, त्यानेहि आत्मविद्येचा हा महिमा स्वत:च्या जीवनांतील प्रत्यक्ष अनुभवाने व्यक्त केला आहे. कुरुक्षेत्राच्या समरांगणावर स्वजनांच्या भावी संहाराच्या कल्पनेने त्याला न भूतो न भविष्यति शोक झाला त्या वेळीं तो भगवान् श्रीकृष्णांना म्हणतो – "माझ्या सर्व इंद्रियांचा दाह दाह करणारा हा विलक्षण शोक ज्याने शमेल असा कांहीहि उपाय मला दिसत नाही. या पृथ्वीचें निर्वैर, निष्कंटक राज्य मिळूनहि तो जाईल असें वाटत नाही. कृष्णा, पृथ्वीचेंच काय, पण स्वर्गाचें साम्राज्य जरी लाभलें तरी हा माझा सर्वशोषी, मर्मदाही शोक दूर होणें अशक्य आहे." (गीता २, ८.)

नंतर प्रभूंनी आपल्या त्या अश्रुपूर्णाकुलेक्षण, शोकसंविग्न-मानस प्रियशिष्याला राजविद्या, राजगुह्य असें आत्मज्ञान दिलें. तें

ऐकून-पाहून-पचवून तोच अर्जुन अखेर शांतीची, तृप्तीची ढेकर देत म्हणतो —

"अच्युता, माझ्या जीवनसारथ्या, माझ्या हृदयांत जो अभूतपूर्व शोकाचा डोंब उठला होता, त्याचें मूळ कारण जी स्वजनांवरील आसक्ति वा माझा तो महाभयंकर मोह – तोच मुळी आता ह्या तूं दिलेल्या ज्ञानाने माझ्या हृदयांतून अजीबात नाहीसा झाला आहे ! मी कोण आणि हें जगत् काय ह्याचा बोध, तुझ्या असीम अनुकंपेने, तुझ्या सदय अनुग्रहाने माझ्या हृदयांत आता स्फुरूं लागला आहे. माझे सर्व संदेह मावळले आहेत. माझ्या पाठीराख्या, आता तूं म्हणशील तसें करीन." (गीता १८, ७३.)

जी गोष्ट दुसऱ्या कशानेहि साध्य नाही, मर्त्यलोकींच्या वा स्वर्गाच्या एकछत्री सम्राटत्वानेहि शक्य नाही, ती तुमच्या उपदेशाने – आत्मविद्येने – सिद्ध झाली आहे अशी स्पष्ट, असंदिग्ध गोड कबुली तो कृष्णसखा न कळत देत आहे !

आत्मविद्येचा महिमाच असा आहे !

जिथे पैसा पोहोचूं शकत नाही तिथे ही आत्मविद्या माणसाला घेऊन जाते. जिच्यापुढे मर्त्यलोकींचे वा स्वर्गीय समस्त उपभोग नितान्त अळणी, तुच्छ, कःपदार्थ ठरतात अशा चिरंतन, शाश्वत सुख-शांतीची जोड ही आत्मविद्या करून देते.

९

परंतु ह्या बाबतींत एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट दृष्टीआड होतां कामा नये.

आत्मविद्येने लाभणारें हें अजोड शांति-सुखाचें फल वर्णन करीत असतां यमराज नचिकेत्याला म्हणाले होते —

"तमात्मस्थं येऽनुपश्यन्ति धीराः
तेषां सुखं शाश्वतं, नेतरेषाम् ।
तेषां शांतिः शाश्वती, नेतरेषाम् ।।"

ह्या मंत्राची फोड करतांना भाष्यकार आचार्य श्रीशंकर म्हणतात–" 'अनु' म्हणजे 'नंतर' आणि 'पश्यन्ति' म्हणजे 'प्रत्यक्षपणें पाहतात' 'साक्षात् अनुभवतात.' कशाच्या 'नंतर'? आचार्य आणि शास्त्र ह्यांच्यापासून आत्मविद्येच्या उपदेशग्रहणानंतर. 'धीर' म्हणजे 'विवेकी'. जे विवेकी पुरुष गुरु आणि शास्त्र ह्यांच्यापासून ही आत्मविद्या प्राप्त करून घेऊन त्या आत्म्याचा स्वतःच्या अंतरंगीं प्रत्यक्ष अनुभव घेतात त्यांनाच हा आत्मस्वरूपानंद आणि ही आत्मभूत शांति लाभत असते, इतरांना नाही. हा आत्मा सर्वांच्याच हृदयांत आहे, परंतु जे अविवेकी लोक बाह्य भोग्यांना खरें मानून त्यांच्यावर आसक्त होऊन त्यांच्या मागे धावत असतात, त्यांना स्वहृदयांत असूनहि हा आत्मा प्रत्ययास येत नाही."

आपण हा आत्मा 'पाहावयास' हवा, त्याचा आपल्याला 'साक्षात् अनुभव' यावयाला हवा. तरच शांति-सुख मिळण्याची आशा. हा आत्मा नुसता बुद्धीने 'जाणून' वा त्यावर नुसता 'विश्वास' ठेवूनच भागणार नाही, त्याचा प्रत्यक्ष अनुभव यावयास हवा. पूज्यपाद स्वामी विवेकानंद नेहमी म्हणत–"Religion is realisation"–"This is the watchword of Vedanta –realise religion, no talking will do"–"प्रत्यक्षानुभूतिच धर्म होय"–"वेदान्ताचा हा एकच संदेश आहे–धर्माची, आध्यात्मिक सत्यांची प्रत्यक्ष अनुभूति करून घ्यावयास हवी, केवळ पोपटपंची करून काय होणार?" शाश्वत शांति-सुखाची भूक केवळ बौद्धिक 'समजल्या'ने वा 'विश्वास ठेवल्या'ने कशी

शमणार ? त्यासाठी त्या "प्रपंचोपशम, शांत, शिव, अद्वैत" आत्म्याचा स्वतःच्या हृदयांत मूर्त साक्षात्कार व्हावयास हवा. बोलाचीच कढी आणि बोलाचाच भात खाऊन का भूक शमणार आहे ? यमराज म्हणतात —

> "इह चेत् अशकत् 'बोद्धुम्'
> प्राक् शरीरस्य विस्रसः ।
> ततः सर्गेषु लोकेषु
> शरीरत्वाय कल्पते ॥"

—" 'मी आणि माझें' नसून, 'प्रभो, तूं आणि तुझेंच' हें परम मंगल सत्य, हा चिद्विलास जर ह्या जन्मांतच प्रत्यक्ष अनुभवाला आला नाही तर फिरून जन्म-जरा-मरण दुःख नशिबीं ठेवलेलें आहे. म्हणून हें शरीर पडण्यापूर्वी – ह्याच जन्मांत त्याचा 'प्रत्यक्ष अनुभव' करून घेण्याचा प्राणपण प्रयत्न करा."

हा 'प्रत्यक्ष अनुभव' कसा असतो ? ह्याची फोड करतांना आचार्य श्रीशंकर म्हणतात – "**आदर्शस्थं मुखम् इति यद्वत्**" – "आरशांत जसें मुख दिसतें त्याप्रमाणे." आरशांत मुख दिसतें – त्याचप्रमाणे साधकाला स्वतःच्या हृदयरूपीं आरशांत 'दिसायला' हवें की 'तो' बिंब आहे आणि 'मी' त्याचें प्रतिबिंब आहें ! – 'मी' आणि 'जगत्' त्या चिन्मयाचाच लीलाविलास आहे.

३

यावर प्रश्न येतो – हृदय सर्वांनाच आहे, सर्वांच्याच हृदयांत तो आत्मा वसत आहे, मग सर्वांनाच ह्याचा अनुभव कां येत नाही ?

उत्तर अगदी सोपें आहे ! आरशांत प्रतिबिंब दिसतें. पण कशा आरशांत ? निर्मल आरशांत ! तो जर मळका असेल तर – मुख आहे, आरसा आहे, पण प्रतिबिंब दिसत नाही !

ह्या हृदयरूपी आरशावरील मळ काढला की 'मी' 'त्या'चें प्रतिबिंब, हें तात्काळ 'दिसूं' लागतें – हृदयांतील मल दूर होतांच 'मी' आणि 'जगत्' त्या सच्चिदानंदसिंधूवरील विभिन्न तरंग आहोंत हें आतापर्यंत छपलेलें सत्य उघडकीस येतें ! – मूर्तपणें प्रत्ययास येतें !

साधारण आरशावरील मळ सहज काढतां येतो. ह्या हृदय-आरशावरील मळ कसा काढत असतात ?

ह्या हृदय-आरशावरील मल दूर करण्यालाच म्हणतात – "साधना."

यमराजांनी नचिकेत्याला हा हृदय-आरसा निर्मल करण्याची कोणती रीत – काय 'साधना' सांगितली आहे बरें ? . . .

---

... ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
... ४००५८ ... दि: ...०७
... १५८७ ... नों. दि: २८/५८

# पंचम अध्याय

# आत्मलाभाची साधना

१

यम-नचिकेता संवादाच्या रूपाने आम्हांला कठउपनिषदाचें प्रसाददान देणाऱ्या ऋषिवर्यांनी आपल्या ह्या यम-नचिकेता आख्यायिकेचा वा कठोपनिषदाचा शेवट पुढील मंत्राने केला आहे –

> " मृत्युप्रोक्तां नचिकेतोऽथ लब्ध्वा
> विद्याम् एतां, योगविधिं च कृत्स्नम् ।
> ब्रह्म प्राप्तो विरजोऽभूत् विमृत्युः,
> अन्योऽप्येवं यो विद् अध्यात्ममेव ।।"

– " मृत्युदेवता यमराजांकडून ही आत्मविद्या, आणि त्या आत्म्याशीं युक्त होण्याची – त्या आत्म्याचा साक्षात्कार करून घेण्याची, त्या आत्म्याची प्रत्यक्ष अनुभूति करून घेण्याची रीत नीट, सविस्तर जाणून घेऊन, तदनुसार त्या आत्मविद्येची साधना करून नचिकेता भल्या-बुऱ्याच्या, वासना-कामनांच्या बंधनांतून सुटून स्वस्वरूपीं – अभय ब्रह्मपदीं स्थित झाला – मुक्त झाला. नचिकेत्याचें अनुसरण करून, ह्या रीतीने, जो कुणी स्वतःच्या अंतरंगीं त्या आत्मदेवाचा साक्षात्कार करून घेईल तोहि तसाच सर्व बंधनांतून सुटून मुक्त होईल."

२

सारांश, यमराजांकडून नचिकेत्याला दोन गोष्टी प्राप्त झाल्या होत्या – 'विद्या' आणि 'योगविधि' – म्हणजेच, आत्म-'विद्या'

आणि त्या आत्मलाभाची 'साधना'.

भगवान श्रीरामकृष्ण नेहमी म्हणत असत की, दुधांत लोणी आहे असें नुसतें समजून किंवा घोकून काय होणार ? त्या दुधाला विरजण लावावें लागेल, तें कांही वेळ एकीकडे ठेवून द्यावें लागेल, त्याचें विरजून दही जमल्यावर तें घुसळावें लागेल, तेव्हा कुठे मग लोणी हातीं येईल. त्याचप्रमाणे आंत-बाहेर सर्वत्र भगवान भरला आहे हें समजून किंवा घोकून काय होणार ? त्याच्या प्रत्यक्ष लाभासाठी 'साधना' करावयास हवी. तेव्हाच कुठे तो संसारसार भगवान लाभणार.

म्हणूनच यमराज नचिकेत्याला केवळ आत्मविद्याच देऊन थांबले नाहीत, तर त्या आत्म्याचा प्रत्यक्ष लाभ कसा करून घ्यावयाचा ह्याची रीतहि त्यांनी त्याला सांगितली---आत्म-'विद्ये'-बरोबरच त्या आत्मलाभाची 'साधना' पण त्यांनी नचिकेत्याला सांगितली.

काय आहे तो 'योगविधि'—ती आत्मलाभाची 'साधना' ?

२

यमराज सागतात—

"न संदृशे तिष्ठति रूपम् अस्य
न चक्षुषा पश्यति कश्चिदेनम् ।"

—"हा आत्मा अशी गोष्ट नाही की जी 'बघतां' येईल. कारण वस्तुतः हा आत्माच मुळी 'बघणारा' आहे. जिथे जिथे म्हणून बघितलें जातें तिथे तिथे बघणारा, बघितलें जाणारें आणि बघणें ह्या रूपांनी वस्तुतः हा स्वयंज्योति आत्माच खेळत असतो. आणि म्हणून ह्या आत्म्याच्या बाबतींत त्याला 'बघणें' संभवत नाही. बघणाराच स्वतःला कसें बघणार ? म्हणूनच डोळे, कान, नाक

इत्यादि ज्ञानेंद्रियांनी ह्या आत्म्याचें ज्ञान होणें असंभाव्य होय. सारांश, ज्ञाता आणि ज्ञेय, विषयी (subject) आणि विषय (object) अशा संबंधांतून ह्या आत्म्याची अनुभूति होणें शक्य नाही."

तर मग ह्या आत्म्याची उपलब्धि कशी करून घ्यावयाची ? यमराज यावर उत्तर देतात –

"हृदा मनीषा मनसाऽभिक्लृप्तो
य एतत् विदुः अमृताः ते भवन्ति ॥"

–"ह्या आत्म्याचा अनुभव साधकाला स्वतःच्या बोधामधेच ('हृदया'मधें वा consciousness मधेच) करून घ्यावयाचा असतो. परंतु याप्रमाणे स्वतःच्या बोधांत त्या आत्म्याचा अनुभव येण्यासाठी साधकाला स्वतःचा बोध बदलावयास हवा. आजच्या अविद्यामय बोधांतच त्याला आत्मानुभव वा स्वस्वरूपानुभूति अर्थातच व्हावयाची नाही.

"आजच्या त्याच्या अविद्यामय बोधांत सारखे तरंग उठत असतात –'मी भोक्ता' 'हें जग भोग्य', 'मी हें भोगीन' 'मी तें भोगीन' इत्यादि इत्यादि.

"हे 'समस्त' तरंग थांबावयास हवेत. ते तसे थांबले म्हणजे साधकाचा बोध निस्तरंग होईल."

साधकाचा बोध अशा तऱ्हेने निस्तरंग झाल्याने काय होईल ?

अशी कल्पना करूं या की एका हौदांत पाणी आहे आणि त्याच्या बुडाशीं एक सुई पडली आहे. जोंवर त्या पाण्यावर तरंग उठत आहेत तोंवर बुडाशीं असून देखील ती सुई आपल्याला दिसणार नाही वा अत्यंत वेडीवाकडी (distorted) दिसेल. परंतु ते तरंग जर थांबले तर काय होईल ? ते थांबल्याने पाणी

शांत होईल, पारदर्शक होईल, आणि बुडाची सुई आपल्याला आपोआप दिसूं लागेल. यमराज म्हणतात की, तद्वतच –

"साधकाचा बोध निस्तरंग झाल्याने शांत होईल, पारदर्शक होईल. आणि मग त्या निस्तरंग, शांत, पारदर्शक बोधांत त्या साधकाच्या प्रत्ययाला येऊं लागेल की ज्याला तो 'भोक्ता' वा 'मी' म्हणत होता तो 'मी' म्हणजे त्या बोधरूपी जलांत पडलेलें त्या आत्म्याचें केवळ 'प्रतिबिंब' होय ! तें बोध-जल हलत होतें, तरंगायित होत होतें म्हणून तें प्रतिबिंबहि त्या तरंगांनुसार हलतेसें वाटत होतें – 'मी हें भोगीन, तें खाईन, हें पाहीन' इत्यादि भाव त्यांत उठत होते. परंतु ते तरंग थांबतांच साधकाचें बोध-जल शांत होतें, पारदर्शक होतें आणि त्याच्या प्रत्ययास येऊं लागतें की 'मी प्रतिबिंब आहें' आणि 'तो सत्-चित्-आनंद स्वरूप आत्मा बिंब आहे.' आणि त्या तरंगहीन, शांत, पारदर्शक बोधांत येणाऱ्या ह्या प्रत्ययांत अधिकाधिक लीन, अधिकाधिक स्थिर होतां होतां अखेर त्याला साक्षात्कार होतो की वास्तविक 'बिंब' 'प्रतिबिंब' हा केवळ आभासात्मक, मानीव, सापेक्ष भेद आहे, 'वस्तुतः' जें बिंब आहे तेंच प्रतिबिंब आहे आणि जें प्रतिबिंब आहे तेंच बिंब आहे. केवळ बोधरूपी उपाधीमुळे बिंब-प्रतिबिंब हा भेद भासत आहे.

"आणि त्या महाभाग्यवान साधकाच्या मग हेंहि प्रत्यक्ष अनुभवास येतें की जो त्याच्या स्वतःच्या 'मी'च्या रूपाने खेळत आहे तोच जगांतील समस्त व्यक्तींच्या नि वस्तूंच्याहि रूपांनी विलसत आहे. जो आंत आहे तोच बाहेर आहे.

"ह्या अशा अनुभूतीने मग साधक जन्म-जरा-मृत्यूंच्या पाशांतून कायमचा मुक्त होतो, त्या सच्चिदानंदाशीं एक होऊन जातो, कृतकृत्य होतो, कृतार्थ होऊन जातो."

असो. ह्या निस्तरंग, शांत, पारदर्शक मनालाच सर्वसामान्य भाषेंत 'शुद्ध मन' म्हणत असतात. परम पूजनीय गौडपादाचार्यांनी ह्यालाच 'अमन' म्हटलें आहे. ह्यालाच कित्येकजण 'उन्मनी अवस्था' म्हणतात. इंग्रजींत ह्यालाच 'intuition' म्हटलें जातें. उपनिषदांतून ह्यालाच 'परम व्योम' 'हृदयाकाश' 'बुद्धिगुहा' इत्यादि म्हटलें आहे. मनाच्या ह्याच अवस्थेंत साधकाला भगवंताचें आत्मस्वरूपाने आणि ब्रह्मस्वरूपाने – आंत आणि बाहेर – दर्शन होत असतें. यमराज नचिकेत्याला सांगतात – "**मनसा एव इदम् आप्तव्यम्, न इह नाना अस्ति किंचन। मृत्योः स मृत्युं गच्छति य इह नाना इव पश्यति**" – "अशा शुद्ध, निर्मल मनानेच ह्या आत्म्याचा लाभ करून घ्यावयाचा असतो. तसा आत्मलाभ झाला म्हणजे मग हा असार संसाराचा फापटपसारा मावळून साधकाला आंत-बाहेर सर्वत्र तो चिन्मयच विलसत असलेला अनुभवास येतो. ज्याला असा एकत्वाचा स्वानंदानुभव – हा चिद्विलासाचा अमृतानुभव येत नाही त्याच्या कपाळींचा जन्म-जरा-मरणांचा फेरा कांहीकेल्या चुकत नाही." हीच गोष्ट भगवान् श्रीरामकृष्ण आपल्या अनुपम सुबोध शब्दांत सांगत असत – "शुद्ध मन आणि शुद्ध आत्मा एकच."

मनाच्या ह्या अवस्थेंत लाभणारी अनुभूति ही तत्त्वज्ञांना तार्किक बुद्धीने होणाऱ्या ज्ञानाहून वेगळी असते, कवींना जाणवणाऱ्या भावनात्मक बोधाहून वेगळी असते. तें 'ज्ञान' नसतें, ती 'भावना' नसते; तो असतो स्वसंवेद्य 'अपरोक्षानुभव' !

यावर साहजिकच प्रश्न येतो की त्या आद्य, वेदप्रतिपाद्य, स्वसंवेद्य आत्मस्वरूपाचा असा मूर्त साक्षात्कार मनाच्या ज्या अवस्थेंत होतो ती मनाची अवस्था ('अमन' वा 'उन्मन' वा

'intuition') कशी बरें प्राप्त करून घ्यावयाची असते ?

यमराज ह्या प्रश्नाचें सुंदर, समर्पक उत्तर देतात –

**"यदा पंचाऽवतिष्ठन्ते ज्ञानानि मनसा सह ।**
**बुद्धिश्च न विचेष्टति ताम् आहुः परमां गतिम् ।।"**

–"माणसाचीं डोळे, नाक, कान इत्यादि पांच ज्ञानेंद्रियें सदा ह्या जगाचा अनुभव घेत असतात – त्यांच्या द्वारें विषयांशीं संबंध येऊन माणूस सदैव शब्द-स्पर्श-रूप-रस-गंध अनुभवीत असतो; त्याचें मनहि त्याबरोबरच सतत भोक्ता-भोग्य-भोग वृत्तींनी स्पंदत असतें; त्याची बुद्धिहि मी-माझें, विषय-विषयी ह्या दृढ धारणेने स्फुरत असते. ज्या वेळीं ज्ञानेंद्रियांच्या संवेदना, मनाचीं स्पंदनें, बुद्धीचें स्फुरण हीं उपशम पावतात, त्या वेळीं ती श्रेष्ठ अवस्था लाभते." ही 'श्रेष्ठ अवस्था' म्हणजेच निस्तरंग, शांत, पारदर्शक मन – अमनी मन वा intuition.

आता यावर प्रश्न असा येतो की ज्ञानेंद्रियांच्या ह्या विषयानुभूति, मनाचीं हीं स्पंदनें, बुद्धीचें स्फुरण ह्यांचा हा उपशम कसा साधावयाचा ?

इंद्रियें-मन-बुद्धीचा हा उपशम साधावयाचा असतो – विषयांच्या खऱ्या स्वरूपाच्या ज्ञानाने, भोग्य-भोक्ता-भोग ह्यांच्या स्वरूपाच्या ज्ञानाने, मी-माझें, विषय-विषयी ह्यांच्या स्वरूपाच्या ज्ञानाने – म्हणजेच आत्मविद्येने. ज्ञानेंद्रियें, मन, बुद्धि हीं विषयानुभव घेतात, स्पंदतात, स्फुरतात ह्याचें कारण हे विषय, हे भोक्ता-भोग्य-भोग, हें मी-माझें, हीं आज प्रत्ययास येत आहेत त्या स्वरूपांत खरीं आहेत असा आपला बोध असतो. परंतु हा आपला बोध चुकीचा, असम्यक्, अज्ञानजन्य, अविद्यामय असतो. आत्म-विद्येने – विषयांच्या, भोक्ता-भोग्य-भोगांच्या, मी-माझेंच्या,

विषय-विषयींच्या खऱ्या स्वरूपाच्या ज्ञानाने हा आपला बोध आपण बरोबर, सम्यक्, यथार्थ ज्ञानमय, विद्यामय करावयास हवा. काय आहे त्यांचें खरें स्वरूप ? यमराज सांगतात–

**" येन रूपं रसं गंधं शब्दान् स्पर्शान् च मैथुनान् ।**
**एतेनैव विजानाति, किम् अत्र परिशिष्यते ।।"**

–" नचिकेत्या, ह्या रूपरसादि नाना विषयांना जाणणारा, ह्या नाना भोगांचा उपभोग घेणारा, ह्या नाना भोगसुखांचा आस्वाद घेणारा भोक्ता वा विषयी वा 'मी' हा खरोखर आहे तो चिन्मय आत्माच ! लोक म्हणत असतात की 'मी' 'डोळ्यां'नी पाहतों, 'मी' 'मना'ने अनुभवतों, इत्यादि. यांतील 'मी' 'डोळे' 'मन' वगैरे सर्वच तर जड, अचेतन आहेत ! जड, अचेतन 'मी' वा 'इंद्रियें' वा 'मन' जर विषयांना पाहूं-उपभोगूं शकत असतील तर मग दगड दगडाला पाहतो, वीट विटेला अनुभवते असेंहि कां होऊं नये ? म्हणूनच ह्या 'मी' 'डोळे' 'मन' इत्यादींतील 'खरा' पाहणारा-अनुभवणारा असतो तो चैतन्यस्वरूप आत्माच. नचिकेत्या, ह्या आत्म्याखेरीज चेतन आणखी कुणीहि, कांहीहि नाही. हा 'वस्तुतः' सर्व विषयांचा, भोग्यांचा द्रष्टा, ज्ञाता, अनुभव घेणारा आहे." पण मग ज्याला आपण 'भोक्ता' 'मी' 'ज्ञाता' समजत असतों तो काय असतो ? यमराज सांगतात–

**" स्वप्नान्तं जागरितान्तं चोभौ येनानुपश्यति ।**
**महान्तं विभुमात्मानं मत्वा धीरो न शोचति ।।"**

–"हें तुला स्वप्नांच्या अनुभवांवरून नीट, स्पष्ट कळूं शकेल, स्वप्नामधला द्रष्टा-भोक्ता वास्तविक संपूर्ण मिथ्या असतो, परंतु स्वप्न सुरू असेपर्यंत तो आपल्याला खराच वाटत असतो. आणि, केवळ स्वप्नांतला द्रष्टा-भोक्ताच नव्हे, तर स्वप्नांतले रूप-रसादि

नाना विषय नि नाना सुखभोग हेहि संपूर्णपणें मिथ्याच असतात. पण स्वप्न चालू असेपर्यंत ते आपल्याला खरे वाटत असतात. तो एकच स्वयंज्योति, चित्स्वरूप आत्मा स्वप्नांतील भोक्ता वा 'मी' वा विषयी ह्या रूपाने, रूपरसादि नाना भोग्यांच्या वा विषयांच्या रूपांनी आणि नाना भोगांच्या रूपांनी विलसत असतो. तद्वतच जागृतींत ! स्वप्नाप्रमाणेच जागृतींतील भोक्ता-भोग्य-भोगहि संपूर्णतया मिथ्या असतात – तो एकच स्वयंज्योति आत्मा ह्या मिथ्या नामरूपांनी विलसत असतो. लोक अज्ञाननिद्रेंत असतात म्हणून हें सत्य त्यांना कळत नाही. तें ज्यांना कळतें त्यांचा शोकमोह कायमचा नाहीसा होऊन जातो." सारांश, हे नाना विषय, त्यांचा अनुभव घेणारा विषयी वा भोक्ता वा 'मी', हीं आज, अविद्यावस्थेंत प्रत्ययास येत आहेत त्या स्वरूपांत रज्जुसर्पवत् मिथ्या असून, वस्तुत: तो चिन्मयच ह्या सर्व रूपांनी विलसत आहे, हा समस्त त्या चिन्मयाचा विलास आहे – चिद्विलास आहे.

ह्या ज्ञानाने, ह्या विद्येने, ह्या सम्यक्दर्शनाने आपण आपला आजचा जगाविषयीचा आणि 'मी'विषयीचा, भोग्याविषयीचा आणि भोक्त्याविषयीचा बोध बरोबर, सम्यक् करून घेतला पाहिजे. तसें केल्याने काय होईल ? समोर दिसणारी वस्तु चांदी आहे असा जोंवर आपला बोध असतो तोंवरच आपलीं इंद्रियें तिचा अनुभव घेतात, मन स्पंदतें, बुद्धि स्फुरते. परंतु ती वस्तु चांदी नसून शिंप आहे, ती शिंपच चांदीच्या रूपाने भासत आहे अशी धारणा आपल्यांत जन्मल्यास काय होईल ? मग आपल्या इंद्रियांचे अनुभव, मनाचें स्पंदन, बुद्धीचें स्फुरण थांबून तीं सारीं उपशम पावतील ! तद्वतच, ह्या चिद्विलासाच्या धारणेने, ह्या आत्मविद्येने विषय, भोक्ता-भोग्य-भोग, मी-माझें, विषय-विषयी इत्यादींसंबंधीचा

आपला बोध बदलेल, तो बरोबर, यथार्थ, सम्यक् होईल, आणि मग त्याबरोबरच आपलीं इंद्रियें हे विषय ह्या मिथ्या नामरूपात्मक स्वरूपांत अनुभवणार नाहीत, आपलें मन भोक्ता-भोग्य-भोग या वृत्तींनी स्पंदणार नाही, आपली बुद्धिहि मी-माझें, विषय-विषयी या धारणेने स्फुरणार नाही. म्हणजेच, आपलीं इंद्रियें, मन, बुद्धि हीं निःस्पंद होतील. म्हणजेच, तीं उपशम पावतील. म्हणजेच निस्तरंग, शांत, पारदर्शक होतील ! म्हणजेच आपलें मन अमनीभूत होईल ! आणि मग त्या शुद्ध (intuitive) मनांत आपल्याला त्या आंत आणि बाहेर उभयत्र – सर्वत्र नाना नामरूपांनी, विभिन्न उपाधींनी विलसणाऱ्या भगवंताचा प्रत्यक्षानुभव येऊं लागेल !

हा प्रत्यक्षानुभव प्रथम अस्पष्ट, अस्थिर असेल. पण त्यांत अधिकाधिक डुबत गेल्याने, अधिकाधिक ध्यानाभ्यासाने तो उत्तरोत्तर स्पष्ट, स्थिर होत होत अखेर पूर्णतया स्पष्ट, पूर्णतया स्थिर होऊन जाईल–विषय-विषयी, मी-माझें, भोग्य-भोक्ता ह्या अज्ञानाचा वा अविद्येचा संपूर्ण निरास होऊन साधक त्या सच्चिदानंदाशीं, सर्वातीत-सर्वगत आत्मस्वरूपाशीं, यमराजांनी म्हटल्याप्रमाणे "शुद्ध जल शुद्ध जलांत मिसळावें" तसा एक होऊन जाईल. यमराज म्हणतात —

> **"तं दुर्दर्शं गूढमनुप्रविष्टं**
> **गुहाहितं गव्हरेष्ठं पुराणम् ।**
> **अध्यात्मयोगाधिगमेन देवं**
> **मत्वा धीरो हर्षशोकौ जहाति ।।"**

—"ह्या आत्म्याचें दर्शन होणें कठीण आहे, कारण द्रष्टा-दृश्य-दर्शन ह्या अज्ञानजन्य भावनांच्या अतीत गेल्याखेरीज त्याचें दर्शन होत नाही. वस्तुतः तो स्वतःच द्रष्टा-दृश्य-दर्शन आहे, आणि

नि.क्र. ४००५८ दि: ०१।०५
९६८८ नों. दि: २८।१४।


म्हणूनच 'मी' द्रष्टा, 'हें' दृश्य, ही भावना जोंवर आहे तोंवर त्याचें दर्शन होणें शक्य नाही. ज्या वेळीं द्रष्टा-दृश्य बोध लोपून अंत:करण शांत होतें त्या वेळीं त्या शुद्ध अंत:करणांतच त्याची उपलब्धि होऊं शकते. जन्म-जरा-मरणादि नाना दु:खांचा अनुभव ज्या शरीरांत आपण घेत असतों त्या ह्या शरीरांतच तो वसत आहे, ह्या शरीरांतच – ह्या जीवनांतच त्या चिरंतन आत्मस्वरूपाचा अनुभव घ्यावयाचा असतो. चिद्विलासाच्या बोधाने ज्या वेळीं अंत:-करणांत उठणाऱ्या भोक्ता-भोग्य ह्या वृत्ति उपशम पावतात त्या वेळीं शांत अंत:करणांत आत्म्याचा प्रत्यय येऊं लागतो – तें अंत:-करण आत्मस्वरूपीं स्थिरावतें.

"ह्यालाच म्हणतात 'अध्यात्म-योग.' ह्या अध्यात्मयोगाची अवस्था प्राप्त करून घेऊन, म्हणजेच अंत:करण तरंगहीन, शांत करून त्या अंतर्बहिर्वर्ती आत्म्यांत अधिकाधिक तल्लीन, तन्मय होतां होतां साधकाच्या भोक्ता-भोग्य, विषय-विषयी, मी-माझें ह्या अविद्याजन्य बोधाचा आत्मविद्येने कायमचा लय होऊन तो त्या सच्चिदानंदाशीं एकरूप होऊन जातो – त्याच्या जीवनांतील सुख-दु:खांचा लपंडाव संपतो – तो आनंदस्वरूप होऊन जातो."

≑

हें अमनी मन, हें निस्तरंग, शांत मन, हा अध्यात्मयोग म्हणजे भोग्य-भोक्ता, मी-माझें, विषय-विषयी ह्यांचा पतंजलि म्हणतात तसला 'निरोध' (restraining) नव्हे, किंवा फ्रॉइड म्हणतात तसलें 'दाबून-दडपून' टाकणें (repression वा suppression) नव्हे. तर, हें म्हणजे त्यांचें ज्ञानोद्भासन (illumination) होय – आज प्रत्ययास येत आहेत त्या स्वरूपांत ते रज्जुसर्पवत् मिथ्या असून स्वरूपत: चिन्मय आत्म्याचा विलास होत

ह्या ज्ञानाने त्यांच्या स्व-रूपांत अवस्थान करणें होय.

मनाची ही अवस्था अर्थातच एकाएकी येणें शक्य नाही. त्यासाठी हा चिद्विलास बोध हृदयांत सतत रुजवीत जावें लागेल. हें असें रुजविणें श्रीगुरूंजवळून शास्त्रांच्या श्रवण-मनन-निदिध्यास-नाने शक्य होतें, पूजाजपादींनी शक्य होतें, स्वकर्मांनी भगवंताची अर्चना करून शक्य होतें. सारांश, ज्ञानयोग, भक्तियोग, कर्मयोग ह्या तो अध्यात्मयोग प्राप्त करून घेण्याच्या प्रणाल्या होत. अध्यात्मयोग हा त्या आत्मरूपी गच्चीवर पोहोचण्यासाठीचा शेवटचा अपरिहार्य चौथरा म्हटला तर ज्ञानयोग-भक्तियोग-कर्मयोग हे त्या चौथऱ्यापर्यंत पोहोचविणारे जिनेच म्हणतां येतील.

३

आज प्रत्ययास येत आहेत त्या स्वरूपांत भोक्ता-भोग्य, मी-माझें, विषय-विषयी हे मिथ्या असून वस्तुतः हा सारा त्या एकमेवाद्वितीय चिन्मय प्रभूचाच लीलाविलास आहे ह्या बोधांत स्थिर होणें म्हणजेच अध्यात्मयोग होय. परंतु सर्वच साधकांना त्या सर्वातीत-सर्वगत चैतन्यनाथांत असें स्थित होणें जमत नाही. त्यांना हा बोध जाणवतो, पण त्यांत स्थित होतां येत नाही. अशांसाठी यमराज उपाय सांगतात --

"तत् ते पदं संग्रहेण ब्रवीमि
ॐ इति एतत् ।"

--"अशा साधकांनी जाणून असावें की ॐकार हा त्या चिन्मयाचें प्रतीक आहे. हा ॐ जणु काय त्याचें नांवच आहे. ह्या प्रतीकाच्या साहाय्याने त्या साधकांनी त्या चैतन्यनाथांत स्थिरपणें स्थित होण्याचा प्रयत्न करावा." अशा रीतीने, ज्यांना एकदम,

थेट त्या चिद्विलास बोधांत स्थिर होणें जमत नाही त्यांच्यासाठी यमराजांनी ॐकार हें अवलंबन सांगितलें आहे. ह्याचा अर्थ असा मात्र नव्हे की त्या सर्वातीत-सर्वगत परमात्म्यांत मन स्थिर करण्यासाठी सर्वांनी ॐकाराचाच आश्रय घेतला पाहिजे. स्वतःच्या आवडीनुसार कुणी ॐकाराचा आश्रय घेईल, कुणी शिव-विष्णु आदि प्रतिमांचा वा मूर्तींचा आश्रय घेईल, कुणी अवताराचा आश्रय घेईल, तर कुणी श्रीगुरुमूर्तीचा आश्रय घेईल. यमराजांनी येथे फक्त 'अवलंबना'चें तत्त्व (principle) सांगितलें आहे. ह्या कोणत्याहि 'आलंबना'चें साहाय्य घेऊन साधकाने त्या चैतन्यनाथांत, त्या चिद्विलास बोधांत स्थिर होण्याचा प्रयत्न करावयाचा असतो.

४

विश्वसंसारांतील नाना भोग्य वस्तु आणि त्यांचा भोक्ता 'मी' हीं आज अनुभवास येत आहेत त्या स्व-रूपांत रज्जुसर्पवत् मिथ्या असून तो रज्जुस्वरूप आत्माच ह्या भोक्ता-भोग्यांच्या रूपांनी विलसत आहे ह्या बोधांत – चिद्विलासांत – स्थित होण्यालाच यमराजांनी म्हटलें आहे 'अध्यात्मयोग'. भक्ति-कर्मादि योग वा ॐकारादि प्रतीक-प्रतिमा ह्या 'अध्यात्म-योगा'ला साहाय्यभूत आहेत हेंहि त्यांनी सांगितलें. एवढें सर्व सांगून यमराज म्हणतात ––

**"तां योगम् इति मन्यन्ते स्थिराम् इंद्रियधारणाम् ।**
**अप्रमत्तः तदा भवति, योगो हि प्रभवाप्ययौ ।।"**

––"मनाची ही जी निस्तरंग, शांत, पारदर्शक अवस्था आहे, ही जी अध्यात्म 'योगा'ची अवस्था आहे, ती वस्तुतः आहे बाह्य नि आंतर इंद्रियांचा – मन नि ज्ञानेंद्रियांचा – स्थिर संयम. म्हणून, जो साधक त्या अध्यात्मयोगांत स्थित होण्याचा प्रयत्न करीत असतो तो ह्या इंद्रियसंयमाविषयी अत्यंत जागरूक असतो. त्याने इंद्रिय-

संयमाच्या बाबतींत असें जागरूक असावयासच हवें, कारण इंद्रियसंयमानेच हा योग सिद्ध होत असतो आणि असंयमानेच तो नष्ट होत असतो. म्हणून ह्या संयमाच्या बाबतींत साधकाने फारच सावध राहावयास हवें."

भगवत्पूज्यपाद श्रीशंकराचार्यांनी ह्या मंत्रावर भाष्य करतांना एक मोठें सुंदर विधान करून ह्या मंत्राचें स्वारस्य स्पष्ट केलें आहे. आचार्यपाद म्हणतात — "**ताम् ईदृशीम् अवस्थां 'योगम्' इति मन्यन्ते, 'वियोगम्' एव सन्तम् ।**" — "मनाच्या ह्या अमन-अवस्थेला 'योग' म्हणतात, पण वस्तुतः आहे ती 'वियोग'च."

सारांश, आंतर-बाह्य इंद्रियांचा संयम हा 'योगा'चा प्राण आहे; नव्हे, भगवंताशीं योग आणि भोग्य विषयांचा वियोग ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. असा 'वियोग' अनुष्ठिल्या-खेरीज 'योग' साधणेंच शक्य नाही, आणि ज्याला 'योग' साधला आहे त्याच्या जीवनांत हा 'वियोग' आविर्भूत होईलच होईल.

इंद्रियसंयम नाही, पावित्र्य नाही, आणि इकडे अध्यात्माची पोपटपंची चालली आहे अशांविषयी यमराज असंदिग्धपणें, खण-खणीत शब्दांत म्हणतात —

"**नाविरतो दुश्चरितात्, नाशान्तो, नासमाहितः ।**
**नाशान्तमानसो वाऽपि प्रज्ञानेनैनमाप्नुयात् ॥**"

— "वाईट आचरण, कुकर्मं करण्याचें ज्याचें थांबलेलें नाही, ज्याचें इंद्रियलौल्य उपशम पावलेलें नाही, ज्याचें मन नाना भोग्य वस्तूंमागे धावत असतें, फलाकांक्षेने ज्याचें मन नेहमीच चंचल होत असतें अशा माणसाला ह्या आत्म्याचें संपूर्ण 'ज्ञान' असूनहि त्याला त्या आत्म्याची 'प्राप्ति' होणें कदापि शक्य नाही. त्याचें तें आत्म्याचें ज्ञान म्हणजे आत्म्याविषयी केवळ 'माहिती'

( information ), इतकेंच.'

=

'वियोगा'चा ह्या अध्यात्म-योगाशीं संबंध, 'वियोगा'चें ह्या 'योगां'तील स्थान, वियोग साधल्याने काय होतें आणि न साधल्याने काय होतें, ह्या 'वियोगा'चें कार्य कसें घडत असतें इत्यादि गोष्टी यमराजांनी नचिकेत्याला एका अत्यंत सुंदर, अतिशय मार्मिक दृष्टान्ताच्या साहाय्याने समजावून सांगितल्या आहेत. यमराज म्हणतात ––

"हें शरीर म्हणजे जणुकाय एक रथ आहे. ह्या शरीराच्या द्वारे नाना सुख-दु:खांचा भोग करणारा भोक्ता वा जीव त्या रथांत बसलेला त्या रथाचा मालक वा रथी आहे. डोळे, नाक, कान, इत्यादि इंद्रियें हे त्या रथाला जोडलेले घोडे आहेत. बुद्धि ही त्या घोडयांना चालविणारा सारथि आहे. मन आहे त्या घोडयांचा लगाम. आणि शब्द-स्पर्श-रूप-रस-गंधादि भोग्य विषय आहेत – ज्यांवर तो रथ चालत असतो ते रस्ते !

"ज्या शरीररथाचा बुद्धिसारथि अविवेकी असतो – कोणत्या मार्गानें जावें, कोणत्या मार्गानें जाऊं नये हें ज्याला अवगत नसतें, ज्याचा मनोलगाम नीट सावरलेला-आवळलेला नसतो त्याचे इंद्रिय-घोडे, ताबा नसल्यामुळे हवे तसे उधळून रथ खड्डयांत टाकीत असतात. उलट ज्या शरीररथाचा बुद्धिसारथि विवेकी असतो, ज्याचा मनोलगाम नीट सावरलेला-आवळलेला असतो, त्याचे इंद्रियघोडे काबूंत असतात आणि नीट मार्गानें जाऊन रथस्वामीला इच्छित स्थळीं नेऊन पोहोचवितात.

"सारांश, ज्याच्या बुद्धीमधे नित्य-अनित्यविवेक – सच्चिदानंद भगवानच सत्य, बाकी सर्व अनित्य हा बोध दृढ नसतो त्याचें

मन त्याच्या ताब्यांत असणें शक्य नाही. भोक्ता-भोग्य सत्य असा बोध असल्यामुळे त्याचें मन भोगासाठी सदाच लालचावलेलें असणार– नेहमीच अपवित्र असणार. अशा चंचल, तरंगमय मनांत त्या अंतर्बहिर्वर्ती आत्म्याचा प्रत्यय येणें कसें शक्य आहे ? असा माणूस ह्या नाना अनर्थसंकुल संसारांतच अधिकाधिक मग्न होणार. उलट ज्याच्याठायीं नित्यानित्यविवेक वसत आहे त्याचें मन त्याच्या ताब्यांत असतें. त्या मनांत 'हें भोगीन' 'तें भोगीन' असे तरंग उठत नाहीत; तें सदा पवित्र असतें. अशाच मनांत त्या सर्वमय परमात्म्याचा प्रत्यय येणें शक्य आहे. त्या प्रत्ययांत अधिकाधिक डुबत डुबत तो भाग्यवान साधक अंतीं त्या परमानंदमय, अभय परमात्मपदीं कायमचा स्थित होत असतो, चिरकृतार्थ होत असतो."

विवेक वा चिद्विलासबोध हा केवळ बुद्धींतच राहून भागणार नाही, तो मनांत उतरावयास हवा, आणि केवळ मनांत उतरूनहि चालणार नाही, तर इंद्रियांमधे यावयास हवा. तरच अंतःकरण निस्तरंग, शांत, पारदर्शक होऊन त्या सर्व-स्वरूप आत्म्याचा प्रत्यय येऊं लागेल – अध्यात्मयोग साधेल, हें यमराजांनी ह्या रथाच्या दृष्टान्ताने मोठ्या सुरेख रीतीने सांगितलें आहे.

पुष्कळजण हा नित्यानित्य-विवेक वा चिद्विलास बोध हृदयावर नीट बिंबवून न घेतां मन-इंद्रियांचा संयम करूं जातात. असला अंधळा संयम सफल होणें शक्य नाही हें त्यांना अनुभवान्तीं कळतें. कित्येकजण असतात, त्यांच्या हृदयावर हा विवेक वा चिद्विलास बोध ठसला असतो, तो त्यांच्या बुद्धीला पटला असतो, पण त्याच्या साहाय्याने मनाचा वा इंद्रियांचा संयम करण्याकडे त्यांचें तितकेसें लक्ष नसतें. अशांचें आध्यात्मिक जीवन केवळ 'समजण्या'पर्यंतच जातें, त्यापलीकडे नाही. कांहीजण असतात,

त्यांना जीवनांतील आणि जगांतील हें चिद्विलासाचें सत्य पटलेलें असतें, तदनुसार ते मनाचा संयमहि करीत असतात; पण त्याबरोबरच इंद्रियांचाहि निग्रह करावयास हवा हें त्यांच्या ध्यानांत येत नाही. 'इंद्रियें कांही करोत, मन ठीक असलें म्हणजे झालें' असें ते म्हणत असतात. त्यांना अखेर आढळून येतें की इंद्रियनिग्रहाखेरीज मनाचा संयम म्हणजे स्वत:ची नुसती फसवणूक आहे, तो संयम नसतो, संयमाचा नुसता आभास असतो. इंद्रियलौल्य हळूहळू त्यांच्या त्या मन:संयमाची, त्यांच्या चिद्विलासबोधाची बघतां बघतां विल्हेवाट लावीत असतें. कैकजण असतात, त्यांच्याठायीं विवेक असतो, आणि त्यांचें सारें लक्ष इंद्रियनिग्रहाकडे असतें. परंतु 'मनाने थोडाफार उपभोग घेतला तर काय झालें' असें त्यांना वाटत असतें. मनाचाहि त्याबरोबरच संयम करावयाचा असतो हें त्यांना कळत नाही. अशांचा इंद्रियनिग्रह शेवटीं हास्यास्पद ठरतो. यांपैकी कुणालाच अध्यात्म-योग साधणें शक्य नाही. कारण त्यांचा 'वियोग' सर्वांगीण नसतो.

म्हणूनच यमराज रथाच्या दृष्टान्ताने दाखवितात की बुद्धि, मन आणि इंद्रियें ह्या सर्वांचा विवेकाने वा चिद्विलासबोधाने संयम करणें म्हणजेच खरा 'वियोग' होय. अशा वियोगानेच अंत:करण तरंगहीन, शांत, पारदर्शक होईल, अध्यात्मयोग साधेल आणि त्या योगसाधनेने साधक अंतीं — "**सोऽध्वन: पारमाप्नोति तद्विष्णो: परमं पदम्**" — ह्या संसारमार्गाचा शेवट, तें परमानंद पद गाठूं शकतो.

५

आणि म्हणूनच ह्या 'अध्यात्मयोगा'ची साधना करणाऱ्या साधकाचा हा संयम सर्वसाधारण नीतिमान व्यक्तीच्या संयमाहून अगदीच निराळा असतो. आध्यात्मिक संयम (spiritual mora-

lity) आणि नैतिक संयम (ethical morality) ह्यांत फार फार अंतर आहे. जगांतील विषय हे भोग्य आहेत, परंतु त्यांचा अनिर्बंध भोग घेणें 'वाईट' आहे या भावनेने जो संयम करण्यांत येतो त्याला म्हणतात नैतिक संयम. परंतु भोग्य-भोक्ता हे 'मिथ्या' असून भोगासाठी भोग्यांमागे धावणें हें मृगजळामागे धावण्यासारखें 'अज्ञाना'चें आहे, म्हणून त्यांचा त्याग करून त्या भोग्य-भोक्त्यांचें खरें स्व-रूप जो सच्चिदानंद आत्मा, त्यांत विलीन होणें, हा झाला आध्यात्मिक संयम. आध्यात्मिक संयमांत नैतिक संयमाचा साहजिकपणेंच अंतर्भाव होतो, परंतु नैतिक संयमांत अर्थातच आध्यात्मिक संयमाचा अंतर्भाव होत नाही. म्हणूनच भगवान् भाष्यकारांनी ह्या अध्यात्मयोगाला वियोगयोग असें सार्थ, सूचक नांव दिलें आहे. यमराज स्पष्टपणें सांगतात की ह्या अध्यात्म-योगाने आत्मलाभ करून घेण्यासाठी **"कामाः येऽस्य हृदि स्थिताः"** — "साधकाच्या हृदयांतील 'कामना' नाहीशा व्हावयास हव्यात." पण एवढेंच सांगून यमराज थांबत नाहीत; ते लगेच म्हणतात की, **"हृदयस्येह ग्रंथयः"** — "हृदयांत ज्या 'अविद्ये'च्या गाठी आहेत — मी-माझें, भोक्ता-भोग्य, विषय-विषयी ह्यांच्यासंबंधी जो सत्यत्वबोध आहे" तो चिद्विलासाच्या बोधाने निघून जावयास हवा. तरच हा अध्यात्मयोग साधून साधक कृतकृत्य होऊं शकतो.

अध्यात्मयोग साधून कृतकृत्य होऊं शकण्यासाठी साधकाच्या अंतःकरणांतील कामना नाहीशा व्हावयास हव्यात आणि त्याच्या अंतःकरणांतील अविद्येच्या गाठी सुटावयास हव्यात हें सांगून यम-राजांनी मानवी अंतःकरणाचें वा मनाचें स्वरूप मोठ्या मार्मिक रीतीने वर्णिलें आहे. मानवी मन ! स्थूल-सूक्ष्म नाना वासना-

कामनांनी बुजबुजलेलें, अविद्येच्या गाठींनी गाठाळलेलें ! हेंच मन शुद्ध करून, 'अमन' करून साधकाला तद्द्वारा आत्मसाक्षात्कार करून घ्यावयाचा असतो. ज्या मनाने त्या भगवंताचा लाभ करून घ्यावयाचा आहे, त्याच मनांत ह्या कामना ठाण मांडून बसलेल्या असतात, त्यांत अविद्येने घर केलेलें असतें. श्रीरामकृष्णदेव नेहमी म्हणत असत—मोहऱ्यांनी भूत काढावयाचें असतें, पण त्या मोहऱ्यांतच जर भूत शिरून बसलेलें असेल तर ? मानवी मनाची अशीच दशा आहे ! ज्या मनाने वासना-कामना-अविद्या दूर सारून आत्मलाभ करून घेणार त्या मनांतच मुळी त्या साऱ्यांनी तळ दिलेला असतो ! म्हणूनच यमराज बजावतात—

"नैषा तर्केण मतिरापनेया
प्रोक्ताऽन्येनैव सुज्ञानाय प्रेष्ठ"

—"हे प्रिय ऋषिकुमारा, हा आत्मबोध कधी तर्कबुद्धीच्या द्वारें लाभण्यासारखा नाही. तार्किकांहून भिन्न, म्हणजेच प्रत्यक्षानुभवसंपन्न अशा व्यक्तीकडून ह्या आत्म्याचें स्वरूप आणि तत्प्राप्तीची साधना जाणून घेऊन प्रयत्न केल्यासच आत्मज्ञान होऊं शकतें."

वासना-कामनांनी लडबडलेल्या, अविद्येने झपाटलेल्या बुद्धीला ह्या आत्म्याचें स्वरूप कसें आकळणार ? शिवाय बुद्धि हें एक 'इंद्रिय' आहे. 'जाणणारा' (ज्ञाता) आणि 'जाणलें जाणारें' (ज्ञेय) ह्या द्विधा बोधाखेरीज हें इंद्रिय कधीच कार्य करूं शकत नाही. आणि आत्मा तर अतींद्रिय आहे—ज्ञाता आणि ज्ञेय ह्या दोन्ही रूपांनी वस्तुतः तोच विलसत आहे. म्हणूनच यमराज म्हणतात की ह्या मनाला 'अमनीभूत' करण्याचें शास्त्र, म्हणजेच साधनेसहित आत्मविद्या प्रत्यक्षानुभवसंपन्न अशा व्यक्तीकडून जाणून घेऊन तदनुसार प्रयत्न केल्यासच तो सफल होणार, स्वतःच्याच

अंध, अपंग बुद्धीनुसार चालल्याने नाही.

ह्या प्रत्यक्षानुभवसंपन्न व्यक्तीलाच पारिभाषिक संज्ञा आहे – ‘गुरु’. यमराज म्हणतात – “स्वत:च्या बुद्धीने प्रयत्न करून किंवा स्वत:सारख्याच वासना-कामना-युक्त, अविद्यान्ध साधारण माणसा-कडून ऐकून ह्या आत्म्याचें स्वरूप आकळतां येणें अशक्य आहे. कारण ज्याची जशी बुद्धि, तशी त्याची आत्म्याविषयी ‘कल्पना’ असणार. म्हणूनच एकजण म्हणतो की ‘आत्मा आहे’ तर दुसरा म्हणतो की ‘आत्मा नाही’; आणि ते दोघेहि ‘बुद्धी’च्या आधारानेच हें ठासून म्हणत असतात ! ‘बुद्धि’ जर खरोखरच सम्यक्दर्शनक्षम असती तर तिलाच प्रमाण मानणाऱ्या लोकांत एकाच आत्म्याविषयी इतकीं भिन्नभिन्न आणि इतकीं परस्परविरुद्ध मतें असूंच शकलीं नसतीं. म्हणून ज्याला ह्या अतींद्रिय आत्म्याचा प्रत्यक्ष अनुभव आहे अशा शुद्ध व्यक्तीकडून ह्या आत्म्याचें स्वरूप आणि तल्लाभाची साधना जाणून घेऊन तदनुसार मार्ग आक्रमा-वयास हवा; कारण हा आत्मा तर्काच्या विरुद्ध (anti-rational) नसला तरी संपूर्णतया तर्काच्या अतीत (super-rational) मात्र आहे.”

३

‘गुरु’ म्हणजे ‘आत्मानुभवसंपन्न’ व्यक्ति आणि म्हणूनच ‘शिष्य’ म्हणजे ‘आत्मानुभवाकांक्षी’ व्यक्ति. अशा ‘अनुभवसंपन्न’ आणि ‘अनुभवाकांक्षी’ व्यक्तींच्या संबंधाला ‘गुरुबाजी’चें वा ‘बुवाबाजी’चें स्वरूप प्राप्त होणें अर्थातच कदापि शक्य नसतें. ज्या वेळीं ‘शिष्या’ला वस्तुत: ‘आत्मानुभव’ नको असतो, त्याला खरोखर धन-दौलत-स्त्री-पुत्र-मान-यश इत्यादिजातीय ऐहिक कांहीतरी हवें असतें त्याच वेळीं तो ‘गुरुबाजी’ला वा ‘बुवाबाजी’ला

वळी पडत असतो. ज्याच्यांत सत्यलाभाची आणि सत्यलाभाचीच तळमळ आहे त्याला 'गुरु' आणि 'बुवा' ह्यांतील फरक आपोआप, प्राणोप्राण जाणवतो. एरवी 'सत्याकांक्षा' कशाला म्हणायचें ? धर्मजगताचा इतिहास, यथार्थ धर्माकांक्षी व्यक्तींचीं चरित्रें ह्याला साक्ष आहेत.

खरोखर गुरु नसूनहि गुरुपणा करण्याला गुरुबाजी वा बुवाबाजी म्हणतात. 'खरोखर' 'शिष्य' नसूनहि शिष्यपणा करण्याला शिष्यबाजी म्हणतां येईल. गुरुबाजीपासून बचावयाचें झाल्यास आधी शिष्यबाजीपासून बचावलें पाहिजे. यम-नचिकेता संवाद आपल्याला हा संदेश अगदी कंठरवाने देत आहे. यमराज खणखणीत शब्दांत सांगतात--

**"आश्चर्योऽस्य वक्ता, कुशलोऽस्य लब्धा**
**आश्चर्यो ज्ञाता कुशलानुशिष्टः ।"**

--"ह्या आत्म्याचें ज्ञान देणाराहि आश्चर्यावह असतो आणि तें ग्रहण करूं शकणाराहि आश्चर्यावह असतो. दोघेहि कुशल, निपुण असतात." असे देणारेहि विरळ असतात आणि घेणारेहि फार नसतात. उरलेली सारी गुरुबाजी अन् शिष्यबाजी-दोन्ही खूप स्वस्त.

६

श्रीगुरु आणि शास्त्र यांच्या आदेश-निर्देशानुसार प्रतीक-प्रतिमांच्या अवलंबनाने, ज्ञान-भक्ति-कर्मयोगांच्या अनुष्ठानाने, योग-वियोगाची साधना करून साधकाने आत्मलाभ करून घ्यावयास हवा -

हें सर्व खरें. पण ह्या साऱ्यांत, 'मी माझ्या साधनेने त्या एकमेवाद्वितीय प्रभूची प्राप्ति करून घेत आहें' असा जर साधकाचा

बोध असेल तर त्याला सिद्धि लाभण्याची आशा नाही ! 'मिळविणारा' आणि 'मिळवावयाचें' असा खराखुरा भेद त्या 'एकमेवाद्वितीयां'त कसा बरें शक्य आहे ? केवळ अज्ञानामुळे, अविद्येमुळेच हा भेद भासत असतो. 'मिळविणाऱ्या'चें खरें स्व-रूपच वस्तुतः तो चैतन्यघन प्रभु आहे. म्हणून हा अविद्याजन्य भेद दूर करण्याकरता साधकाला साधना तर करावी लागेलच; परंतु माझी साधनाहि वस्तुतः त्या प्रभूचीच लीला आहे अशा बोधाने, लाट जशी समुद्राला वा अलंकार जसा सोन्याला शरण जाईल त्या तऱ्हेने त्या प्रभूला शरण जाऊन साधकाने साधना करावयास हवी. एरवी 'मी' साधनेने त्याला प्राप्त करून घेईन — हा 'मी' म्हणजेच तर अज्ञान. तो जाईपर्यंत मुक्ति कशी मिळणार ? साधना म्हणजेच ह्या 'मी'चा समूळ नाश करणें. कारण, तरच 'तो' प्रकट होईल. म्हणून अशी साधना करावयास हवी की जिने 'मी' लयास जाईल. जिने 'मी' पक्का होईल ती कसली साधना ? म्हणूनच साधक-साधना-सिद्धि सारी त्या प्रभूचीच लीला आहे ह्या संपूर्ण शरणागतीच्या बोधाने साधना करीत जावयास हवें. यमराज म्हणतात —

> "नायमात्मा प्रवचनेन लभ्यः,
> न मेधया, न बहुना श्रुतेन ।
> यमेवैष वृणुते तेन लभ्यः
> तस्यैष आत्मा विवृणुते तनुं स्वाम् ।।"

— "वेदांच्या सतत अनुशीलनाने, बुद्धिमत्तेने, शास्त्रांच्या प्रचुर श्रवणाने ह्या आत्म्याचा लाभ होणें शक्य नाही. जो साधक मी-माझें हा भाव सोडून ह्या आत्मदेवाला शरण जातो त्याच्या निष्काम, निर्मल बोधांत हा सर्व-स्वरूप आत्मा प्रकट होतो — मी-

माझें, विषय-विषयीमय हें जगत् त्या चिन्मय आत्म्याचाच नामरूपात्मक विलास आहे ह्या सत्याचा त्याला साक्षात्कार होतो."

७

त्या सच्चिदानंद प्रभूला शरण जावयाचें याचा अर्थ अलबतच असा नव्हे की साधकाने मग साधना करावयास नको. कारण, जोंवर 'मी' बोध आहे तोंवर तो बोध, ती अविद्या दूर करण्यासाठी साधना ही करावीच लागणार. यमराज सांगत आहेत तें एवढेंच की साधना जी करावयाची ती 'साधक-साधना-सिद्धि' ही 'वस्तुत:' त्या लीलामयाची लीला आहे ह्या बोधाने वा जाणिवेने करावयाची असते. म्हणूनच संपूर्ण शरणागतींतहि (self-surrender मधेंहि) साधनेला म्हणजे प्रयत्नांना (self-efforts ना) स्थान आहे.

८

तसें पाहिल्यास, भगवान् श्रीरामकृष्ण नेहमी म्हणत असत त्याप्रमाणे, भगवंताच्या कृपेचा वारा तर सदाच वाहत असतो; आपण आपल्या नौकांचीं शिडें उभारून द्यावयास हवींत. एरवी त्या वाऱ्याचा आपल्याला कांहीच उपयोग होणार नाही. हें 'शीड उभारणें' म्हणजेच शरणागतिपूर्वक साधना करणें.

पण होतें काय की, भगवंताची कृपा आहे, गुरुकृपाहि झाली, पण स्वत:कडून प्रयत्नांचा अभाव झाल्यामुळे माणूस ह्या चिरकृतार्थकारी आत्मलाभास मुकून फिरफिरून ह्या जन्म-जरा-मरणरूपी संसारांत भ्रमत राहतो. बंगालींत एक कविता आहे —

"गुरु कृष्ण वैष्णव ए तिनेर दया होलो ।
ऍकेर दयाबिना जीव छारेखारे गॅलो ।।"

—"गुरु, भगवान आणि संतसत्पुरुष ह्या तिघांची दया झाली.

पण एकाची दया न झाल्यामुळे जीवाचा सत्यानाश झाला." हा 'एक' म्हणजे जीव स्वत:च !

म्हणून यमराज ओजस्वी, अग्निगर्भ शब्दांत तुमच्या आमच्या कल्याणकामनेने कळवळून म्हणतात –

"उत्तिष्ठत, जाग्रत,
प्राप्य वरान्, निबोधत ।"

–"ह्या महा अनर्थकर अविद्यानिद्रेंत निद्रिस्त होऊन या क्षणभंगुर संसाराचें स्वप्न पाहणाऱ्या जीवांनो, उठा, या निद्रेंतून उठा. ह्या सर्व अनर्थांस कारणीभूत असलेल्या ह्या घोर निद्रेचा त्याग करा – जागे व्हा. यथार्थ गुरूला शरण जाऊन त्यांचेकडून हें आत्मतत्त्व सरहस्य जाणून घेऊन तदनुसार साधना करून कृतार्थ व्हा."

यमराज बजावतात –

"क्षुरस्य धारा निशिता दुरत्यया
दुर्गं पथस्तत् कवयो वदन्ति ॥"

–"ह्या बाबतींत चालढकल करून, धिमेपणा करून, आळस करून, पुढे पाहूं, म्हातारपणीं पाहूं असें करून कदापि यश मिळण्यासारखें नाही. ह्याविषयी जे जाणते आहेत ते स्पष्टपणें सांगतात की धार लावलेल्या तीक्ष्ण पात्यावरून चालणें जसें कठीण असतें तसाच हा आत्मलाभाचा मार्ग दुर्गम आहे, कठीण आहे. म्हणून आज आणि आत्ताच कमर कसून हा साधनामार्ग आक्रमावयास सिद्ध व्हा."

REFBK-0014813

REFBK-0014813

अनुक्रम ४००५८ दि: ३१/९१

## आमचें अन्य प्रकाशनें दि: २८/१/५८

| | | |
|---|---|---|
| १–२. | **श्रीरामकृष्ण चरित्र**—न. रा. परांजपेकृत | रु. पै. |
| | प्रथम भाग (चवथी आवृत्ति) ... | ४.२५ |
| | द्वितीय भाग (तिसरी आवृत्ति) | ४.३७ |
| ३–४. | **श्रीरामकृष्ण-वचनामृत**—श्री. 'म' संकलित | |
| | प्रथम भाग (दुसरी आवृत्ति) | ५.५० |
| | द्वितीय भाग ... | ८.०० |
| ५. | **भगवान श्रीरामकृष्णांच्या लीलासहधर्मिणी श्री सारदादेवी** | ६.२५ |
| ६. | **स्वामी विवेकानंद यांचें चरित्र**—(सुधारलेली दुसरी आवृत्ति) | ७.२५ |
| ७. | **भगवान श्रीरामकृष्णांचे एक प्रमुख शिष्य** | |
| | **स्वामी शिवानंद** ('महापुरुषजी') | २.७५ |
| ८. | **साधु-नागमहाशय चरित्र**—(दुसरी आवृत्ति) ... | २.०० |
| ९ | **हिमालयाच्या कुशींत**—स्वामी अखंडानंद ... | २.५० |
| १०. | **श्रीरामकृष्ण-वाक्सुधा**—(पांचवी आवृत्ति) | |
| | स्वामी ब्रह्मानंद द्वारा संकलित ... | १.०० |
| ११ | **स्वामी विवेकानंदांच्या आठवणी**—(दुसरी आवृत्ति) ... | १.७५ |

### स्वामी विवेकानंदकृत पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| १२. | **ज्ञानयोग** ... ... | ४.०० |
| १३. | **राजयोग** (पतंजलींचीं योगसूत्रें आणि त्यांचें सुबोध विवरण यांसह)—(दुसरी आवृत्ति) | ३.४० |
| १४. | **कर्मयोग**—(तिसरी आवृत्ति) ... | २.१० |
| १५. | **भक्तियोग**—(दुसरी आवृत्ति) ... | १.७५ |
| १६. | **प्रेमयोग** ... ... | १.७५ |
| १७. | **सुबोध राजयोग** ... ... | ०.६० |
| १८. | **कोलंबो ते अल्मोरा** (भारतांत दिलेलीं व्याख्यानें) ... | ६.२५ |
| १९. | **स्वामी विवेकानंदांच्या सहवासांत** ... | ४.५० |
| २०. | **स्वामी विवेकानंदांचीं पत्रें** .. ... | ४.७५ |
| २१. | **दैवी वाणी** (निवडक शिष्यांना दिलेला उच्च आध्यात्मिक उपदेश) | २.७५ |
| २२. | **आत्मसाक्षात्कार : साधना व सिद्धि** ... | २.२५ |
| २३. | **बुद्धदेवांचा जगाला संदेश आणि इतर व्याख्यानें** ... | २.२५ |
| २४. | **युरोपच्या प्रवासाची दैनंदिनी** ... | २.२० |

२५. धर्माचें विज्ञान आणि तत्त्वज्ञान ... २.००

२६. धर्माचें स्वरूप आणि साधन ... २.००

२७. स्वामी विवेकानंद यांच्या मुलाखती व प्रश्नोत्तरें ... २.[illegible]

२८. भारतीय नारी (दुसरी आवृत्ति) ... २.००

२९. धर्मभूमि भारत आणि इतर लिखाण ... २.००

३०. वेदान्ताचें स्वरूप आणि प्रभाव ... १.७५

३१. महापुरुषांच्या जीवनकथा—(सातवी आवृत्ति) ... १.[illegible]

३२. भगवान श्रीकृष्ण आणि भगवद्गीता ... १.६०

३३. स्वामी विवेकानंदांशीं संवाद आणि संभाषणें ... १.६०

३४. हिंदुधर्म आणि श्रीरामकृष्ण व इतर लेख १.६०

३५. कविता १.५०

३६. उच्च जीवनाची साधना १.५०

३७. भारताची आध्यात्मिक विचारधारा १.५०

३८. वेदान्त आणि जीवन १.२५

३९. पूर्व आणि पश्चिम १.२५

४०. सार्वजनीन धर्म : स्वरूप व साधना १.००

४१. माझे गुरुदेव—(चवथी आवृत्ति) १.००

४२. शिकागो व्याख्यानें—(चवथी आवृत्ति) ०.९०

४३. ज्ञानमार्गावरील प्रवचनें ०.९०

४४. आधुनिक भारत ०.९०

४५. पुनर्जन्म आणि आत्म्याचें अमरत्व (दु.आ.) ०.७५

४६. हिंदुधर्माचें नव-जागरण (दुसरी आवृत्ति) ०.५६

४७. शिक्षण (दुसरी आवृत्ति) ०.५६

४८. पवहारी बाबा—(दुसरी आवृत्ति) ०.५०

## पॉकेटसाईज पुस्तकें

४९. माझें जीवन आणि कार्य—स्वामी विवेकानंद ... ०.७०

५०. माझ्या मोहिमेची योजना—स्वामी विवेकानंद ... ०.५०

५१. उद्‌गार आणि बोधवचनें—स्वामी विवेकानंद .. १ ००

५२. विवेकानंद-वाणी—(चवथी आवृत्ति) ... ०.९०

५३. स्वामी विवेकानंद म्हणतात—(दुसरी आवृत्ति) ... ०.६०

५४. रामकृष्ण-संघ—ध्येय व इतिहास—स्वामी तेजसानंद ... ०.७५

**श्रीरामकृष्ण आश्रम, धंतोली, नागपूर–१.**